# श्रीसाईलीला



ऑक्टोबर
१९६८

सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी
विशेषांक

किं. ७५ पै

# निर्णयसागर प्रकाशित
## प्राकृत ओंवीबद्ध ग्रंथ

| | | | | | कि. रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| भक्तविजय | ... | अध्याय ५७ | ... | ग्लेज | २२ — ०० |
| हरिविजय | ... | ,, ३६ | ... | ,, | १५ — ०० |
| काशीखंड | ... | ,, ८० | ... | ,, | ३० — ०० |
| नवनाथभक्तिसार | | ,, ४० | ... | ,, | २० — ०० |
| पांडवप्रताप | ... | ,, | ... | ... | २२ — ०० |
| तुकारामचरित्र ( ग्रंथसाईज ) | | अध्याय १७ | | ... | १० — ०० |
| शिवलीलामृत ( ग्रंथसाईज ) | | ,, १५ | | ग्लेज | ४ — ०० |
| शिवलीलामृतलहान-कापडी | | | ... | ... | ३ — ०० |
| ,, ,, | | -कागदी | ... | ... | २ — ०० |
| शिवलीलामृत ११ वा अध्याय | | | ... | ... | ० — २५ |
| रुक्मिणीस्वयंवर | — कागदी | ... | २ — ०० | कापडी | २ — ५० |
| देवीमाहात्म्य | — बांधलेलें ... | | ... | ... | ३ — ५० |
| देवीमाहात्म्य | — सुटी पोथी... | | ... | ... | ३ — ०० |
| गरुडपुराण | — ओंवीबद्ध ... | | ... | ... | ३ — ०० |
| शनिमाहात्म्य | — ( पोथी ) ... | | ... | | ० — ५० |
| शनिमाहात्म्य | — प्राकृत कथासार | | ... | ... | ० — २५ |

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भारतीय सण व उत्सव | ... | ... | ... | ३ — ०० |
| अवधूत भक्तांचीं श्रद्धास्थानें | ... | ... | ... | ३ — ०० |
| तुळजापूरची भवानीमाता | ... | ... | ... | २ — ०० |
| पंढरपूरचा विठोबा | ... | ... | ... | २ — ०० |
| महाराष्ट्रांतील महागणपती | ... | ... | ... | २ — ०० |
| ब्रह्मर्षि सातवळेकर चरित्र आणि कार्य | | | ... | ३ — ०० |
| श्रीक्षेत्र कनकेश्वर | ... | ... | ... | २ — ०० |

मिळण्याचें ठिकाण :

निर्णयसागर बुक-प्रकाशन,
२६-२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट,
मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

कोणीही असो, जो आपल्यासाठीं श्रम करतो, कष्ट सोसतो, त्याच्या श्रमांची वा कष्टांची कदर करावी. कोणालाही फुकट राबवूं नये. जरूर पडेल त्याच्याकडून आपलें जें कांहीं कामकाज असेल तें करवून घ्यावें परंतु त्यानें केलेल्याा श्रमाची जाणीव ठेवावी. आपण अशा प्रकारची शिस्त अवश्य लावून घेतलीच पाहिजे. शिस्त कोणती ? कोणाचेही श्रम फुकट घ्यायचे नाहींत ही !

—श्रीसाईचरित्र


श्री साईलीला

सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] आक्टोबर १९६८ [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,

प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# बाबांचें सुवर्णमहोत्सवी पुण्यस्मरण

**प्रिय वाचक :–**

साईबाबांच्या भक्तांना त्यांचें पुण्यस्मरण हरघडी होत असतें, विजया दशमी हा त्यांच्या महासमाधीचा संस्मरणीय दिवस. त्यादिवशीं वर्षानुवर्ष शिरडी येथें सतत तीन दिवस त्यांच्या समाधिमंदिरांत मोठ्या प्रमाणांत महोत्सव साजरा केला जात असतो. बाबांच्या जीवनकार्यास वाहिलेल्या साईलीला या मासिकाचा त्याप्रसंगीं एकादा विशेषांकही प्रसिद्ध केला जातो; परंतु यंदांच्या या विजया-दशमीला त्यांच्या निर्याणास पन्नास वर्षे होत असून त्यानिमित्त शिरडींत, मुंबईंत व जेथें जेथें साईबाबांच्या सेवेचीं केंद्रें आहेत, ज्या ज्या ठिकाणीं त्यांचा भक्त-समुदाय आहे, त्या त्या ठिकाणीं त्यांच्या पुण्यतिथी —महोत्सवी सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथ्युत्सव या नात्यानें मोठ्या व कोणीही हेवा करावा अशा समारोहानें साजरा केला जात आहे.

हा महोत्सव खरोखर प्रत्येकानें आपल्या अंतःकरणपटलावर सुवर्णाक्षरांनीं कोरून ठेवावा अशा बहुमोलाचा आहे. शिरडी येथें हा उत्सव सतत दहा दिवस (प्रारंभ ता. २३ सप्टेंबर) चालून त्याची आतां यशस्वी रीतीनें सांगता होत आहे. हजारों भक्तांनीं या महोत्सवांत मोठ्या उत्साहानें भाग घेतला आहे. दूरदूरच्या भागांतील भक्त या उत्सवासाठीं शिरडींत आले व बाबांचा सुवर्णमहोत्सवी सोहळा भक्तिभावानें पाहून गेले.

मुंबईंत या पुढील आठवड्यांत ता. ११ आक्टोबर ते १५ आक्टोबरपर्यंत हा महोत्सव सेंट झेविअर कॉलेज जिमखान्याच्या पटांगणावर (परेल) येथें मोठ्या समारोहानें साजरा व्हावयाचा आहे. त्यांत हजारो नव्हे तर लक्षावधि भक्त भाग घेतील हें निश्चित होय.

पन्नास वर्षांनंतरही साईबाबांसंबधीं बहुजनसमाजाला एवढें आकर्षण व आवड वाटावी यांतील इंगित काय? गरीब, श्रीमंत, लहानमोठे, स्त्रीपुरुष आणि तेही कोणत्याही समाजांतील! त्या सर्वांना पन्नास वर्षांपूर्वी त्यांच्या हयातींत जसें आकर्षण वाटत असे तसेंच आजही त्याच प्रमाणांत वाटतें ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय?

परंतु त्यांत आश्चर्य कसलें व कां मानायचें? महासमाधि घेण्यापूर्वी आपल्या भक्तांना त्यानीं जें लोभनीय आश्वासन दिलें, तें गेलीं पन्नास वर्षें त्यानीं अरक्षशः पालन केलें आहे. कोणतें तें आश्वासन?

**झालों जरी गतप्राण। वाक्य माझें माना प्रमाण। माझीं हाडें तुर्वतीमधून। देतील आश्वासन तुम्हांस ॥ मी काय पण माझी तुर्वत। राहील तुम्हांसवें बोलत। जो तीस अनन्य शरणागत। राहिल डोलत तयासवें ॥ डोळ्यांआड होईन ही चिंता। करूं नका तुम्हीं मजकरितां माझी हाडें ऐकाल बोलतां। हितगुज करितां तुम्हांसवें ॥**

बाबानीं भक्तांना देऊन ठेवलेलें हें वचन आजवर अक्षरशः पालन केलें आहे व पुढेंही अर्थातच तें पालन केलें जाईल, याबद्दल कोणाच्याही मनांत शंकाभाव उत्पन्न होणार नाहीं.

आजवर ज्यानीं ज्यानीं बाबांवर श्रद्धा ठेविली, व त्यांचें मनोभावें स्मरण केलें, त्यांच्या हांकेला ते तात्काळ ओ देत आले आहेत. ही भक्तांची प्रचीति आहे.

बाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ साईलीला मासिकाचा हा विशेषांक आमच्या प्रिय वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. सुवर्ण-महोत्सव साजरा करणाऱ्या समितीतर्फे या पुढील पंधरवड्यांत कांहीं संस्मरणीय प्रकाशनें प्रसिद्ध होत आहेत. आम्हीं साईलीलेतर्फे आमच्या वाचकांची ही जी अल्पस्वल्प सेवा करीत आहोंत ती आमच्या वाचकांनीं गोड मानून घ्यावी अशी विनंती आहे.

आमच्या ज्या ज्या लेखकबंधूंनीं आमच्या विनंतीला मान देऊन या विशेषांकासाठीं लेख व कविता पाठविल्या, त्यांचे आम्हीं अंतःकरणपूर्वक आभार मानतों. हातीं आलेल्या लेखांपैकीं कांहीं लेख निरुपायानें मागें ठेवावे लागले; त्या आमच्या बंधूंनीं कृपा करून राग मानूं नये. मुंबईंतील सुप्रसिद्ध दलाल आर्ट स्टुडिओचे कर्तबगार व स्नेहाला सदैव जागणारे चालक श्री. दीनानाथ दलाल यानीं या विशेषांकासाठीं बाबांचें सुंदर तीन रंगी चित्र थोड्या वेळांत केवळ सेवाभावानें व विनामूल्य तयार करून दिलें, याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावे हें समजत नाहीं. त्यांच्यावर बाबांची कृपादृष्टि अखंड राहो, हीच आमची प्रार्थना.

त्याचप्रमाणें निर्णयसागर मुद्रणालयाचे उत्साही व्यवस्थापक श्री. पांडुरंग-राव मोरे व त्या मुद्रणालयांतील कामगारवर्ग यानीं या अंकाच्या बाबतींत जो आस्थापूर्वक सहकार दिला त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

**—संपादक**

———×———

# ब्रह्मीभूत परमपूज्य श्रीनरसिंह स्वामी

लेखक : अण्णासाहेब रेगे

परमात्मस्वरूपी गुरुदेव बहुविध गूढ मार्गांनीं आपल्या स्वस्वरूपाची प्रचीती आणून देत असतात; आणि अखिल भारतीय साई समाजाचे संस्थापक श्रीनरसिंह स्वामी यांचें जें चरित्र मी अवलोकन केलें त्यावरून या विधानाच्या सत्यतेबद्दल माझी खात्री पटली. माझे गुरुदेव शिर्डीचे श्रीसाईबाबा हे मर्त्यदेह धारण करून होते तोंपर्यंत त्यांच्या प्रभावाचें व्यावहारिक क्षेत्र महाराष्ट्राच्या एका भागापुरतें मर्यादित होतें. १९१०-१९१८ या मुदतींत दरसाल कित्येक दिवस श्रीबाबांच्या चरणसेवेचा बहुमान मला मिळत असे. त्यावेळीं मला तिथें दिसणाऱ्या भक्तमंडळींत मुख्यत्वेंकरून मुंबईकरांचा भरणा असे व कांहीं मंडळी नागपुराहून आलेली असत. आणि दक्षिण भारतांतील एकुलती एक व्यक्तीच मला भेटत असे. ही व्यक्ति म्हणजे डॉ. नायडू. हे नागपूरचे. श्री. बापूसाहेब बुटी यांच्या समवेत ते शिर्डीला येत असत.



न्या. मू. अण्णासाहेब रेगे

## राधाकृष्ण आई

१९१० सालीं तिथली मशीद (आतां तिला द्वारकामाई म्हणतात) म्हणजे एक मोडकळीला आलेली जागा होती; सारवलेल्या जमिनींत खड्डे असत; आणि श्रीबाबा तिथें एका गोणपाटाच्या तुकड्यावर बसलेले असत. पाठीला टेंकायला जुन्या कपड्यांचें एक बोचकें असे. मी पहिल्या वेळेला बाबांचें चरण-

स्पर्शपूर्वक दर्शन घेतलें तेव्हां बाबांनीं मला शाळेंत जायला सांगितलें. त्या शाळेंत त्यांची एक भक्त श्रीराधाकृष्णआई या रहात असत. बाबा म्हणाले : " ती माझी आई आहे आणि तुझी पण आई. तिचें ऐकून घे आणि तिच्याशी बोल. " या बाई म्हणजे मला मीराबाई व जनाबाई यांचा संयुक्त अवतार वाटल्या— गुरुदेवांच्या कार्याविषयींच्या असीम भक्तीनें व सेवाभावनेनें हें मूर्तरूप घेतलें आहे असें मला वाटलें.माझ्या सारख्या केकांना या बाईनीं अध्यात्म-मार्गाच्या प्रगतींत मार्गदर्शन केलें. आम्ही या बाईविषयींच्या कृतज्ञतेचें व भक्ति-भावाचें ऋण आमच्या शिरावर कायमचें वाहून घेतलें आहे. श्रीनारदमुनींनीं भक्तीची व्याख्या करतांना सांगितलें आहे :– **तदर्पिताखिलाचारता**

आणि मातोश्री राधाकृष्णा आई म्हणजे या भक्तीचा मूर्तिमंत अवतार होत्या. तिच्याच कृपेनें शिर्डींत प्रगतीचीं बीजें दृढमूल झालीं आणि या स्थानाचें अगदीं सामान्य माणसाला सध्यां जें वैभव दिसत आहे तें मुळांत या मातोश्रीं-च्याच कृपेमुळें वाढीला लागलें. बाबा या माउलीला परमेश्वरस्वरूप वाटत असत——सर्वव्यापी, अनंतरूपी, सृष्टिकर्ता ब्रह्मा, सृष्टिपालनकर्ता विष्णु, सृष्टिसंहारकर्ता महेश, असा परमेश्वर म्हणजेच बाबा अशी या माउलीची दृढ भावना होती.

## बाबांची भविष्यवाणी

१९१३ सालच्या सुमारास श्री. बापूसाहेब बुटी यांनीं एक वाडा बांधा-यचा विचार केला आणि सध्यां ज्या वास्तूवर समाधिमंदिर उभें आहे ती वास्तु त्यांनीं या बांधकामासाठीं पसंत केली. बाबा दिवसांतून तीनदां या वास्तूकडे पायीं पायीं जात असत आणि या वास्तूला आपल्या पदस्पर्शानें पुनीत करीत असत. बांधकामाचे नकाशे बाबांना दाखविले तेव्हां बाबा म्हणाले, ' सभागृहाच्या कडेला सुमारें चार हात लांब व दोन हात रुंद येवढी जागा तशीच सोडून द्या." ती कशासाठीं पाहिजे असें विचारल्यावर बाबा म्हणाले, "राधाकृष्णाच्या भक्तीचें मंदिर तिथें मागाहून बांधून होणार आहे." त्यावेळीं लोकांना काडीइतकीही कल्पना नव्हती कीं त्याच ठिकाणीं बाबांचे पार्थिव अवशेष चिरविश्राम घेणार

आहेत आणि तें ठिकाण बाबांच्या आत्म्यानें आपल्या कुडीचा त्याग केल्या-नंतरही सारा देश व्यापून राहिलेल्या आध्यात्मिक जागृतीचें केंद्र होणार आहे!

## श्रीनरसिंहस्वामी

श्रीसाई बाबांच्या संदेशाचा सर्वत्र प्रचार करण्याची कामगिरी माझे परम-पूज्य गुरुबंधु श्रीनरसिंहस्वामी यांजवर सोंपविलेली होती आणि १९३७ सालापासून त्यांच्याशीं माझा जो संपर्क झाला, त्या मुदतींत मला घडलेलें त्यांच्या जीवनाचें ओझरतें दर्शन सर्वांनांच स्फूर्तिदायक वाटेल याची मला खात्री वाटते. त्यांतल्या त्यांत ज्या अखिल भारतीय साईसमाजाचे ते संस्थापक होते त्या समाजाला तर या माहितींतून नक्कीच स्फूर्ति मिळेल.



श्री. नरसिंह स्वामी

श्रीबाबांनीं आपल्या बहुसंख्य भक्तांच्या बाबतींतल्या पेक्षा. वेगळा प्रकार माझ्या बाबतींत केला. शिर्डींत-ल्या माझ्या मुक्कामांत मी मशीद, चावडी व राधाकृष्णा माताजी यांचें राहतें घर या तीन ठिकाणाखेरीज अन्यत्र कुठेंही जाऊं नये, असा बाबांनीं माझ्यावर निर्बंध घातला. बाबांना जी भिक्षा मिळे, तिच्यांतला कांहीं अंश माताजीला मिळत असे आणि मी तिथें असलों म्हणजे १९१२ सालानंतर हा कोटा आणखी वाढवून मिळूं लागला. बाबांचा मला असा आदेश होता कीं मी तुला जें कांहीं हवें असेल तें पुरवीत जाईन. तूं चारचौघांत मिळून मिसळून राहात जाऊं नकोस व आपल्या भक्तीची जाहिरात करूं नकोस आणि मी माझ्या शक्तीनुसार या आदेशाचें पालन करण्याची शिकस्त करीत असें. बाबांच्या अत्यंत निकटवर्ती भक्तांखेरीज फारच थोडे मला ओळखत असत वा परिचित असत.

## राजकारणाशीं व संसाराशीं असहकार

श्रीनरसिंहस्वामी यांनीं एकदां मला आपली हकीकत सांगितली. त्यांनीं राजकारणाशीं व संसाराशीं असहकार पुकारला व सद्गुरूच्या शोधार्थ भटकंती सुरू केली. श्रीरमणमहर्षि यांच्या आश्रमांत त्यानीं तीन वर्षें तपस्या करण्यांत घालविलीं. श्री. पॉल ब्रंटन यांनीं आपल्या एका ग्रंथांत स्वामीजींच्या मुलाखतीचा उल्लेख केला आहे. स्वामीजी मला म्हणाले, "तीन वर्षें तपस्या केल्यावर मला आत्मिक उन्नतीचा लाभ मिळाला, पण ज्या मनःशांतीसाठीं व परम भक्तीसाठीं मी आसुसलेला होतों, ती कांहीं मला लाभली नाहीं, आणि श्रीरमणमहर्षी यांनीं मला सांगून टाकलें कीं तुझा सद्गुरू अन्यत्र कुठेंतरी आहे.'. स्वामीजींना महर्षींनीं आशीर्वाद दिला आणि स्वामीजीनीं पुन्हा सद्गुरूचा शोध चालू केला. गांवोंगांवीं भटकले, कैक साधूंचें दर्शन घेतलें, परंतु त्यांतल्या कांहीं जणांविषयी जरी त्यांना आदर वाटला तरी आध्यात्मिक आकर्षण मुळींच वाटलें नाहीं. केडगांवच्या श्री नारायणमहाराजांनाही ते भेटले; त्यांच्याविषयी त्यांना कांहींसें आकर्षण वाटलें. खऱ्याखुऱ्या भक्ताच्या वैशिष्टयपूर्ण श्रद्धेला व साध्यासुध्या वृत्तीला शोभेल अशी एक कसोटी त्यांनीं मनांत योजून ठेवली आणि श्रीनारायण महाराज हे आपले सद्गुरु आहेत कीं नाहीं याचा निर्णय घेण्यासाठी त्यांनी ही कसोटी उपयोगांत आणली. श्रीनारायण महाराज यांच्या सान्निध्यांत असतांना जवळच कांहीं चिमण्या चिवचिवाट करीत होत्या. स्वामीजींनीं मनाशीं ठरविलें कीं यांतली एकादी चिमणी जर श्रीनारायण महाराजांच्या डोक्यावर बसली तर श्रीनारायण महाराज हे आपले सद्गुरु असल्याचें आपण मानूं. त्यांतली एक चिमणी श्रीनारायणमहाराजांच्या डोक्यावरून अगदी थोड्या उंचीवरून गेली, परंतु त्यांच्या डोक्यावर मात्र बसली नाहीं, आणि म्हणून स्वामीजींनीं ठरविलें कीं श्रीनारायण महाराज आध्यात्मिकदृष्टया जरी मोठे असले तरी ते आपले सद्गुरु नव्हत. भौतिकवादाच्या दृष्टीनें हें करणें मूर्खपणाचें दिसेल, परंतु अथांग व अनन्य भक्तिप्रेमाच्या दृष्टीनें विचार केला तर स्वामीजींचा वैचारिक कल आपल्याला समजूं शकतो. कालिदास म्हणतोः—

**सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ।**

शेवटीं स्वामीजी भटकत भटकत शिर्डीला आले आणि त्यांनीं समाधिमं-

दिरांत बाबांच्या चरणांवर लोटांगण घातलें. त्याबरोबर त्यांना अमर परमात्म-स्वरूपीं विलीन होण्याचा अपूर्व अनुभव आला.

## शेवटीं गुरूचा शोध लागला

शेवटीं त्यांना आपला सद्गुरू सांपडला आणि सद्गुरूच्या कृपेनें त्यांना शांतीचा लाभ झाला. स्वतःसाठीं त्यांनीं चालू केलेला शोध अशा रीतीनें समाप्त झाल्यावर त्यानंतर त्यांनीं इतरांसाठीं आपलें जीवन व्यतीत केलें.

स्वामीजींच्या मनानें घेतलें कीं आपण बाबांच्या भक्तांचे अनुभव एकत्र जमवावेत आणि साधकांच्या फायद्यासाठीं त्यांचा प्रचार करावा. यासाठीं त्यांची भट-कंती चालू असतांना ते माझे एक अंतरंग मित्र व बाबांचे अनन्य भक्त पुण्याचे श्री. पुरुषोत्तम अवस्थी यांना भेटले. त्यांच्याकडून स्वामीजींना माझी माहिती कळली व मला बाबाचा सहवास कसा लाभला हें ऐकायला मिळालें. स्वामीजीनीं माझी भेट घ्यायची इच्छा दर्शविली, परंतु मला माझ्या सद्गुरुनें दिलेल्या आदेशाचें स्मरण होतें आणि मला प्रसिद्धी नको होती, म्हणून मी त्यांना भेटायचें टाळलें. परंतु ईश्वरी योगायोग असा होता कीं, माझी त्यांच्याशीं भेट व्हावी. १९३७ सालीं पुण्यात माझा थोड्या दिवसांचा मुक्काम असतांना श्री. अवस्थी यांनीं मला आपल्या बरोबर स्वामीजीच्या मुक्कामाच्या ठिकाणीं यायची गळ घातली. मी एका अटीवर कबूल झालों. ती अट अशी कीं मी कांहीं पावलें त्यांच्या मागे राहावें आणि त्यांनी माझा प्रत्यक्ष परिचय करून देऊं नये. त्याप्रमाणें श्री. अवस्थी स्वामीजीच्या खोलींत गेले आणि मी बाहेर वाट बघत थांबलों. स्वमीजींनीं श्री. अवस्थी यांना पहिला प्रश्न विचारला तो असा—"श्री. रेगे यांच्याशीं माझी भेट केव्हां होणार आहे?" आणि मग ते म्हणाले "तुझी त्यांच्याशीं लवकरच भेट होणार आहे असें बाबांनीच मला सांगितलें आहे." मी खोलीच्या दाराशीं आलों आणि स्वामीजी मला सामोरे आले आणि म्हणाले, "आपणच श्री. रेगे?" त्यानी मला बसायला सांगितलें. ते म्हणाले, "तुमची भेट घ्यायला मी आसुसलेला होतों. बाबांविषयीं तुम्हांला आलेल्या अनुभवांपैकीं कांहीं अनुभव तुम्ही मला सांगा." मी उत्तरलों, "सांगण्याजोगे असें माझ्याजवळ कांहींच नाहीं." हें ऐकल्यावर स्वामीजी चार रागाचे शब्द बोलतील किंवा निदान माझ्याकडे रागानें बघतील

अशी मी अपेक्षा करीत होतों. परंतु स्वामीजींची प्रतिक्रिया अर्थपूर्ण ठरली. ते म्हणाले, "मला भेटायला हवी होती अशी व्यक्ति तुम्हीच आहांत आणि बाबांनीं अखेरीस तुम्हांला माझ्याकडे धाडून तर दिलेंच आहे. आतांपर्यंत मी शेंकडों लोकांच्या भेटीगांठी घेतल्या आणि ते लोक आपल्याला बढत्या कशा मिळाल्या, आपल्या परिस्थितींत बदल काय झाले, बाबांच्या गूढ सामर्थ्याचीं प्रात्यक्षिकें आपल्याला काय काय पाहायला मिळालीं, इत्यादि अनुभव मोठ्या उत्साहानें सांगूं लागत. आणि मी बाबांना विचारलें, 'बाबा, तुम्ही नुसते जादुगारच आहांत काय ?' या मंडळींच्या सांगण्यात भक्ति प्रेमाच्या उमाळ्याची उणीव होती. आईची प्रीति किंवा परमेश्वराची प्रीति या बाबतींतले अनुभव कुणाला शब्दांनीं वर्णन करून सांगतां येतात का ? तुमच्या पुण्याच्या मुक्कामांत मी तुमच्या सहवासाचा लाभ घेणार आहें. त्या दिवशीं आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी केल्या आणि काय असेल तें असो, एका प्रश्नावरील चर्चेंत मी माझ्या इच्छेविरुद्ध ओढला गेलों आणि मी कांहीं तरी सांगायला प्रवृत्त झालों. दुसऱ्या दिवशीं सकाळी स्वामीजी एक पुस्तक व टाईप केलेले चार कागद घेऊन आले आणि मला म्हणाले, "तुम्ही तुमचे अनुभव सांगत नव्हतां, नाहीं कां ? पण बाबाच तुमच्या द्वारा माझ्याशीं बोलले आहेत." आणि नवीनच प्रसिद्ध झालेलें पुस्तक उघडून त्यांनीं त्यांतला एक उतारा वाचून दाखवला. त्यांत श्रीरमणमहर्षींची तंतोतंत तींच मतें नमूद केलेलीं होतीं. मग स्वामीजी मला म्हणाले, "मी तुमचें निवेदन प्रसिद्ध करणार आहें." पण मी स्वामीजींना म्हणालों, "या निवेदनाबद्दल मी स्वतःला जबाबदार समजत नाहीं, आणि तें माझें म्हणून प्रसिद्ध झालें तर तें माझें नव्हे, असा सत्याला स्मरून मला त्याचा इन्कार करतां येईल." तें निवेदन मागाहून टोपण नावानें प्रसिद्ध झालें, असा माझा समज आहे.

## स्वामीजींचें कार्य

काळानें आम्हाला एकमेकांच्या अधिक जवळ आणलें आणि इंदूर मुक्कामीं मला त्यांच्या सहवासाचा आनंद लाभला हें मी माझें भाग्य समजतों. इंदुरांत आणि आसपासच्या गांवीं त्यांनीं लोकांच्या गांठीभेटी घेतल्या व सभांमधून भाषणें केलीं. आणि त्याना हिंदी व मराठी अवगत नव्हतें तरी सुद्धां त्यांनीं मुद्राभिनयानें व आपल्या गोड साधेपणानें आणि कदाचित विचारसं-

क्रमणांच्या प्रक्रियेनें श्रीगुरुदेव बाबांच्या मोठेपणाचा महिमा ज्यांना ज्यांना ते भेटले व ज्यांच्या ज्यांच्या बरोबर ते बोलले त्या त्या सर्वांवर त्यांनीं ठसविला.

भक्तांचे अनुभव व इतर साहित्याची जमवाजमव केल्यानंतर श्रीसाई-बाबांच्या पंथाचा प्रचार करायचें स्वामीजींनी मनावर घेतलें. ते माझ्याजवळ याविषयीं बोलले आणि 'हें बाबांच्यावरच सोंपविलेलें उत्तम,' असें मी म्हणालों तेव्हां त्यांनीं आपले प्रयत्न यशस्वी व्हावेत म्हणून मला प्रार्थना करायला सांगितलें. मी उत्तरलों "कसलेंही मागणें मागायचें नाहीं असें मी बाबांना वचन देऊन चुकलों आहे." तेव्हां ते म्हणाले, "तुमच्या प्रार्थनेच्या खोलींत माझ्याबरोबर चला. तिथं मी माझं मागणं मागतों. मग तुम्हांला जें योग्य वाटेल तें तुम्हीं म्हणा." त्याप्रमाणें आम्ही दोघे माझ्या प्रार्थनेच्या खोलींत गेलों आणि त्यांची प्रार्थना झाल्यावर मी म्हणालों, "बाबा ! तुमच्या मनात जें सगळ्यांत चांगलं असेल तें करा. तुमच्या इच्छेप्रमाणें होऊं द्या." इंदूरहून स्वामीजी शिर्डीला गेले आणि मग त्यांनीं बाबांच्या प्रचारासाठीं सुमारें चौदा हजार रुपये येवढी रक्कम देणग्यांच्या रूपानें मिळविली. त्यांतला प्रमुख भाग मद्रासच्या एका चेट्टीकडून मिळाला. स्वामीजींनीं लगेच मला पत्रद्वारा सल्ला विचारला. मी उत्तरांत लिहिलें.— "आपण ही रक्कम शिर्डीच्या विश्वस्त समितीच्या हवालीं करावी, मात्र आपण ज्या प्रकारच्या प्रकाशनाचें उद्दिष्ट आपल्यापुढें ठेवलेलें आहे त्या उद्दिष्टाप्रीत्यर्थच ही रक्कम खर्च व्हावी अशी अट घालावी. परंतु हें जर शक्य नसेल तर आपण स्वतःच तात्पुरते विश्वस्त होऊन प्रचारकार्य चालू ठेवावें. १९५२ सालीं पुण्यांत साईभक्तांचें संमेलन भरलें. त्यावेळीं स्वामीजींनी मला खास निमंत्रण पाठविलें. आणि त्याच संमेलनांत वरील गोष्टीला अनुलक्षून स्वामीजी म्हणालेः– "अखिल भारतीय साईसमाज हा इंदूर येथील एक प्रार्थनेंतून अस्तित्वांत आला." मी अगोदर उल्लेखिल्याप्रमाणें शिर्डीचीं लौकिकदृष्ट्या कथा घडल्याचें श्रेय राधा-कृष्ण माताजींच्याकडे जातें आणि मी असें बिनदिक्कतपणें म्हणूं शकतों कीं शिर्डीच्या बाहेर बाबांच्या प्रभावाची जी गौरवगाथा घडली ती अगोदर श्री. बी. व्ही. नरसिंह अय्यर व मागाहून नरसिंहस्वामी या नांवानें प्रख्यात असलेल्या किरकोळ अंगयष्टीमध्यें अधिवास करीत असलेल्या पुण्यात्म्याच्या निःस्वार्थी कार्याचाच परिपाक होय.

स्वामीजींच्या जीवनापासून कोणकोणते धडे मिळतात, याचा मी विचार करूं लागलों म्हणजे पुढील गुणविशेष माझ्यासमोर उभे राहतात. गुरुदेवांवर अनन्य श्रद्धा; गुरुदेवांच्या व मानवजातीच्या सेवेप्रीत्यर्थ कमालीची कर्तव्य निष्ठा; वासनांचें संपूर्ण नियंत्रण; नम्रता; हीन अहंकाराचा नायनाट;—— म्हणजे भगवान् श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत जीं भक्तांचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांचें मूर्तिमंत चित्रच म्हणानात. स्वामीजी आतां शरीरानें आपल्यामध्यें नाहींत, परंतु त्यांचा आत्मा आपल्या गुरुदेवांप्रमाणेंच त्यांना मदतीसाठीं शरण आलेल्या सर्वांच्या आध्यात्मिक उद्धारासाठीं झटत राहील. माझी प्रार्थना येवढीच आहे कीं, ज्या मंडळींनीं स्वामीजींच्या कार्याची जबाबदारी पतकरलेली असेल त्यांनीं त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून चालावें व श्रीसाईबाबांच्या तत्वप्रणालीनुसार सर्वांचा मार्ग उजळावा.

—श्री साईबाबा मिशन--कोईमतूर यांच्या प्रेमळ सौजन्यानें.

---


साईभक्तांसाठीं संग्राह्य ग्रंथ

## शिरडीचे साईबाबा

( ले. डॉ. के. भ. गव्हाणकर )

ग्रंथाचीं पृष्ठें ३२५. मूळ किं. ७ रु. परंतु साईबाबांच्या सुवर्ण-ज्युबिली पुण्यतिथी निमित्त सवलतीची किंमत फक्त ५ रुपये. या प्रासादिक ग्रंथाची मागणी आजच करा. ही सवलत फक्त ता. १५ आक्टोबरपर्यंत. ग्रंथ पुढील पत्त्यावर मिळतील. (१) श्रीसाईबाबा संस्थान शिरडी साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ किंवा (२) डॉ. के. भ. गव्हाणकर, इंदिरा निवास, न्यू बॉंबे आग्रा रोड, कुर्ला, मुंबई ७०

# बाबासंबंधीं माझ्या कांहीं आठवणी

लेखक : श्री. नानासाहेब अवस्थी

**श्रीसाईबाबांच्या प्रत्यक्ष सहवासांत आलेले भक्त आतां फारसे आढळून येत नाहींत. बाबांना समाधिस्थ होऊन आतां पन्नास वर्षें होत आलीं आहेत. बाबांच्या सहवासांत आलेल्या व आज हयात असल्यापैकीं त्यांचे दोन प्रमुख भक्त म्हणजे प्रस्तुत लेखाचे लेखक श्री. नारायण पुरुषोत्तम ऊर्फ नानासाहेब अवस्थी व दुसरे इंदूरचे सेवानिवृत्त न्या. मू. श्री. बाळासाहेब रेगे हे होत. या दोन्ही भक्तांचे लेख बाबांच्या सुवर्ण ज्युबिली पुण्यतिथीनिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या साईलीला विशेषकांत आम्हीं देऊ शकलों, याचा आम्हांला आनंद होत आहे.** —संपादक.

मला साईबाबांचा प्रत्यक्ष असा सहवास ४।५ वर्षेंच लाभला. त्या काळांत मी जें कांहीं पाहिलें आणि अनुभवविलें त्यावरून मीं बाबांची गणना अवतारी महाभागांत करतों. जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानी होते, लोकांत अनीति अनाचार वाढूं लागतो, त्या त्यावेळीं जनतेच्या उद्धारासाठीं भगवंत अवतार घेऊन, अवनीतलावर अवतीर्ण होत असतो.



श्री. नानासाहेब अवस्थी

**बाबा अवतरी महापुरुष**

साईबाबांचें एंकदर जीवनकार्य पाहिले व लक्षांत घेतलें म्हणजे याची प्रचीति आल्याशिवाय रहात नाही. चुकीच्या मार्गानें जाणाऱ्या असंख्य लोकांचें बाबानीं योग्य तें मार्गदर्शन केलें. अनेकांस संकटमुक्त केलें व सर्वांना भक्तिमार्गाकडे वळविण्यासाठी ते झटले. त्यांचें अंतःकरण अत्यंत दयाळू होतें. संकटांत किंवा दुःखांत असलेला कोणीही जवळ आला असतां' अल्ला तेरा भला करेगा' असा आशीर्वाद ते देत असत आणि त्याप्रमाणें घडत असे.

१९१४ सालापासून आमचा व आमच्या कुटुंबीयांचा साईबाबांशीं संबंध आला. तेव्हांपासून आजतागायत आम्हीं त्यांच्या आशीर्वादाच्या छायेखालीं सुखासमाधानांत वावरत आहोंत.

**माझे वडील आणि बाबा**

माझे वडील पुरुषोत्तम अवस्थी हे एक सच्छील व साधुवृत्तीचे गृहस्थ होते. साधेपणा व पावित्र्य त्यांच्या रोमरोमांत भिनलें होतें. ते एकनिष्ठ भक्तिमार्गी होते. भगवद्गीता हा त्यांचा आवडता ग्रंथ होता. ते मोठे अधिकारी होते; परंतु अत्यंत नम्र, परोपकारी व खरेखुरे कर्मयोगी होते. साईबांबाच्या सान्निध्यांत आल्यापासून ते त्यांचे परम भक्त बनले.

त्याचें असें झालें ते इंदूर संस्थानांत न्यायाधिकारी होते. तेंथें श्री. बाळासाहेब रेगे ( श्री. एम्. बी. रेगे ) हेही न्यायखात्यांत वरिष्ठ जागीं होते. ते साईबाबांचे अत्यंत निष्ठावान् भक्त होते. १९१४ सालीं एके दिवशीं बाळासाहेब रेगे यांच्याबरोबर शिरडीस जाण्याचा योग माझ्या वडिलांच्या आयुष्यांत जुळून आला. बाबांच्या पहिल्याच भेटींत माझे वडील भक्तीभावानें भारावून गेले. त्यांच्यावरील त्यांची निष्ठा किती जाज्वल्य होती हें शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं. साईबाबा त्यांना प्रति भगवंताप्रमाणें वाटूं लागले. त्यांना जिकडे तिकडे साईबाबा दिसूं लागले; इतके ते बाबाशीं तन्मय होऊन गेले होते.

**चमत्कार कशासाठीं?**

आपल्या भक्तांच्या अंतःकरणांत भक्तीचें बी रुजावें व त्यांचें कोटकल्याण व्हावें, या हेतूनें सत्पुरुष कधीं कधीं चमत्कार करून दाखवीत असतात. तुमच्या मनांतील गोष्टी सांगून तुम्हांला भक्तीकडे वळवीत असतात. असे चमत्कार माझ्या वडिलांच्या नि माझ्या आयुष्यांत अनेक घडले. अनेक संकटांतून त्यानीं आम्हांला मुक्त केलें.

१९१६ सालीं मी मुंबईंत गेलों असतां आमचे मित्र उपरिनिर्दिष्ट बाळासाहेब रेगे हे मुंबईंत आपल्या वडिलांस व कुंटुबियांस भेटण्यासाठीं गेले असल्याचें मला समजलें होतें. त्यामुळें त्यांना भेटण्यासाठीं मी त्यांच्या मुंबईंतील घरीं गेलों. तेव्हां त्यांच्या वडिलांकडून मला समजलें कीं बाळासाहेब हे शिरडीस, दोन दिवसांनीं येतों, म्हणून सांगून बाबांच्या दर्शनासाठीं गेले आहेत. परंतु एक

आठवडा होऊन गेला तरी ते परत आले नाहींत. त्यामुळें साहजिकच घरची मंडळी काळजींत होती. मी शिरडीस जाऊन त्यांची चाकशी करून त्यानां घेऊन यावें अशी मला विनंती करण्यांत आली. शिरडीस जाण्याची मलाही उत्कंठा लागून राहिली होती. ती विनंती मी आनंदानें झेलली. आणि शिरडीस निघालों.

**पन्नास वर्षांपूर्वींची शिरडी**

१९६८ ची आजची शिरडी आणि बावन वर्षांपूर्वींची १९१६ सालांतील शिरडी यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर असल्याचें आढळून येईल. शिरडींत त्याकाळीं कोणत्याही प्रकारची सुखसोय नव्हती. पोस्ट नव्हतें, तारकचेरी नव्हती, आणि कांहीं नव्हतें. तरीही बाबांमुळें त्या गांवचें दूरदूरच्या भागांतील लोकांनाही भारी आकर्षण वाटायचें. आज तर वाटतेंच आहे; परंतु तो काळ आपण लक्षांत घ्या.

मी रात्रींच्या गाडीनें निघून दूसऱ्या दिवशीं शिरडीस पोहोंचलों. जाण्यापूर्वी बाबा नेहमींच्या पद्धतीप्रमाणें 'दक्षणा' मागतील म्हणून त्यांच्या नावें एका खिशांत दहा रुपये ठेऊन दिले होते. बाबांच्या दर्शनासाठीं मी मशिदींत जाण्यासाठीं निघालों तेव्हां काकासाहेब दीक्षित बाबांच्या दर्शनासाठीं निघाले होते ते मला भेटले; त्यांच्याकडून समजलें कीं, बाबांची परवानगी मिळवून काल रात्रींच्या गाडीनें बाळासाहेब रेगे मुंबईस निघून गेले.

काकासाहेब दीक्षितांनीं मला सांगितलें कीं, बाबा तुमची वाट पहात आहेत. काल सायंकाळीं ते मला तुम्हीं येणार असल्याचें बोलले!

**दहा रुपये दक्षणा**

नंतर काकासाहेबांसमवेत मी द्वारकामाईंत गेलों व भक्तिभावपूर्वक बाबांच्या चरणकमळांवर मस्तक ठेऊन त्यांना वंदन केलें. मला पाहून बाबा हंसले. आरती सुरू होऊन ती संपल्यावर बाबानीं माझ्याकडे दक्षणेची मागणी केली; व मी ती आनंदानें दिली. पुन्हां सायंकाळींही त्यानीं दक्षणा मागितली.

मी म्हटलें, "तसे देण्यासारखे रुपये माझ्याजवळ नाहींत. कांहीं चिल्लर असेल."

"अरे खिशांत पहा तर खरें शोधून!" बाबा म्हणाले.

खिशांत हात घालून सर्व नाणीं मोजून पाहिलीं तीं बरोबर दहा रुपयांचीं निघालीं !

तीं नाणीं हातांत घोळवीत बाबा पुन्हां पुन्हां म्हणाले! "अल्ला तेरा भला करेगा!"

**पुन्हां दहा रुपये**

त्यानंतर मी निघतांना बाबांचा निरोप घ्यायला गेलों तेव्हां मला आशीर्वाद देऊन ते म्हणाले, "घरीं गेल्यावर दहा रुपये पाठवून द्यायचे बरं का!"

आणि खरं सांगायचं म्हणजे मी घरीं गेल्यावर बाबांना दहा रुपये पाठविण्याचा निर्धार मनाल्या मनांत केला होता.

बाबांच्याठायीं माझी एकट्याची श्रद्धा आहे असें नसून माझ्या कुटुंबांतील सारी लहान थोर मंडळी बाबांचे भक्त आहेत. कारण त्या प्रत्येकास कांहींना कांहीं अनुभव आले आहेत.

माझ्या साऱ्या आयुष्यांत चढउताराचे प्रसंग पुष्कळ आले; परंतु बाबांवरील माझी निष्ठा तिळमात्र ढळलेली नाहीं; त्यानींच वेळोवेळी माझें रक्षण केलें अशी माझी श्रद्धा आहे. सुमारे पांच वर्षांपूर्वी माझा एक मुलगा मला सोडून गेला. या वयांत तें दुःख सहन करणें फार कठीण होतें. परंतु बाबांच्या कृपेनें त्या दुःखावर मी विजय मिळवूं शकलों.

**मद्रासचें साईभक्त संमेलन**

सुमारें दोन महिन्यापूर्वी मद्रास येथें अखिल भारतीय साईभक्त संमेलन भरलें होतें. माझे स्नेही व साईभक्त श्री. बाळासाहेब रेगे यांच्याप्रमाणें मलाही त्या भागांतील प्रमुख साईभक्तांनीं आग्रहानें आमंत्रिलें होतें. माझें काय किंवा श्री. रेगे यांचें काय; हें वय दूरवरचा प्रवास करण्याचें नसूनही केवळ साईबाबावरील भक्तिप्रेमामुळें आम्हीं मद्रासला गेलों. मी तर पुण्याहून एकटाच निघालों; परंतु माझा प्रवास सुखकर होऊन तेथें गेल्यानें त्या मंडळीला आमच्या आगमनामुळें अतिशय आनंद झाला.

हें जें घडलें, तें केवळ बाबांच्या कृपेमुळे घडलें. आम्हीं त्यांच्यावर भरिभार टाकला पाहिजे, म्हणजे तेचे आम्हांला संकटमुक्त करणारें आहेत, आम्हीं सर्व त्याच्या हातांतील बाहुलीं आहोंत. त्यांच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेऊन वागूया. आमच्या कल्याणाचा मार्ग तेच दाखवितील.

**आणखी कांहीं अनुभव**

प्रत्यक्ष भेटींत श्री. नानासाहेब अवस्थी यांनीं सांगितलेल्या अनुभवांपैकीं आणखी १।२ अनुभव पुढें देण्यांत येत आहेतः—

( या पुढील मजकूर पान ६६ वर )

# लंडन येथील श्रीसाईबाबा केंद्र

## बाबांच्या पादुकांची विधीपूर्वक स्थापना



**डावीकडून पहिल्या व उभ्या श्रीमती आजीबाई बनारसे बाबांच्या पादुका प्रस्थापनप्रसंगीं लंडनमध्यें घेण्यांत आलेलें छायाचित्र.**

---

लंडनमध्यें साईभक्त श्रीमती आजीबाई बनारसे यानीं, २५ डूप लेन गोल्डर्स ग्रीन, लंडन, येथें गेल्या काहीं वर्षांपासून श्रीसाईबाबा केंद्र भक्तिभावपूर्वक स्थापन केलें असून त्या केंद्रस्थानीं बाबाच्या प्रासादिक पादुका स्थापना करण्याची त्यांची गेल्या ३।४ वर्षांपासून इच्छा होती. तो योग बाबांच्या कृपेनें व

( पुढील मचकुर पृष्ठ ६५ वर )

# श्री साईबाबा—शिर्डीचा अमर संत

लेखिकाः — श्रीमती मणी साहुकार

उच्चतर जीवनाची आकांक्षा धरणें हें आर्य भारतीय संस्कृतीचें आवश्यक लक्षण आहे आणि हेंच मागाहून भारताची आध्यात्मिक धर्मश्रद्धेचें मध्यवर्ती ध्येय होऊन बसलें. आध्यात्मितेकडे झुकलेला कल हाच भारताचा कर्ताधर्ता होऊन राहिला आणि भारत जो चिवटपणें टिकून राहिला तो याच कारणामुळें. कांहीं विशिष्ट मूलभूत मूल्याविषयीं अढळ श्रद्धा बाळगणें ही भारताची अतूट परंपरा आहे. परमेश्वरानें भूतलावर अवतार घेणें आणि मानवानें ईश्वरी पूर्णत्वाच्या पदावर चढून जाणें—हे आमच्या कर्माचे दोन त्रिकालाबाधित सिद्धांत आहेत. अशा मानवातीत सर्वोच्च कोटींत प्रकट झालेल्या व्यक्तींमध्यें साईबाबा हे दिव्य प्रकाश आणि स्फूर्ती यांचें अत्यंत प्रभावी प्रतीक म्हणून ठळकपणें विलसत आहेत.

१८५८ सालांतला एक प्रसंग. पवित्र गोदावरी नदीच्या जवळ जवळ तीरावर वसलेलें अहमदनगर जिल्ह्यांतलें शिर्डी हें यःकश्चित् क्षुद्र चिमुकलें खेडें. या खेड्यांतल्या रस्त्यावरून एक लग्नाची वरात मिरवत चाललेली होती. या लग्नांतल्या वऱ्हाडी मंडळीसमवेत सोळा वर्षे वयाचा एक युवकही आलेला होता. याचा देखणा चेहरा व याच्या व्यक्तिमत्त्वांतून ओसंडत आलेलें असामान्य तेज पाहून खेड्यांतील साधासुध्या लोकांचे लक्ष त्याच्याकडे वेधलें. हा युवक शिरडींत तीन वर्षे राहिल्यावर तिथून जो एकाएकीं गायब झाला तो पुन्हां चार वर्षांनंतर तिथेंच प्रगट झाला आणि त्यानंतर सतत साठ वर्षांच्या अबिछिन्न दीर्घकालीन मुदतींत त्यानें याच आपल्या पसंतीच्या गांवीं वास्तव्य केलें. हा विलक्षण पोऱ्या आला कोठून आणि तो कोणाचा कोण होता—याचा कुणालाच पत्ता नव्हता. पण काय असेल तें असो, माणसाला परमेश्वरानें अशा एका अतींद्रिय शक्तीनें संपन्न करून ठेवलेलें आहे कीं त्या शक्तीच्या बळावर त्याला आपल्या संपर्कांत आलेला एकादा महात्मा नेमका ओळखतां येतो. या युवकाच्या ठायीं असलेलें अंगभूत तेज लवकरच त्यांच्याकडे लोकांना आकर्षित करून घेऊं लागलें. मधमाशा जशा पुष्पपरागांकडे आकर्षित होतात, तशांतलाच हा प्रकार होता.

प्रेमभरानें सर्वजण त्याला साईबाबा म्हणूं लागले व या युगांतला परमेश्वराचा अवतार म्हणून लोकांनी त्याची ग्वाही फिरविली. अशा रीतीनें भारताच्या भूमीला पुनीत करणाऱ्या संतामध्ये भक्ति प्रीतीचा सर्वश्रेष्ठ प्रेषित म्हणून एका क्षणांत शिरडीचे अमर संत साईबाबा यांचें पुनरुत्थान झालें.

अंगांत एक लांबलचक कफनी, हातांतले एकमेव भिक्षापात्र. हीच कायती यांची दौलत. हा तरुण योगी एका लिंबोणीच्या झाडाखालीं धुनी पेटवून बसत असे. धुनी अजूनही सतत धगधगते आहे. कारण त्यांनीं पेटविलेली ही धुनी नसून अमरज्योतीच आहे. सतत उंच उंच ज्वाळा वर फेंकत असलेली अशी ही अमरज्योति आहे. साधकाच्या नवनवोन्मेषशाली शोधक बाण्याचें हें मूर्तिमंत प्रतीक आहे. भूक लागली म्हणजे साईबाबा शिर्डी गावांत भिक्षा मागायला बाहेर पडत असत. कधीं कधीं असें होई कीं एखादी तक्रारिणी गृहिणी त्यांना भिक्षा घालायला नकार देई. मग बाबा तिची सौम्य शब्दांत कानउघाडणी करण्यासाठीं तिला म्हणत "माझे आई, तूं आज अमुक इतक्या चपात्या लाटल्यास, अमुक पातेल्यांत अमुक इतका भात केलास, अमुक भगुण्यांत अमुक प्रकारची अमुक इतकी भाजी शिजवलीस, मग एका फकीराला पोटभर अन्न द्यावयाला कां ग जड जातंय ?" कान उघडणी, सौम्य भाषा व या विलक्षण फकीरानें आपल्या स्वयंपाकाचें केलेलें एवढें बिनचूक वर्णन ऐकून या साध्या भोळ्या ग्रामीण गृहिणींच्या डोळ्यांवरचीं ढापणें खाडकन दूर होत असत आणि मग त्या आपल्या भक्तिभावाचा नैवेद्य म्हणून घाईघाईनें घरांतला सगळा स्वयंपाक बाबांच्या चरणीं अर्पण करीत असत.

बाबांनीं एकदां आपल्या लामण दिव्यांत तेलाऐवजीं पाणी भरून ठेवलें. आणि वाती पेटवितांक्षणीं त्या तेलांत भिजल्यासारख्या प्रकाश देऊं लागल्या. त्यांच्या अनेक जुन्या जुन्या भक्तांनीं या चमत्काराची खातरजमा केलेली आहे. या भक्तांच्या अप्रामाणिकपणाबद्दल काडीइतकाही संशय घ्यायला जागा नाहीं. त्याचें असें झालें, साईबाबांनीं आपल्या मंदिरांत दोन लामणदिवे लावायचा नित्यक्रम चालू ठेवलेला होता. या लामण दिव्यांसाठीं लागणारें तेल आसपासच्या खेड्यांतील दुकानदारांकडून जमा करून ते आणत असत. पण एके दिवशीं दुकानदारांनीं हें अल्पसें दान बाबांना द्यायचें नाकारलें. वस्तुतः हे दुकानदार चांगलेच सधन

होते. या अजब संतानें त्या लामणदिव्यांमध्यें पाणी भरलें आणि वाती पेटविल्या ............आणि काय चमत्कार ! वाती तेलांत भिजविल्यासारख्या उजेड देऊं लागल्या आणि जणूं काय त्या कद्रू दुकानदारांना आव्हान देत त्या रात्रभर झगझगीत जळत राहिल्या. मात्र हे दुकानदार मागाहून बाबांचे एकनिष्ठ अनुयायी झाले, ही गोष्ट वेगळी.

या महान् अवताऱ्याच्या हातून चमत्कारांमागून चमत्कार घडूं लागले. विलक्षण आणि थक्क करून सोडणारे चमत्कार. येशू ख्रिस्ताच्या काळांत घडलेल्या चमत्कारांची अशी पुनरावृत्ति आजपर्यंत कधींच घडलेली नसेल. श्रीसाईबाबांनीं या चमत्कारांचा उपयोग बहुजन समाजाला आध्यात्मिक निष्क्रियतेंतून करून घेण्याचीं प्रभावी साधनें म्हणून केला. अपार करुणेनें प्रेरित होऊन बाबा सांगत " उपाशी पोटीं तडफडत आलेल्यांना किंवा दुःखानें व शोकानें हैराण झालेल्यांना आध्यात्मिक मुक्तीचा शोध करायला सांगण्यांत कांहीं एक अर्थ नसतो. आजाऱ्यांना रोगमुक्त करणें आणि अन्य कारणांनीं जे दुखावलेले असतील त्यांचें दुःख हलकें करून त्यांना सांत्वना देणें हें माझें जीवितकार्य आहे. " आणि म्हणूनच भक्तिप्रेमाचा हा प्रेषित सामान्य जनांच्या आर्त हांकेला कसलेही आढेवेढे न घेतां साद घालीत असे. कारण सामान्य माणसाच्या लेखीं ऐहिक आपत्तीचें निवारण हें कुणाच्या तरी दूरवरच्या आध्यात्मिक प्रकाशाच्या प्राप्तीपेक्षां अधिक महत्वाचें असतें. परंतु साध्यासुध्या मर्त्य मानवांच्या मामुली गरजांचें चोज पुरविण्याच्या या व्यक्तिपाठीमागें आध्यात्मिक पुनरुज्जीवनाचा सखोल उद्देश सूक्ष्म स्वरूपांत तरळत होता. कारण बाबांची दक्षता अशी असते कीं आधिभौतिक सुखसोईच्या आशेनें जो कोणी प्रथम आपल्याकडे येईल त्याला लवकरच या सुखांविषयींची आसक्ति वाटेनाशींच व्हावी, शेवटीं या भक्ताला आपल्या परमप्रिय गुरूशीं एकरूप होण्याचीच तेवढी एकमेव आसक्ति वाटत राहावी. म्हणून बाबांच्या हातून घडलेला सगळ्यांत मोठा चमत्कार म्हणजे ज्यांना ज्यांना या सत्पुरुषाचा कृपाप्रसाद लाभलेला असेल त्यांच्यामध्यें आमूलाग्र आध्यात्मिक परिवर्तन घडून येणें, हाच असतो.

या महायोग्याची भेट सर्वांना सदैव सुलभ असे. आपले महत्त्वाचे म्हणा बिनमहत्वाचे म्हणा, कसलेही प्रश्न घेऊन स्त्री पुरुषांनीं केव्हांही त्यांच्याकडे जावें. बहुधा सगळा वेळ बाबा एका मोठ्या पडवीच्या दालनांत बसलेले असत आणि

आपल्या भक्तांच्या शारीरिक व आध्यात्मिक अडी अडचणींकडे लक्ष देत असत. या दालनाला त्यांनीं " द्वारका मायी " असें नांव दिलेलें होतें. द्वारका म्हणजे दया, करुणा, आणि मायी म्हणजे ओतप्रोत भरलेली. तें दालन खरोखरीच असें होतें—करुणेनें ओतप्रोत भरलेलें होतें. आणि अजून देखील या दालनांत बाबांच्या करुणामय संरक्षणाची भावना ओतप्रोत भरलेली प्रत्ययाला येते.

साईबाबांना शास्त्रें, पुराणें, कुराण आणि इतर धार्मिक ग्रंथांचें ज्ञान येवढें सूक्ष्म होतें कीं कांहीं सांगायची सोय नाहीं. हें सगळें ज्ञान त्यांच्या ठायीं आलें कुठून ? हा महायोगी अगदीं लहानपणापासून कांहीं वाचन वा अभ्यास करीत असलेला कुणीही पाहिलेला नाहीं. म्हणजे हा महायोगी साक्षात् ज्ञानाचा अवतारच होता हें उघड दिसतें. कुणी पंडित एकाद्या तात्विक मुद्याचें स्पष्टीकरण करून घेण्यासाठी साईबाबांना भेटायला गेले कीं तें विशिष्ट तत्व ग्रथित करणारा नेमका श्लोक वा चरण बाबा म्हणून दाखवूं शकत. हें ऐकून त्या पंडितांची मति अक्षरशः गुंग होऊन जाई. त्या काळांतला बाबांचा दरबार हा अशा प्रकारचा होता. या महायोग्याच्या सान्निध्यांत एक क्षण देखील कधी कंटाळवाणा होत नसे. बाबांचें व्यक्तिमत्व मोठें मोहक होतें. त्यांच्या बोलण्यांत मर्मग्राही विनोदी वृत्ति जाणवत असे. सगळें वातावरण प्रसन्न व तेजस्वी. आध्यात्मिकतेमुळें भारावलेलें असे आणि ही आध्यात्मिकता करुण व हास्य रसाच्या द्वारा आपल्या अस्तित्वाचा प्रत्यय आणून देई. तिथल्या त्या आडगांवीं या भक्तप्रिय संतांच्या ज्या स्फूर्तिदायक लीला व उपदेशकथा चालू होत्या त्या हळू हळू सर्वतोमुखीं होऊं लागल्या आणि देशाच्या सर्व भागांतून शेंकडों भाविक भक्त त्यांच्याकडे धांव घेऊं लागले. कुणी त्यांच्या कारुण्यमय मूर्तीचें वर्णन करूं लागले. कुणी त्यांच्या व्याधिहारक स्पर्शांच्या प्रभावाविषयीं व दैवी सर्वज्ञतेविषयीं वेड्यासारखे बरळत सुटले. जे जे कोणी आध्यात्मिक मार्गदर्शनासाठीं बाबांच्या दर्शनाला गेले त्यांना त्यांना आध्यात्मिक प्रगतीचा प्रचंड टप्पा गांठता आला. अशा प्रकारें एका कोपऱ्यांतले खेडेगांव शिर्डी हें एका प्रचंड आश्रमाचें केंद्रस्थान बनलें, आणि आज तें श्रीसाईबाबा संस्थान म्हणून प्रख्यात झालें आहे.

करुणेचा येवढा विस्मयकारक अपार वर्षाव करणाऱ्या साईबाबांनीं मोक्षाचा मार्ग म्हणून भक्तिमार्गच पसंत करावा ही गोष्ट सर्वस्वीं स्वाभाविक

ठरते. खरी गोष्ट अशी आहे कीं, साईबाबा या भूतलावर अवतरल्यानंतर पारंपारिक भक्तिमार्गाचें प्रचंड प्रमाणांत पुनरुज्जीवनांत झालेले आपल्याला दिसूं लागले. बाबांनी भक्तिमार्गाला जी सामर्थ्यशाली प्रेरणा दिली तिची पुढची परिणति त्यांच्या पश्चात् त्यांच्या दोघां तेजस्वी वारसदारांनीं चालू ठेवलेली आहे. त्यांतले पहिले म्हणजे श्रीउपासनी बाबा हे १९४१ झालीं समाधिस्थ झाले आणि दुसऱ्या म्हणजे सती गोदावरी माताजी; ह्या आज भक्तिमार्गाच्या सर्वश्रेष्ठ हयात विवरणकार म्हणून विद्यमान आहेत.

गुरूला संपूर्णपणें शरण जाणें हीच सगळ्या साधनांमध्यें अत्यंत सामर्थ्यशाली साधना म्हणून श्रीसाईबाबांनीं तिचा पुरस्कार केला. 'नुसतें साई, साई. असें नामस्मरण करीत तुझें अंतःकरण तुडुंब भरून वाहूं दे, म्हणजे पुढचें जें काय करायचें तें माझ्याकडे लागलें.' हा बाबांचा करुणामय आदेश आपण कृतज्ञतापूर्वक ध्यानांत बाळगत असतों. तारीख १५ ऑक्टोबर १९१८ रोजीं साईबाबांनीं शांतपणानें व कुणाच्या ध्यानांतही येणार नाहीं अशा रीतीनें आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. त्यांनीं स्वतःला नेमून दिलेल्या प्रेमकार्याची साठ वैभवशाली वर्षांची अगदींच अल्प कारकीर्द अचानक समाप्त झाली.

आयुष्याच्या अखेरच्या कांहीं वर्षांमध्यें बाबा आपल्या भक्तांना जवळ जवळ मातेच्या वात्सल्यानें सांगत असत. 'माझ्या देहाचें अवसान झाल्यावर तुम्ही दुःख करूं नका. माझी समाधि जिवंत राहील. हालचाल करील.जे जे कोणी मला अनन्यभावानें शरण जातील त्या त्या सर्वांशीं ती बोलेल. ज्या क्षणीं माझा भक्त मला अंतरींच्या भक्तीनें व प्रेमानें साद घालील, त्या क्षणीं मी त्याला साथ देईन. आणि भाग्याची व सौख्याची गोष्ट अशी कीं आज जरी आपण त्यांच्या महासमाधीचा ५० वा वर्षदिन साजरा करीत आहोंत तरी साईबाबांनीं दिलेलीं वचनें उदंड प्रमाणांत पाळलेलीं आहेत. अर्ध शतकाच्या दीर्घ कालखंडानंतरही बाबांचा अमर दिव्य संदेश वर्षांनुवर्षें भक्तांच्या कर्णसंपुटांत निनादत आहे. ' हा पहा मी सदैव तुझ्या पाठीशींच आहे.' हाच तो संदेश.

# व्यवहारी संत साईबाबा

लेखक : श्री. त्रिभुवन तिवारी, एम्. ए. एल्‌एल. बी.
( मध्यप्रदेश सरकारचे दुय्यम सचिव )

या परमपावन भरत भूमीनें वेळोवेळां अनेक चांगले चांगले संत निर्माण केले आहेत. गेल्या पन्नास वर्षांमध्यें देखील या भूमींत कैक संत निर्माण झाले, परंतु त्यांतले केवळ तीनच संत बहुजनसमाजामध्यें प्रभावी ठरले. पहिले महाराष्ट्र राज्यांतील अहमदनगर जिल्ह्यांतल्या शिर्डीचे साईबाबा हे या देशाच्या क्षितिजावर उदय पावले आणि त्यांनीं गरीब—श्रीमंत, सुशिक्षित—अशिक्षित, या सर्वांचींच, हृदयें सारख्याच प्रमाणांत काबीज केलीं. दुसरे म्हणजे पाँडेचरीचे अरविंदबाबू. यांनीं जागतिक शांतता व मानवजातींत बंधुभाव निर्माण करणें व त्यांच्या प्रीत्यर्थ अतींद्रिय ज्ञानावरून भूतलावर आणण्याच्या कार्याला स्वतःला वाहून घेतलें. हे होते प्रकांड पंडित. यांनीं भारतीय तत्त्वज्ञानाच्या मूलतत्त्वांचे विवरण करणारे कैक ग्रंथ लिहिले. जगाच्या सध्यांच्या गरजांना उपयुक्त ठरतील अशा रीतीनें त्यांनीं या मूळ तत्त्वांना मुरड घातली. तिसरे म्हणजे अरुणाचलम्‌चे महर्षि यांनीं ‘ कोऽहं ? कोऽहं ? ’ असें आपण एकसारखें स्वतःला विचारीत राहिलों म्हणजे आपल्याला आत्मप्रतीती साधतां येते अशा सूत्राचा प्रचार करून आत्म्याचा शोध सोपा करून ठेवला आणि अशा रीतीनें हे साध्या “साधने”चें ते आदर्श होऊन बसले. “कोऽहं ?” या प्रश्नाचा जप केल्यानें सगळे गुंते उलगडात हें यांनीं दाखवून दिलें.

साईबाबांनीं एक साधी रीत अंगिकारिली. त्यांनीं मोठमोठे ग्रंथ नाहीं लिहिले. “आत्मा” शोधून काढण्याप्रीत्यर्थ तांत्रिक चर्चेच्या महासागरांत ते बुड्या मारत नाहीं राहिले. त्यांनीं व्यावहारिक प्रात्यक्षिकांच्या योगानें बहुजन-समाजाला मार्ग दाखवून दिला. कसला मार्ग ? कोणता मार्ग ? जीवनाचा मर्मस्पर्शी अर्थ काय असतो ? येरव्हीं असाध्य ठरलेल्या गोष्टी निर्मळ मनानें आणि प्रवित्रता, मानवसेवा व प्रेम यांच्यावर आधारलेल्या साध्या राहणीनें कशा सहज उपलब्ध व साध्य होऊं शकतील हाच.

या सिद्धी मिळविण्याचा मार्ग साईबाबांनीं प्रात्यक्षिकांसह दाखवून दिला. "साधने", साठीं कसलेही विशिष्ट प्रकारचे नियम त्यांनीं घालून दिले नाहींत. त्यांनीं निर्बंध कसलेच ठेवलेले नव्हते. जातिधर्मपंथ राहिले खालच्या पातळीवर आणि साईबाबा स्थिरपद होते. त्याच्याहून वरच्या पातळीवर होते कारण परमेश्वर सर्वांसाठीं एकच असतो, कीं वेगवेगळ्या धर्मांचे अनुयायी, मग ते हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी वगैरे कोणत्याही धर्माचे असोत, हे सगळे आपापल्या विशिष्ट धर्मपालनाचें स्वातंत्र्य कायम ठेवून एकजुटीनें साईबाबा "साधना" पंथांत गर्दी करूं लागले. जिथे बाबांची धुनी अहोरात्र धगधगत ठेवलेली असते. ती मूळची मशीद होती आणि आतां तिची द्वारकामाई झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जे एकाच धर्माचे अनुयायी त्या धर्मांच्या कांहीं विशिष्ट तपशीलाबाबत आपसांत जीव तोडून लढत असलेले दिसतात, ते साईबाबांनीं जें दिलें असेल त्यावर मात्र एकनिष्ठपणें श्रद्धा ठेवतात आणि त्याबाबत कसलाही ओरडा आरडा करीत नाहींत. साईबाबांचें अंतःकरण दुःखी मानवजातीविषयीं करुणेनें तुडुंब भरलेलें असे. त्यांच्या या सहानुभूतीची प्रचीती शब्दांनीं नसे व्यक्त होत. व्यावहारिक दाखल्यांच्याद्वारा ती व्यक्त होत असे. कुत्रीं देखील त्यांच्या भोजन थाळींतील आपला अन्नाचा हिस्सा खात असत. ही थाळी म्हणजे एक मातीचा हात होता. पक्षीं देखील या भोजनांत समान हक्कानें भागीदार होत असत. एकदां कुणी तरी एक अगदीं मरायच्या बेतांत असलेला सिंह बाबांच्याकडे आणला. बाबांची करुणा सर्वस्पर्शी होती. त्यांनीं स्वतः जरी गरीब "फकिरा"चे वा भिकाऱ्यांचें "भिक्षा," मागायचें जीवन स्वखुषीनें पत्करलेलें होतें तरी त्यांनीं दुःखपीडित जनतेला संपत्ति, आरोग्य व जें हवें असेल तें सगळें मुक्तहस्तानें बहाल केलें. अत्यंत श्रीमान लोक देखील भिक्षेकऱ्याप्रमाणें त्यांच्या चरणीं लोळण घेत असत. जो जो कोणी शिर्डीला जाईल तो तो "रिक्त हस्तानें," परत येणार नाहीं, अशी बाबांची प्रतिज्ञा होती. 263

'जाणा येथें सहाय्य सर्वांस । मागे जें जें त्यांस ॥ तें तें लाभे ।' असें बाबांनीं ठासून सांगून ठेवलें होतें. जे जे कोणी त्यांच्याकडे जातील त्यांना त्यांना मदत करायला बाबांचे दरवाजे सदैव सताड उघडे असत. अशा भक्तांच्या दुःखीकष्टी अवस्थेच्या काळांत बाबा सदैव त्यांना साथ देत असत.

त्यांच्या जखमा बऱ्या करीत असत. व त्यांचें संरक्षण करीत असत. बाबांची उदी अतींद्रिय सामर्थ्याचे चमत्कार प्रात्यक्षिक स्वरूपांत करून दाखवी. म्हणून इतर संतांशीं तुलना करतां साईबाबांचे आकलन बहुजनसमाजाला सहज झालें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे साईबाबा हे बहुजनसमाजाचे संत होते. सध्याच्या जगांत जिकडे तिकडे आपसांतला द्वेष, झगडे, अंदाधुंदी माजलेली असतांना साईबाबांचें नांव खळवळलेल्या सागरांतील उंच दीपस्तंभाप्रमाणें आपल्या प्रभेचा प्रभाव पाडीत आहे. कारण जागतिक शांतता परस्पर जिव्हाळ्यानें, योग्य समजुतीनें आणि परस्पर सद्भावनेनें कशी सहज साध्य होऊं शकते हें त्यांनीं आपल्या चरित्राच्याद्वारा पूर्णपणें दाखवून दिलेलें आहे. ज्यांना विश्वबंधुत्व हवें असेल त्यांनीं साईबाबांच्या चरित्रापासून स्फूर्ति घ्यावी.

साईबाबांच्या हातून आणि त्यांच्या करुणेच्या प्रभावानें चमत्कार कसे घडत असत हें समजून घेतां घेतां विज्ञान सुन्न होऊन बसलें. शहाणपण शरमतें आणि ज्ञान तर या चमत्कारांच्या झगझगाटानें दिपूनच जातें. बहुजनसमाज त्यांना आपले आजोबा मानून त्यांच्या भजनीं लागलेला आहे, परंतु लोकसभेच्या चार भिंतीआड असलेल्यांनीं मात्र साईबाबांचीं उदात्त तत्त्वें व त्यांचे नांव जगांत प्रसृत करण्यासाठीं बरेंचसें करायला हवें आहे. कारण जग आज ज्या आधिव्याधींनीं हैराण होऊन राहिलेलें आहे, त्यांतून त्यांची सुटका करणारी रामबाण दवा म्हणजे साईबाबा हीच आहे.

---

## मानव पापमुक्त होऊं शकतो

पूर्वायुष्यांत मनुष्य कितीही दुराचारी असो. त्याला उपरती होऊन तो भगवंताची अनन्यभावें व दृढश्रद्धापूर्वक भक्ति व त्याचें चिंतन करूं लागला तर पूर्वायुष्यांतील त्याचीं सर्व पापें नाहींशी होऊं शकतात. भगवंत अत्यंत कृपाळू आहे. तो भक्ताचें अंतःकरण ओळखतो व त्याच्यावर आपल्या कृपेची पाखर घालून त्याला जवळ घेतो. पश्चात्तापानें त्याचीं सारीं पापें जळून खाक होतात ! अशा भक्ताची गणना साधुपुरुषांतही होऊं शकते. त्याचा निर्धार आणि त्याचें वर्तन त्याला तारक होऊन रहातें. ईश्वर नामचिंतनानें त्यांचें अंतःकरण शुद्ध होऊं लागतें. त्याची अस्वस्थताच नाहींशी होते. जीवनांतील भगभग संपते व असीम अशा शांततेचा तो धनी होतो.

# खऱ्याखुऱ्या समर्पणाचा अर्थ

लेखकः—श्री. राजाभाई के. लकडावाला,

एल्‌एल्‌. बी., ॲडव्होकेट, पोरबंदर

खऱ्याखुऱ्या समर्पणाचा अर्थ काय असावा याचें चिंतन करीत असतांना माझ्या मनांत जे कांहीं थोडेफार विचार येतात, ते असेः—

" मी सर्वस्वीं तुझ्या आधीन आहें, आणि तूं मला जसें जीवन जगायला लावतोस तसें मी माझें जीवन जगतों. म्हणून माझ्या सगळ्या भल्याबुऱ्या कृतींची जबाबदारी तूंच घे, "—असें नुसतें म्हणण्याचा कांहींच उपयोग नसतो. हें खरेंखुरें समर्पण मुळींच नव्हे. "

मग सर्वशक्तिमान परमेश्वराच्या चरणकमलांवर अर्पण काय करावें याचा आपण विचार करूंया. आपल्याजवळचें जें कांहीं सर्व श्रेष्ठ व सर्वोच्च असेल तेंच त्याला आपण अर्पण करूं शकतों. सामान्य व्यवहाराच्या दृष्टीनें देखील असेंच नसतें का करायचें ? आपण आपल्या श्रमानें जें जें कांहीं चांगलें म्हणून मिळविलेलें असतें, म्हणजे जमीन म्हणा, मौल्यवान वस्तू म्हणा, अशाच आपण दुसऱ्यांना भेट म्हणून वा बक्षीस म्हणून देतों. आपल्याला जी शिक्षा म्हणून मिळालेली असते, ती कांहीं दुसऱ्याला भेट म्हणून आपण देऊं शकत नाहीं. शारीरिक पातळीवरून विचार करतांना देखील दुसऱ्याचें दुष्कर्म वांटून घेण्यांत कुणालाच आनंद वाटणार नाहीं. त्याचप्रमाणें आपल्याजवळचें जें सर्वोत्कृष्ट असेल तेंच आपण सर्वशक्तिमान परमेश्वराला अर्पण करूं शकतों. आपल्या उणीवा कांहीं आपण अर्पण करूं शकत नाहीं. यावरून साहजिकच असा निष्कर्ष निघतो कीं आळशीपणा, कुवासना, कुविचार इत्यादि आपल्या अंगच्या उणीवा आपण काढून टाकायला हव्यात; तसें केल्यावर मगच आपण स्वतःला परमेश्वराच्या चरणीं अर्पण करूं शकतों.

चांगले–वाईट, सत्य–असत्य, श्रेयस–प्रेयस, इत्यादि पर्यायांतून निवड करण्यासाठीं आपण मानवाला 'बुद्धियोग' दिलेला आहे असें भगवान श्रीकृष्ण गीतेंत सांगतात. म्हणजे भगवंतानें आपल्याला आपल्या मार्गाची निवड करायचें स्वातंत्र्य दिलें आहे असा याचा अर्थ होतो. म्हणून ज्याला स्वतःला परमेश्वरार्पण

करायची इच्छा असेल त्यानें त्यानें शुद्ध व उच्च प्रकारचें जीवन जगायला हवें; असें जीवन हेंच परमेश्वराच्या चरणीं खरेखुरें समर्पण होऊं शकतें.

एकदां आपण स्वतःला परमेश्वरार्पण करून घेतलें कीं आपण त्याचेच होतों. व त्याचें कार्य हें साहजिकच आपलें कार्य होऊन बसतें. एकाद्या व्यापाऱ्याचा एखादा गुणी मुलगा असतो ना? तो कसा आपल्या वडिलांच्या उद्योगधंद्यांत लक्ष घालतो, वडिलांचें दैनंदिन कामकाज स्वतः पाहतो, वडिलांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यांत त्यांना साथ देतो. तितक्यात तन्मयतेनें आपण परमेश्वराच्या कार्यांत परमेश्वराशीं सहकार्य केलें पाहिजे.

आतां परमेश्वराच्या अशा कोणत्या कार्यांत आपण त्याला मदत करायची आहे, हें परमेश्वराचें कार्य म्हणजे आहे तरी काय, याचा आपण विचार करूं. तो प्रेमळ आणि दयाळू असा पिता आहे, तो आपल्या दयामृताचा वर्षाव सर्वांवर सारख्याच प्रमाणांत करतो. हें आपल्याला ठाऊक आहे. म्हणून आपणही हा लाडका, हा परका असा कसलाही भेदभाव न करतां सर्वांवर ममता करावी, सर्वांवर प्रेम करावें, सर्वांबरोबर सहानुभूतीनें वागावें.

अशा करण्यानें आपलीं कुटुंबें, आपलें राष्ट्र वगैरे बाबतच्या आपल्या दैनंदिन कर्तव्यांत अंतराय होईल असें समजण्याची कांहींच जरूरी नाहीं. तरी सुद्धा आध्यात्मिक वृत्ति ही आपल्या नित्याच्या जीवनक्रमांत व कर्तव्याच्या मार्गांत कधींच धोंड होऊन बसत नाहीं. कारण परमेश्वराचें कार्य व आपलें कार्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी नव्हेतच. आपल्या दैनंदिन कर्तव्यांमध्यें लक्ष घालणें, आपलें कुटुंब चांगलें निपजावें या दृष्टीनें कुटुंबाचें पालन पोषण संवर्धन करणें, धंद्यांतील व नोकरींतील आपलीं सगळी कर्तव्यें लक्षपूर्वक पार पाडणें आणि सगळीं कर्तव्यें जणूं काय परमेश्वराचींच आहेत, अशा बुद्धीनें संपूर्णपणें चांगल्या रीतीनें करणें म्हणजे तीं तीं कार्यें देखील परमेश्वराचींच कार्यें ठरतात. सगळ्या कर्मांच्या पाठीशीं असलेला खराखुरा समर्पणाचा बाणा ही महत्वाची गोष्ट. इतराना मदत करण्याचें कार्य, निःस्वार्थी असें सगळें कार्य म्हणजेच परमेश्वराचें कार्य अशी एका महापुरुषानें परमेश्वराच्या कार्याची व्याख्या केली आहे. आपण आपलीं दैनंदिन कर्तव्यें करीत असतांनाच मदत करायचे अशा प्रकारचे प्रसंग या ना त्या रूपानें आपण शोधायला गेलों तर आपल्याला पुष्कळच मिळतात. सत्कार्यें ही परमेश्वराचें कार्य म्हणून करायला पैसा लागत नाहीं. दुसऱ्याची दुःखीं कष्टी अवस्था

जाणून घेणें, त्याच्या बद्दल सहानुभूति बाळगणें, त्याला त्या अवस्थेंत मदतीला हात देणें, हें परमेश्वराचें सर्वोत्तम कार्य ठरेल. कसलीही अहंकाराची भावना मनांत येऊं न देतां इतरांना निःस्वार्थी मदत करण्याचे असे लहान सहान प्रसंग आपण सतत शोधत राहायला हवें.

अहंकार टाळण्यासाठीं एका भारतीय संताचे पुढील उद्गार मननीय आहेत.

'आपलें मन गर्वापासून अलिप्त ठेव. कारण गर्व केवळ अज्ञानजन्य असतो. ज्याला हें ठाऊक नसतें तोच आपण मोठे आहोंत, आपण हें अगर तें महाकृत्य केलें आहे, अशा विचारांत मग्न असतो. खरें म्हटलें म्हणजे एकटा परमेश्वरच काय तो मोठा आहे. आणि जीं कांहीं चांगलीं चांगलीं कार्यें घडतात तीं एकट्या परमेश्वरानेंच केलेलीं असतात. हें शाहाण्या माणसाला ठाऊक असतें."

म्हणून अहंकाराच्या सगळ्या प्रवृत्तींपासून मन अलिप्त राखण्यासाठीं काय केलें पाहिजे ? सगळें श्रेय एकट्या परमेश्वरालाच देऊन सगळें कार्य आपण परमेश्वराच्या नांवानें करावें.

परमेश्वराला आपलें जीवनसर्वस्व ज्यानें समर्पण केलें आहे, अशा माणसाविषयीं भगवान श्रीकृष्ण श्रीमद्भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायांतील चौथ्या श्लोकाच्या द्वितीय चरणांत सांगतातः

मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ म्हणजे, स्वतःचें मन आणि बुद्धि मला अर्पण करून राहिलेला माझा भक्त मला प्रिय असतो.

या मनःस्थितींत असतांना अशा माणसाची भूमिका जणूं काय परमेश्वरच चठवीत असतो. कारण या कर्मांचा जो कर्ता असतो तो आपलीं सगळीं कर्में परमेश्वराची सर्व शक्ति व सामर्थ्य पणाला लावून करीत असतो. असा माणूस स्वतःसाठीं कर्म निर्माण करीत नसतो. तो जणूं काय परमेश्वराच्या हातांतली लेखणी असतो. आणि त्याची एवढीच इच्छा असते कीं परमेश्वरानें या लेखणीचा वापर स्वतःला हवा त्या रीतीनें करून घ्यावा. म्हणून अशी मनःस्थिति आदर्श समजतात.

हें साध्य करणें म्हणजे खरोखरीच महाकठीण कर्म. तरी देखील तें अशक्य कोटींतलें नव्हे. आपण सर्वजण हें साधण्याचा प्रयत्न करूं या. आपल्या या खटपटीला परमेश्वराचा आशीर्वाद असावा, अशी ईश्वरचरणीं प्रार्थना करूंया.

# अतींद्रिय ज्ञान

लेखकः के. के. प्रधान

या बुद्धियुगांत बुद्धीचा योग्य उपयोग करून मानवांनीं थोर महाभक्तांची पारख करणें जरूर आहे. मेंढराच्या कळपाप्रमाणें एकामागून दुसरा अशी खोट्या ढोंगी पण स्वतःला साधु म्हणवून घेणाऱ्या समाजकंटकाकडील गर्दी कमी करण्यास शिकलें पाहिजे. श्रद्धा ही आंधळी असली तरी बुद्धि चालवून, नीट पारख करून नंतरच श्रद्धा ठेवणें योग्य आहे. असें केल्यासच अतींद्रीय ज्ञानाचा प्रांत सर्व मानवांस खुला झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

सर्व साधारण माणसांस अतींद्रिय ज्ञान आपणांस होईल असें कधींच वाटत नाहीं; कारण पंचेंद्रींयांनीं दिलेल्या ज्ञानापलीकडील दुसऱ्या कोणत्याही ज्ञानाचा समावेश तो ज्ञानांत गोवण्यास तयार नसतो. तसें ज्ञान होण्याची शक्यताही त्याला कधी आढळत नाही व त्यासारखे मानसिक प्रांतांत काहीं झालें तर तो आपला निव्वळ भ्रम आहे किंवा वेडगळ समजूत आहे असें म्हणून तो तसल्या गोष्टीवर खोल विचारच करीत नाहीं. विज्ञानशास्त्रानीं जगामध्यें माणसाच्या आदिभौतिक सुखासाठी यशस्वी रीतीनें करून दाखविलेल्या प्रयोगाचा फक्त ज्ञानांत समावेश करण्याची त्याची हौस झपाट्याने वाढीस लागली आहे व एका तऱ्हेनें ते ठीकच आहे.

चक्षुर्वै सत्यं किंवा हा सूर्य व हा जयद्रथ, असा भरभक्कम पुरावा मिळाल्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास न ठेवणें हा बुद्धीचा धर्मच आहे व आपण बुद्धीयुगांत वावरत असल्यामुळें बुद्धीला हरेक तऱ्हेनें निरनिराळ्या ज्ञानाच्या प्रांतांत अशा तऱ्हेनें खात्री करून घेऊन मगच त्या अवगत माहितीचा ज्ञानांत समावेश करण्याची जरूरी वाटणें योग्य आहे. परंतु मानवाच्या बुद्धि विकासाला सुद्धां मर्यादा असणारच. अगदीं बुद्धीचा पूर्ण विकास झाल्यावर

सुद्धा तो विकास कांहीं मर्यादेपर्यंतच होईल हें आपण विसरतां कामा नये. बुद्धीच्या पूर्ण विकासानंतर सुद्धा काहीतरी समजण्यासारखे शिल्लक रहाणारच, आणि जें समजल्यावर काहींही समजण्यासारखे रहात नाही,अशी स्थिती बुद्धीचा पूर्ण विकास झाल्यावर सुद्धा मानवाला येणार नाही. हें उघड आहे,तेव्हा ज्ञान मिळविण्यासाठी बुद्धीशिवाय मानवाजवळ इतर काही साधने किंवा इंद्रीये आहेत किंवा काय, याचा आपणास विचार करणें आवश्यक आहे.

'नर करणी करे तो नरका नारायण बन जाता है' या उक्तीप्रमाणे नराचा नारायण होण्यासाठीं म्हणजेच पूर्ण ज्ञानी होण्यासाठी मंत्र, जप, तप, वगैरे मार्ग खरोखरीच उपयोगी पडतात का व जर ते पडत असले तर त्यातील गूढ क्रिया कोणत्या उद्देशावर आधारलेल्या आहेत, याचा विचार करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थः— मंत्र मार्गांतील ओम् [ॐ] म्हणजे प्रणव. ह्या मंत्राच्या उच्चाराचा परिणाम माणसाच्या शरीर, मन व बुद्धी ह्या तीन्ही प्रान्तावर कशा तऱ्हेने होतो? योग्य व सावकाशपणे उच्चार केल्यास आपल्या नाभिप्रदेशापासून तों आपल्या मध्यमेंदूपर्यंत श्वासोच्छ्वासाशी एक अविरत क्रिया आपल्या ठिकाणीं जी नित्य चालू आहेच ती आपल्या आतील अनुभवाला बरोबर पटून जलद जलद उच्चारानंतर त्याचा एक विचित्र ताण ह्या सर्व प्रदेशावर आपणास भासतो. बरेच दिवस हा जप केल्यानंतर श्वासोच्छवासाच्या ह्या क्रियेला सहज सुलभतेने शरीराच्या कोणत्याही भागातून वर खालीं होत असताना त्या त्या भागाची संवेदनामय क्षमता तीव्रतेने जागृत करून शरीर, मन आणि बुद्धी ह्या तिन्ही प्रांताच्या अंतरंगातील खोलीची जाणीव मानवाला देता येते व येथूनच त्याच्या अतींद्रिय ज्ञानाला सुरवात होते. ज्ञानाचा प्रांत केवळ बुद्धीग्राही नसून सर्वेद्रीय ग्राही आहे हें मानवाला कळू लागते. भावनांचा विकास होऊ लागतो व त्या इतक्या अमर्यादित सीमाप्रांतापर्यंत पोहोचतात की मानवाला बुद्धी व मेंदू विचार करीत आहे की भावना म्हणजे हृदय विचार करीत आहे, हा प्रश्न पडतो.

काहीं क्षण असें वाटतें कीं शरीरातील दरेक पेशी,रक्ताचा प्रत्येक थेंब त्यातून ही संवेदना भरलेली आहे. किंबहुना ती पेशी व तो थेंबसुद्धा ज्ञान ग्रहण करूं शकेल अगर तो ज्ञानमयच आहे त्यास अतींद्रिय असें म्हणतात. एक प्रणव मंत्राचे उदाहरण घेऊन आपण समजू शकतो तर सर्व मंत्रांचा,

जपांचा, तपांचा केवळ मुकुटमणी किंवा राजा—राजयोग जर आपणास साध्य झाला तर ज्ञानाची उंची, रुंदी, खोली किती आहे व ती अजमावण्याची साधने मानवाला कोणती उपलब्ध आहेत, याचा आपणास बोध होईल यांत काय शंका ?

ॐ म्हणजे प्रणव ह्याच मंत्राचें उदाहरण आपण पुढें चालवूं. ह्या मंत्राचा अभ्यास बरेच दिवस योग्य तऱ्हेनें केल्यास योगमार्गातील श्वासोच्छ्वासाच्या क्रियेचा केवळ राजा असें ज्यास नामाभिधान आहे व जो प्राणायामांतील पूरक कुंभक व रेचक ह्या तीन क्रियांच्याहीपेक्षा श्रेष्ठ असा आहे, तो [केवळ कुंभक] आपणास साध्य होतो. केवळ कुंभक म्हणजे श्वास, उच्छ्वास ह्यामधून आपण सतत ग्रहण व फेकत असलेलें प्राण-अपान वायु दोन्ही भृकुटीवरील व मस्तकाच्या मध्यभागी आपोआप गोठण्याची क्रिया. आपणास माहितच आहे की, आपण श्वासाबरोबर प्राणवायु आंत घेत असतो. व दर उछ्वासाबरोबर अपान वायु बाहेर टाकत असतों. मनाच्या एकाग्रतेमध्ये ही क्रिया मंदावते. व आत घेतलेला प्राणवायु व आत ठेवल्याने आपल्या आत निर्माण झालेला अपान वायु एकमेकांत मिसळून इडा व पिंगला ह्या श्वासोच्छ्वासाच्या दोन नाड्या-मध्ये जी सुषुम्न नाडी आहे, तिच्यामध्यें घुसण्याचा प्रयत्न करू लागतात. हे प्राण अपानांचें मिश्रण अगदी थोडे जरी सुषुम्ना नाडींत घुसलें तरीसुद्धा माणसाला अतींद्रिय ज्ञान होवूं लागतें. केवळ कुंभक जर आपणास साधला तर प्राण अपानाचें मिश्रण विशेष प्रयत्न न करता सहज साध्य होतें. त्याचाच परिणाम सहजासहजी मनांतील विचार बंद होऊन एकाग्रता साधण्यांत होतो.

ज्या श्रेष्ठ विभूतींना आपण वंद्य मानून गुरुस्थानीं योजतों, त्या विभूतीचा श्रेष्ठपणा खरें म्हणायचें म्हणजे साधकास सहजगत्या केवळ कुंभक साधून देण्यात आहे. तत्त्वतः अशा श्रेष्ठ पुरुषांच्या शरीरांतून त्यांना आत्मसाक्षात्कार झाल्यामुळे अशी दिव्य तेजोवलयें बाहेर पडत असतात कीं त्यांच्या आलेल्या साधकाच्या श्वासोच्छ्वासाची परिणती अगदी सुलभ तऱ्हेने केवळ कुंभकांत व्हावी. अशा तऱ्हेने केवळ कुंभक साध्य करून देणाऱ्या पुरुषासच अति श्रेष्ठ आणि वंदनीय विभूती मानली पाहिजे व अशांचीच योजना आपल्या गुरुस्थानीं केली पाहिजे. हें बऱ्याच साधकांस माहीत नसतें. त्यामुळें वस्तुतः बुवाबाजीचा

फैलाव होतो. तेव्हा केवळ कुंभक सहज तऱ्हेने व थोड्या वेळांत साध्य होण्याकरितां वर सांगितलेला उपाय निर्विवाद श्रेष्ठतम आहे.

केवळ कुंभक म्हणजेच effortless concentration आपोआप साध्य होणारी मनाची एकाग्रता. मन हें किती हट्टी, चंचल आणि दुराग्रही आहे हें नवीन सांगावयास नको. देवपूजेस बसले असतांना, भजन करीत असतांना, मंत्र जपतांना, ग्रंथ वाचताना तें कधीच निसटून इतर विचारांत गुंग होतें व या सर्व क्रिया मनविरहित होऊन वेळ मात्र निष्फळ जातो. हा आपला नित्याचा अनुभव आहे. केवळ कुंभक साध्य झाल्यास आपण मन अेकाग्र करण्याच्या यातायातींतून सुटतों. एकदा का मन आपोआप अेकाग्र होऊं लागलें कीं मनांतील विचार त्या अेकाग्रतेबरोबर पूर्ण नाहींसे होतात. व ही स्थिती बराच काळ टिकते. या वेळांत आपल्याला आपल्या शरीर, मन, बुद्धीचा विसर पडून थेट आत्मारामाच्या सान्निध्यात जातां येतें. व त्या दिव्य अवस्थेंत अतींद्रिय ज्ञानप्राप्ती होऊं लागते. म्हणजे खरेखुरे ज्ञान प्राप्त होऊ लागतें. ह्या स्थितींत मनुष्याचा मीपणा विरतो व आंतील अनुभवलेल्या दिव्यतेमुळें तो कवि असल्यास कवितेंत, साहित्यिक असल्यास साहित्यांत, वक्ता असल्यास भाषणांत, गवई असला तर गाण्यांत, कलावंत असला तर त्या कलेंत ही दिव्यता ओतून अशी काहीं सुंदर कृति निर्माण करतो कीं ती चिरंजीव होते. जग त्यापासून शिकतें, शहाणे होतें व पुढचा मार्ग चोखाळूं लागतें. जगाच्या सांस्कृतिक वाढीला चालना देण्याचें काम अशाच अतींद्रिय ज्ञानांतून सतत होत असतें. पण तें आपल्या लक्षात येत नाहीं. विज्ञान शास्त्रांत मोठमोठे शोध लावणारे शास्त्रज्ञ नकळत होणाऱ्या केवल कुंभकांतून शोध लावीत असतांना स्वतःला विसरून जातात. जग त्यामुळें स्तिमित होतें. विज्ञान शास्त्रांतील कित्येक सिद्धान्त मागें पडून नवीन सिद्धान्त प्रस्थापित होतात. विज्ञान शास्त्राची वाढ होते. केवळ कुंभक साधल्यानें शरीराच्या रक्ताचा कणन् कण पेशी न पेशी, फुफ्फुसे, हृदय आणि सर्व अवयव स्नान केल्यासारखे ताजे तवाने होतात. आपल्या मनाचे कोनेकोपरेसुद्धां धुऊन पुसून स्वच्छ होतात. बुद्धीच्या उड्या उलट्या सुलट्या न पडतां योग्य पडू लागतात. मेंदूची पाती न पाती स्वच्छ लखलखित होतात. व माणसाच्या शरीर

मनःबुद्धीवर दिव्यत्वाचा साज चढतो. व तो अधिक अधिक अतींद्रिय ज्ञानाला क्षम आणि पात्र होतो.

निरनिराळ्या धर्मांत, तत्त्वज्ञानांत मंत्र, तंत्र, जप, ध्यान, धारणा, भजन, पूजन वगैरे सर्व मार्ग जे अतींद्रिय ज्ञानासाठीं सांगितले आहेत, त्यांचा सर्वांचा खरा उद्देश हे वारा प्यायलेल्या वासराप्रमाणें हुंदडणारे मानवी मन एकाग्र करणें हा आहे. हें महान् दुष्कर कर्म असून त्यावर खास उपाय जवळ जवळ एकच म्हणजे केवळ कुंभक साध्य करणें हा आहे. तो उपाय जसा आहे तसा तो साध्य करण्याचा मार्गही एकच आहे. आणि तो म्हणजे ज्या जिवंत महाभागांनीं हा केवळ कुंभक साध्य करून घेतला व त्यामुळें त्यांस आत्म-साक्षात्कार झाला, त्यांच्या सान्निध्यांत जावून त्यांच्या भोवतालच्या दिव्य वलयांत बसून आपल्या श्वासोच्छ्वासाच्या क्रियेला केवळ कुंभक क्रियेचें बाळकडू पाजणें. ह्यांत थोडेसे श्रम आहेत, कष्ट आहेत, तप आहे, परंतु ते सर्व असा योग्य महाभाग शोधून काढण्याचेच. त्यानंतर मात्र साधकाचा अमृतवाही जीवनमार्ग जवळ जवळ तावडतोब सुरू होतो असें म्हटलें तरी चालेल. ह्या बुद्धि युगांत बुद्धीचा योग्य उपयोग करून मानवांनीं अशा महाभागांची पारख करणें आवश्यक आहे. त्यांचें अस्तित्व नाहीं असें नाहीं. रत्नें ठिकठिकाणीं आहेत, परंतु रत्नपा-रखी मात्र पाहिजे. ह्यासाठी सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रान्तात शिरलेल्या खोट्या प्रणालीचा आपल्या बुद्धीचा निकष लावून आपल्याला त्याग करतां आला पाहिजे. उगीच ‘ गतानुगतिको लोकः ’ ह्या म्हणीप्रमाणे, मेंढराच्या कळपाप्रमाणें एकामागें दुसरा, अशी खोट्या, ढोंगी पण स्वतःला साधू म्हणून घेणाऱ्या समाज कंटकां-कडील गर्दी कमी करण्यास शिकलें पाहिजे. श्रद्धा आंधळी आहे हें खरें. तरी देखील प्रथम बुद्धी चालवून, नीट पारख करून, नंतरच ती श्रद्धा ठेवणें योग्य आहे. असें केल्यासच अतींद्रिय ज्ञानाचा प्रान्त सर्व मानवांस खुला झाल्या-शिवाय रहाणार नाहीं.

# नामदेवांचीं भक्ति-गीतें :

लेखक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

**श्री. ग. वि. कविटकर एम्. ए. यांचा आमच्या वाचकांस परिचय करून दिला पाहिजे असें नाहीं. थोर संत नामदेव यांच्या काव्यवाङ्मयाच्या त्यांचा व्यासंग फार दांडगा आहे. तो त्यांचा अत्यंत आवडता व जीवनव्यापी विषय आहे. प्रस्तुत वाचनीय लेखांत नामदेवांच्या भावगीतांचे महत्त्व त्यांनीं नाना दाखले देऊन परोपरीनें पटवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. हा व्यासंगपूर्ण लेख वाचकांनीं जरूर वाचावा.**

—संपादक

## ज्ञानदेव व तुकाराम यांची प्रशस्ति

नामदेवांच्या अभंगांना मराठी वाङ्मयांत महत्वाचें व स्वतंत्र स्थान आहे. भक्तिमार्गांतील अनुभव-सुखाचा उपयोग करून घेण्याच्या उद्देशानें ज्ञानदेवांनीं नामदेवांस म्हटलें होतें, "तुझी वाणी सागरापेक्षां खोल आहे, सुरस आहे, तींत आनंदाचा नित्य नवीन ओलावा आहे. तुझी वाणी मला ऐकीव; माझे कान आतुर झाले आहेत." या नंतर नामदेवांनीं भक्तिनिवेदन केलें. तें ऐकून ज्ञानदेवांनीं काढलेले पुढील उद्गार, त्यांत नामदेवांच्या काव्यगुणांचे विवेचन असल्यानें, महत्वाचे आहेत.

"आम्ही पुष्कळ भगवद्भक्तांच्या कथा ऐकल्या. आजपर्यंत पुष्कळ भक्त होऊन गेले आणि पुढेंहि होतील; परंतु नामदेवांची वाणी हें केवळ कवित्व नाहीं, त्यांत निराळाच अद्भुत-रस व अनुपम-रस भरलेला आहे. त्या बोलण्यांत जी सुखविश्रांति लाभते ती अन्यत्र कल्पांतींहि लाभणार नाहीं. संतांनीं विचार करून पहावा." नामदेवांच्या अभंगांची थोरवी किती आहे याची साक्ष ज्ञानदेवांनीं दिलेला हा रसोद्ग्राही उद्गार देत आहे. तुकोबारायांच्या जीवनदृष्टीवर नामदेवांच्या चरित्राचा आणि काव्याचा खोल ठसा उमटला होता. नामदेवांचें प्रेमळ

चरित्र आणि वाङ्मय तुकोबारायांच्या मनन–चिंतनाचा प्रत्यहीं विषय होता. याच मनन चिंतनांतून त्यांना काव्य–स्फूर्ति झाली.

**नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें**
**सवें पांडुरंगें येऊनियां ॥**
**सांगितलें काम करावें कवित्व**
**वाउगें निमित्त बोलों नको ॥**
**प्रमाणांची संख्या सांगे शतकोटी**
**उरलें तें शेवटीं लावी तुका ॥**

—तुकाराम गाथा.

## अनेक थोर कवींचे स्फूर्तिदाते

भावसमृद्ध, तेजस्वी आणि प्रसादमय काव्यरचना करून नामदेवांच्या उर्वरित कार्यावर तुकोबारायांनीं कळस चढविला. नामदेवांनीं ग्रथित केलेले जीवनसिद्धांत एकेश्वरवादी शीख पंथीयांना समजले. तेव्हां गुरु अर्जुनदेवांनीं सन १६०४ मध्यें त्यांचा हिंदी–काव्य–संग्रह आदि ग्रंथांत संकलित केला. पंजाब भूमींत त्यांचे विचार त्या काळच्या परिस्थितींत रुजूं शकले आणि पुढील विचारवंतांना प्रेरक झाले. गुर्जर कवि नरसी मेहता, उत्तर प्रदेशांतील कबीरदास, राजस्थानचे संत दादु आणि पंजाबांतील घरीबदास यांच्या वाङ्मयावर नामदेव–काव्याचे झालेले परिणाम पहातां त्या त्या प्रांतांतील या संतकवींचें स्फूर्तिस्थान नामदेव होते असें म्हणावें लागेल. कविवर्य मोरोपंतांनीं 'कवि–सत्तम' या पदवीनें नामदेवांना गौरविलें आहेः– "शतकोटि अभंग मुखें कविसत्तम हा सुखें वदे वाहे" अशा या नामदेवांच्या अभंग वाङ्मयाचा रसोत्कर्ष कशा प्रकारचा आहे हें पहाण्याचा या लेखांत विचार केला आहे.

नामदेवांच्या काव्याचें स्वरूप काय आहे हें पहाण्यापूर्वी नामदेवांचीच काव्यासंबंधीं काय कल्पना होती हें समजून घेणें उचित होईल. त्यांनीं ग्रंथाध्ययन करणारे, पुराणिक आणि गायन करणारे गुणिजन या वेगवेगळया वर्गाविषयीं काढलेले उद्गार समजून घेतल्यास त्यांचा काव्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन लक्षांत येईल. त्यांच्यामतें भावोत्कटता नसेल तर वैदिक, पुराणिक, गायक वगैरे होतां येईल पण वैष्णव होतां येणार नाहीं. या संदर्भात नामदेवांचीं पुढील वचनें लक्षांत घ्यावयास हवींतः—

शिकला गाणे राग आळवण । लोकां रंजवण करावया ॥
भक्ताचें तें गाणें बोबडीया बोली । तें तें विठ्ठलीं अर्पीयली ॥
ना. गा. ( १८६५-१,२ )

## काव्यांत उत्कट भक्तीचें दर्शन घडावें

परमेश्वराचे चरण ज्यायोगानें अंतरतील असें गाणें नको व असें काव्य नको असें त्यांचें म्हणणें आहे. एका हिंदी पदांत परमेश्वरप्राप्ति ज्यायोगें होते तें वेगळेंच आहे हें सांगताना नामदेव म्हणतात कीं, जें उत्कृष्ट काव्यरचनेनें प्राप्त होत नाहीं, जें उत्तम प्रकारच्या गायनानें मिळत नाहीं, ज्यायोगानें आत्मप्राप्ति होते तें वेगळेंच आहे. ( न होइ ज्यौ कबित परमोद्य रचीता ॥ न होइ ज्यौ सुघटपणै गाता, जेन्हे होइ ज्यौ आत्मा । ते वेगळेच असे ॥ ) काव्यांत भक्तीचें उत्कट दर्शन झालें पाहिजे, ही त्यांची काव्यदृष्टि वरील उद्गारांवरून दिसून येईल ईश्वर भक्ती ही सर्वश्रेष्ठ भावना भक्तीचें कवन करीत असतां शब्द-वृत्त, अलंकारादि गुणांकडे दुर्लक्ष झालें तरी चालेल. सुंदर शब्द, सुंदर भाषा, रूपकादि अलंकार भावोत्कटतेमुळें मागें पडतात. भावनेची उत्कटता हीच अधिक परिणामकारी ठरते. कलात्मक निर्मिती केव्हांही कृत्रिमच, परंतु काव्याचा हाहि प्रकार स्वागतार्ह समजणारे वाचक रसाचा प्राण जी भावना ती उत्कटतेनें ज्यांत आहे असें काव्य वाचतांना तन्मय होऊन जातात. वृत्त, छंद, मात्रा, यमक इत्यादि काव्यांगें संतकवींनीं ईश्वराची भक्तिपूर्वक पूजा बांधतांना एक बंधन म्हणून स्वीकारलें एवढेंच. परंतु बाह्यांगाच्या रेखीवपणापेक्षां अंतःसौंदर्याकडेच विशेष लक्ष होतें. काव्यास उपकारक अशीं हीं बाह्य साधनें स्वीकारल्यामुळें तत्कालीन समाजास ईश्वरभक्तीचा बोध होईल या भूमिकेवरून नामदेवांच्या वाङ्मयाकडे किंबहुना संतवाङ्मयाकडे पाहिलें पाहिजे; आणि तसें पाहिलें तर नामदेवांनीं, त्यांच्या समकालीन संतांनीं व त्यांच्या पश्चात् एकनाथ व तुकोबा-रायांनीं अध्यात्म विचारांचे चेतोहर विविध तरंग अभंगवाङ्मयांत खेळवले आहेत. हें त्यांचें कौशल्यच म्हणावें लागेल.

## भाव-कवितेचें दर्शन

नामदेवांचे अभंग भावकाव्यात्मक आहेत. सहज संस्कारी चित्तवृत्तीचा संपूर्ण आविष्कार, कमी अधिक छंदोबद्ध रचना आणि रचनेंतील स्वर वा

गानमाधुर्य हे भावकाव्याचे मुख्य घटक मानले जातात; आणि या घटकांद्वारा रसोत्पादन आणि आनंद हे त्याचें कार्य होय. भावकाव्याचें हें व्यवच्छेदक लक्षण मानलें तर नामदेवांच्या काव्यांत या सर्व आवश्यक घटकांचें वा गुणांचें दर्शन घडतें. प्राचीन ग्रीक कवी तंतुवाद्यावर Lyre भावकविता म्हणत. या भावकाव्यांत गाणाऱ्या व्यक्तींच्या सर्व बऱ्या–वाईट भावना प्रगट होत. भक्तिमार्गीय संतांची कविता, विशेषतः नामदेव–तुकोबारायांचीं भजनें आणि प्राचीन ग्रीक कवींचें भावकाव्य यांच्यामध्यें काव्य--गुणदृष्ट्या बरेंच संवादित्व हुडकितां येतें. ग्रीकांच्या या काव्यरचनेंस Lyrics असें म्हणतात. इंग्लिश भाषेंतील Lyre ह्या शब्दापासून Lyrics हा शब्द निघालेला आहे. लायर Lyre हें एक अत्यंत प्राचीन असें इजिप्तमधील किंवा ॲसिरियांतील तंतुवाद्य. या तंतुवाद्याच्या स्वराला अनुसरून गायिलें जाणारें जें गीत तें लिरिक होय.

## नारदमुनींच्या वीणेचें महत्त्व

महाभारतादि महाकाव्यें श्रीव्यासमुनींनीं रचिलीं; परंतु त्यांच्या अंतःकरणाची तळमळ नाहींशी झाली नाहीं. त्या श्रीव्यासमुनींना, ‘आपण निव्वळ भगवंताचे गुणानुवाद गाणारें काव्य लिहावें म्हणजे आपल्या चित्ताला अक्षय शांति प्राप्त होईल’ असा उपदेश करून ज्यांनीं श्रीव्यास महर्षींना भक्तिमार्गाचें रहस्य निवेदन केलें, त्या नारदमुनीनीं वीणेच्याच मंजुळ रवांच्याद्वारें भूलोकीं भागवत धर्माचा प्रसार केला. त्यावरून बाणभट्टाच्या ‘पार्वती परिणय’ या नाटकांत नारदमुनीला ‘वीणा विहारी’ अशी संज्ञा दिली. ती अन्वर्थकच आहे. कारण वीणेचे आद्य अधिकारी नारदमुनीच. त्यांच्या वीणेंतून हरिभजनाच्या परम मंगल स्वरांची त्रिविध तापानें त्रस्त झालेल्या जनांला प्रशांत करून सोडणाऱ्या अमृताची वृष्टी व्हावयाची अशी त्या वीणेची योग्यता! आणि हीच वीणा हातीं घेऊन नारदमुनींचे नामसंकीर्तनाचें महाव्रत नामदेवांनीं पुढें चालविलें असें मोरोपंत सांगतातः

श्रीनारदमुनिचें जें सुमहत् व्रत तेंचि नामदेवाचें ।<br>
जेणें प्रसिद्ध केलें ‘विठ्ठल’ हें भव्य नाम देवाचें ॥

## ज्ञानदीप लावूं जगीं

सॅफो प्रभृति ग्रीक कवी हेहि या वीणेचे अधिकारी व भावकाव्याचे निर्माते खरे. परंतु त्यांच्या काव्यांत ‘ ध्यान देवाचें लागले ’ त्या महानुभाव संतांच्या एकमेव ध्यासानें, एकमेव चिंतनानें जागृत झालेल्या वृत्तींचें दर्शन घडत नाहीं किंवा हा ध्यास घेत असतां जे जे अनुभव आले त्यांचे निवेदन नाहीं. विशेषतः या ग्रीक कवितेंत कल्पनेच्याद्वारा क्षुब्ध विकारांचे वा मानसिक अवस्थांचे चित्रणच केलेलें आढळतें. याउलट सहाशें वर्षांपूर्वी नामदेवरायांनीं पांडुरंग भक्तीच्या अमृतवृक्षाखालीं लहान थोर मुमुक्षु एकत्र केले व हातीं वीणा घेऊन पंढरी ते घुमान व पुढें अटकेपर्यंत खेडोपाडीं झोपड्या झोंपड्यातून भागवत धर्माच्या संदेशाचे लोण पोहोचविलें. ‘ आम्ही करूं भागवत धर्म ’ ही तर त्यांची प्रतिज्ञा होती व ‘ ज्ञानदीप लावूं जगीं ’ या काव्यपंक्तींत म्हटल्याप्रमाणें ज्ञान-ज्योतीवर असंख्य दीप उजळून मानवी जीवन तेजोमय करण्याचें त्यांचें जीवन-ध्येय होतें.

## स्वोद्धार व लोकोद्धार

केवळ काव्य निर्मिती हा नामदेवांच्या अभंगकाव्याचा हेतु नाहीं. काव्य-विलास हें त्यांचें ध्येय नव्हतें. ते श्रेष्ठ दर्जाचे संत व रससिद्ध सत्कवि होते. स्वोद्धार व लोकोद्धार हें त्यांचें उद्दिष्ट होतें. ज्या शब्दांनीं परमेश्वर डोलूं लागेल, सर्वत्र प्रेम उत्पन्न होईल आणि सर्वत्र आत्मज्ञानाचा दीप प्रज्ज्वलित केला जाईल, असें वाङ्मय निर्माण करूं असें नामदेवांनीं म्हटलें आहे.

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई
नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥

नामदेवांनीं हरिगुणगान करण्याचें साधन म्हणून काव्याचा आश्रय घेतला. भक्ति-प्रवर्तन हा त्यांच्या अभंग वाङ्मयाचा आत्मा आहे.

शब्दांचा शृंगार, भाषेचा साज, आणि शैलीचा विलास नसतां केवळ भक्तिपूर्ण व्यक्तित्वाच्या स्वाभाविक, रसरशित आविष्कारामुळें त्यांनी रसिकांचीं मनें अंकित केलीं. मुक्तेश्वर, मोरोपंत या वागीश्वरांचा कल्पनाविलास वाचकांच्या बुद्धीला वेड लावतो, रघुनाथ, चिमन, विठ्ठल हे पंडितकवी शब्दालंकारांमुळें

आणि अर्थालंकारांमुळें संस्कृत साहित्यांतील काव्यगुणानें संस्कारित झालेल्या रसिकांच्या डोळ्यांत भरतात--नामदेवांचे तसें नाहीं. त्यांच्या काव्यनिर्झराभोंवतीं निरनिराळे पक्षी, चक्रवाक, मयूर, कोकीळ यांचें कलरव क्वचित ऐकूं येतील; भृंगाचें गुंजगान क्वचित कानावर पडेल; तसेंच सागर, कमळ, सुगंध यांची लयलूट येथें नाहीं. तर या काव्योद्यानांत नामद्राक्षाचे घड आहेत. प्रेमसुखानें पक्व झालेलीं आम्रफळें आहेत. त्यांचा रसास्वाद, भावयुक्त होऊन घ्यावा. हृदयांतील भावनांचे आविष्करण व बाह्य जगाविषयीं प्रगाढ प्रेम त्यांच्य काव्यांत जागोजाग व्यक्त झालेलें आहे. मेघवृष्टीची याचना करणारा चातक, सुधामय दृष्टीनें पिलांकडे पहाणारी कांसवी किंवा चुकल्या बालकास शोधणाऱ्या मातेचें प्रेम पाहून नामदेवांनीं ईशप्रेमाची उत्कंठा आपल्या अभंगांत व्यक्त केली आहे. त्यामुळें आई बालकाला शिकवीत आहे, हरिणी पाडसाला चारा घालते आहे, असें त्यांचे अभंग वाचतांना वाटतें. नामदेव अंतर्बाह्य आमरण हरि-चिंतन करणारे भक्त होते. या अपूर्व वृत्तीमुळें त्यांच्या मनाचें माधुर्य, सौजन्य व विकसित आत्म्याचें भक्तिप्रेम यांचीं प्रतिबिंबें त्यांच्या अभंगवाणींत शब्दा शब्दांत पडलीं आहेत. त्यांत आध्यात्मिक जीवनांत उभे राहिलेले व्यामोहाचे प्रसंग आहेत, सामाजिक व व्यक्तिगत संघर्ष आहेत, परब्रह्माच्या स्वरूपाचें दर्शन होण्यापूर्वीची साधकाची उत्कट तळमळ आहे. हृदयांतील भावना शब्दरूपानें साकार झाल्यामुळें काव्यदृष्ट्या ही रचना अत्यंत सरस उतरली आहे. रमणीय संध्याप्रकाशाप्रमाणें अंतःकरणांतील विविधवृत्तींचे सुंदर दृश्य त्यांच्या अभंगरचनेंत दृष्टीस पडतें. पारिजातकाच्या फुलांप्रमाणें स्वच्छ, कोमल व सुगंधयुक्त अशी ही भावकाव्यात्मक रचना आहे. भावकाव्यांत आवश्यक असणारी भावोत्कटता, तिचा समुचित, सहज आणि सरळ भाषेंत झालेला प्रामाणिक आविष्कार यामुळें नामदेवांची अभंगरचना शतकानुशतकें आकर्षक वाटत आली आहे. शिवाय, संकटांत सांत्वन करण्याचें, हिताच्या गोष्टी सांगून शोक, मोह, दुःख यांचें निरसन करण्याचें आणि नित्य सावधान ठेवण्याचें सामर्थ्य त्यांच्या अभंगवाणींत आहे. ईश्वरप्रेमासाठीं आर्त झालेल्या, मानवजातीच्या उद्धारार्थ उत्कंठित झालेल्या, अंतःकरणांतून, "अवघे हातोहातीं तरूं भवसिंधु। आवडी गोविंदु गाऊं गीतीं....या उद्गारांवरून त्यांच्या साहित्य रचनेचा उद्देश स्पष्ट होत आहे."

"स वाग्विसर्गो जनताघविप्लवः" अशी साहित्याची व्याख्या भागवतांत शुकदेवांनीं केली आहे. या व्याख्येंत साहित्य जनताघविप्लव असावें असें सूचित केलें आहे; आणि याच अर्थानें कविवर्य मोरोपंतांना नामदेवांची अभंगवाणी गंगाप्रवाहाप्रमाणें पवित्र व शुचित वाटली. त्यांनीं लिहिले आहे :—

तो शुद्ध नामयाच्या जो गातो आदरें अभंगातें ।
जे पातक जड इतरां श्रीगंगेच्या तसें न भंगातें ॥

## मराठींतील अभिनव काव्यसांप्रदाय

नामदेवांच्या भावकाव्यात्मक अभंगांनीं मराठींत अभिनव काव्यसंप्रदाय निर्माण केला. यावेळीं आपल्या संस्कृतीला जसें एक जडत्व आलें होतें तसा निर्जीवपणा आपल्या काव्यांतहि भरून राहिला होता. नामदेवांनीं आत्मप्रचीतिदर्शन नव्या पद्धतीनें केलें. त्यांत जीवंतपणा आणला. त्यांना मानवी जीवनाबद्दल खोल सहानुभूति व आत्म्याच्या विकासाबद्दल खरी तळमळ होती. त्यांत आध्यात्मिक दृष्ट्या विकसित झालेल्या जीवनाचा जीवंत आविष्कार होता. विकसित अनुभवाच्या कक्षा शब्दांकित झाल्या होत्या. संकुचित व क्षुद्र अशा व्यक्तिगत अनुभवांबरोबर व्यक्तित्वाच्या पलीकडे जाऊन अनंताशीं तन्मय होतांना आलेला व्यापक, उदात्त व महान् अनुभव होता. त्यांत ईशप्रेमाचा खोल जिव्हाळा होता. त्या करुण—कल्लोळ वाणींत गाणाऱ्या—ऐकणाऱ्यांचीं अंतःकरणें द्रवविण्याची विलक्षण शक्ति होती. स्वर्गीय प्राध्यापक—वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं मुंबई विद्यापीठाच्या विल्सन फायलॉलॉजिकल व्याख्यानमालेंत नामदेवांच्या भावकाव्यासंबंधी काढलेले उद्गार किती अन्वर्थक आहेत ! त्यांच्या त्या समर्पक उद्गारांचा भावार्थ असा :—

"नामदेवांच्या काव्यांत समुद्रावर वा धरणीवर जो कधींच अवतरला नव्हता त्या प्रकाशाचा भावरम्य अनुभव येतो, जें या मृत्तिकामय जगांत कधींच स्थिर झालें नाहीं, त्या स्वप्नाचें दर्शन होतें. वासनेला केव्हांहि उत्तेजित न करणाऱ्या प्रेमाची त्यांत प्रचीति येते. त्यामध्यें करुणा, श्रद्धा, व भक्ति यांची भावरम्यता आहे. तद्वत् मानवाचें आत्म्यावरील प्रेम आहे. त्यांत भक्तीची व आध्यात्मिक प्रेमाची भावरम्यता आहे. हृदयानें हृदयास केलेलें संगीतमय निवेदन आहे. स्पर्श वा जागृति येतांच प्रक्षुब्ध होणाऱ्या भावातुर हृदयाचे ते उद्गार आहेत !"

—※—



# या देवाचा खेळ निराळा

लेखकः—द. शं. टिपणीस

( पूर्वार्ध )

**वसिष्ठ श्रीरामास सांगतात—" मनानें प्रपंचांतून सुटलेला पण देहानें प्रपंचांत गुंतलेला, मनानें आत्मज्ञान जपत असलेला पण देहानें ज्ञान नसल्यासारखें वागणारा, मनानें एका आत्मवस्तूला सत्य मानणारा आणि देहानें बहुरंगी जग सत्य मानणारा अशी प्रपंचपरमार्थांची बेमालूम जोड घालून रामा तूं आपलें जीवन घालव " असा हा राम सुमारें १२५ वर्षांपूर्वी शिर्डीस पुन्हां अवतरला. त्या साईंच्या चरणीं ही आदरांजली अर्पण करीत आहें.**

महाराष्ट्र भाग्यशाली आहे. ऐहिक व पारमार्थिक दोन्ही दृष्टीनें जीवनास आवश्यक तें सर्व या महाराष्ट्रांत आहे. मोत्यासारखें धान्य जसें या भूमींत पिकतें तसेंच रत्नासारखीं तेजस्वी माणसेंही निपजतात. रणांगणावर शौर्य गाजविणारे वीरपुरुष, राजकारणांतील धुरंधर व समाजकारणांतील अग्रणी या भूमींत होऊन गेले. महाराष्ट्राच्या इतिहासांत राष्ट्ररक्षणासाठीं रणांगणावर शर्थ करणाऱ्या वीरपुरुषांची जशी एक मोठी मालिका आपल्या दृष्टीस पडते तशीच राजकारणांत मुसद्देगिरीचा सारीपाट खेळणाऱ्या धुरंधर बुद्धिमंतांचीही मालिका दिसते. एवढेंच नव्हे तर समाजावर होणारे अन्याय दूर करण्यासाठीं झगडणाऱ्या व कष्टमय जीवन व्यतीत करणाऱ्या नररत्नांचीही आणखी एक मालिका दिसते. आध्यात्मिक रणांगणावर मानवी मनाच्या छुप्या शत्रूबरोबर शौर्यानें झुंज देऊन आपलें व आपल्याबरोबर समाजाचेंही चिरंजीव कोटकल्याण साधणाऱ्या संतांचीही मालिका या महाराष्ट्रांत होऊन गेलेली दिसेल.

### झऱ्याचा मूळ उगम

अध्यात्मांतील मलिनता काढून, तो तेजस्वी करून ऐहिक व पारमार्थिक दोन्ही जीवनांचा संयोग कसा साधावा कीं ज्या योगें व्यक्ति, समाज व देश या सर्वांची प्रगती साधली जाईल याचें लोकांना शिक्षण देण्यासाठीं अमर अशा

साहित्याची निर्मिती करणाऱ्या, जनमनावर पावित्र्याचे ठसे उमटविण्यासाठीं मानसन्मान, कीर्ति, पैसा कशाचीही अभिलाषा न बाळगतां निःस्वार्थीपणें अहोरात्र कष्ट करणाऱ्या व भागवत धर्माची पताका सतत उंच उंच नेणाऱ्या संतांची वाण महाराष्ट्राला कधीं पडली नाहीं. ज्ञानेश्वरापासून तों शिर्डीच्या साईबाबांपर्यंत जी एक संतमालिका झाली तींतील सर्व संतांनीं लोककल्याणाच्या एकाच ध्येयानें प्रेरित होऊन परिस्थितीस जुळणारा व आचरणास सहज असा भागवतधर्म सुलभ रीतीनें समजावून सांगून व्यक्ति व समाज दोघांचेही कल्याण साधणारा मार्ग वेळोवेळीं आंखून दिला.या सर्व संतांनीं सांगितलेल्या धर्माच्या झऱ्याचा मूळ उगम छोटुकल्या अशा ईशावास्योपनिषदांत सांगितला आहे.जीवन हा संघर्ष आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत माणसाला युद्ध करावें लागतें. 'रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग' असें संत म्हणतात, तें कांहीं संतांपुरतें नसून सर्वांनाही लागू आहे. मानसिक व शारीरिक दोन्ही प्रकारचीं युद्धें जीवनांत माणसाला अहर्निश खेळावीं लागतात. संघर्ष विरहित जीवन म्हणजे धागे विरहित वस्त्र होय. जीवनांत संघर्ष करणाऱ्या शत्रूशीं कशी झुंज द्यावी, जीवनाचें सुख कसें पदरांत पाडून घ्यावें व आपली जीवननौका पैलतीरी कशी सुखरूप न्यावी याचें मार्गदर्शन ईशावास्यांत अत्यंत संक्षिप्त रीतीनें केलें आहे. तीच गोष्ट श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत अधिक विस्तारानें पण एकंदर थोडक्यांतच सांगितली आहे. ईशावास्य काय किंवा भगवद्गीता काय, जिथें हे दोन्ही ग्रंथ महापंडितांनाही समजण्यास कठीण तिथें संस्कृत न जाणणाऱ्या सर्व साधारण जनतेला गीता ही नसल्यासारखीच होती. ज्या भगवद्गीतेंत जीवनांतील सर्व प्रकारच्या मानसिक व व्यावहारीक संघर्षांतून वाट कशी काढावी या संबंधींचें तत्त्वज्ञान अत्यंत उत्कृष्ट रीतीनें व्यक्त केलें आहे. ती गीता सर्वसाधारण जनतेला समजेल अशा प्रकारे जनतेच्या भाषेंत विशद करणें अत्यंत आवश्यक झालें. म्हणून ज्ञानदेवानीं गीतेवर भावार्थ दीपिका लिहिली व गीतेच्या हृदयांतील भाव स्पष्ट करून जनतेला सांगितला. पुढें काळ फिरला. परिस्थिति बदलली. व भाषा बदलली. यामुळें ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी दुर्बोध वाटूं लागली. आजही ती तशीच असावी असें विद्वानांचे जे वादविवाद चालतात नव्हे चालत होते (सध्या तरी रणांगणावर सामसूम आहे) त्यावरून वाटतें. शिवाय त्या काळीं लिहितां वाचतां येणाऱ्यांचें प्रमाण बोटावर मोजण्याइतकें असल्यामुळें व सर्व साधारण जनतेला पंडित मंडळी सांगतील तेवढेंच ज्ञान प्राप्त होत अस-

त्यामुळें धर्मासंबंधीं पुष्कळ भ्रामक कल्पना रूढी व जीवन संघर्षाला फारशा उपयोगी न पडणाऱ्या गोष्टींचें प्राबल्य समाजांत माजलें होतें.

## थोर संतांची कामगिरी

यामुळें एकनाथी भागवताच्या रूपानें एकनाथाला गीतेंतील जीवनाचे मार्ग पुन्हा एकदां विशद करावे लागले. बहुसंख्य जनता अशिक्षित व आपलें एकनाथी भागवत ती वाचूं शकत नाहीं हें ओळखून कीर्तन, भजन, अभंग भारुडें वगैरेच्या साह्यानें भागवतांतील भागवतधर्म घरोघरीं अशिक्षितांपर्यंत पोहोंचता करण्याचें कार्य एकनाथांनीं केलें. ज्ञानेश्वरानें ज्ञानगंगेच्या उगमाला पडलेला बांध फोडून तिला वाहती केली तर एकनाथानीं या गंगेला कीर्तन, भजन, भारुडादी कालवे काढून आजूबाजूच्या सर्व प्रदेशांत घरांदारांत, झोपड्यांत तिला खेळती केली. नामदेव तुकारामादि संत मंडळींनी हाच मार्ग अनुसरून भागवतधर्म कळसास चढविला. दंभाच्या व स्वार्थाच्या चिखल मातीनें गढूळ झालेल्या या गंगेचें पाणी शुद्ध स्वच्छ व थंडगार करण्यासाठीं तुकारामानें दंभ ढोंग यांवर चौफेर हल्ले करून दांभिकपणाचें सर्व पितळ उघडें करून टाकलें. या नंतर श्री समर्थ रामदास स्वामींच्या काळीं परिस्थिति फारच निराळी झाली होती. धर्माचरणापेक्षां धर्मरक्षणाचा प्रश्न अधिक तीव्र व निकडीचा झाला होता. परकीय धार्मिक सत्तेनें हिंदु धर्माच्या मांडलेल्या उच्छेदाला पायबंद घालणें सर्व प्रथम जरूर झालें होतें. हिंदू धर्मावर घाला घालणाऱ्या परकीय सत्तेच्या गुलामगिरींत राहून ही गोष्ट कधींही साध्य होणार नव्हती. त्यासाठीं हिंदुंचें स्वतंत्र राज्य असणें जरूर होते. बलाच्या जोरावर स्वातंत्र्य मिळतें व मिळालेलें स्वातंत्र्य सदाचारामुळें टिकून राहतें यास्तव मारुती उपासना व रामभक्ति यांना श्री समर्थांनीं विशेष प्राधान्य दिले. गावोंगावीं मारुतीची व आखाड्यांची स्थापना करून बलोपासनेचा प्रसार केला. स्वतः हिंडून अगर शिष्यांना भिक्षेसाठीं घरोघरीं जावयास लावून श्रीसमर्थांनीं स्वराज्य मंत्र सर्वसाधारण जनतेपर्यंत पोहोंचता केला. पुढें शिवछत्रपतीला स्वराज्यस्थापनेसाठीं समर्थांनीं निर्माण केलेली मानसिक व शारीरिकदृष्ट्या कणखर अशी ही जनतेची आघाडी अति उपयुक्त ठरली.

## साहेबांचें सारें चांगलें

समर्थांनंतर सुमारें २५०–३०० वर्षांनीं काळ बराच फिरला. यावेळीं इंग्रजी सत्तेखालीं भारत रावत होता. या वेळची एकंदर परिस्थिती ज्ञानेश्वर,

एकनाथ, रामदास यांच्या वेळच्या परिस्थितीपेक्षां पुष्कळ निराळी होती. इंग्रजांनीं आपल्या बरोबर आणलेल्या पाश्चात्य विद्या व संस्कृती यांचा पगडा वाघिणीचें दूध प्यायलेल्या सुशिक्षित तरुण मनावर विशेष होता. विज्ञानाच्या किमया पाहून भारतीय मनें दिपून गेलीं होतीं. कोणास आजपर्यंत साधला नाहीं असा सबंध भारत घशांत टाकण्याचा इंग्रजांचा पराक्रम व विज्ञानाच्या साह्यानें आग-गाड्या तारायंत्रादी त्यांनीं केलेले चमत्कार पाहून साहेब म्हणजे साक्षात् देवच असा भोळा भाव जनतेंत उत्पन्न झाला होता. भारतभर म्हणून कीं काय रामाचींच माकडें रामकृपेनें मानवरूपांत आलीं असून भारतावर भारताच्या कल्याणासाठीं राज्य करण्यास देवानेंच त्यांना धाडलें आहे, असा एक अपसमज इंग्रजांची चेहेरेपट्टी पाहून जनतेनें करून घेतला होता. देवळांतल्या देवापेक्षां साहेबाला अधिक मान मिळे. बैल जसा स्वखुषीनें मानेवर जूं ठेवूं देतो तसें भारतीय जनतेनें स्वखुषीनें गुलामगिरीचें जूं घेतलें होतें. फोडा व झोडा हें भेदनीतीचें राजकारण इंग्रजांनीं आपल्या बरोबर आणलें होतें. यामुळें भारताच्या एकात्मतेला सारखे तडे पडत होते. आपलें सगळें वाईट व परकीय यांचें सर्व चांगलें अशी वृत्ति विशेषतः शिक्षित तरुणांत होती. परधार्जिणपणा जो अजूनही धुमसतोय तो विशेष होता. स्वधर्मावर अश्रद्धा, नास्तिकपणा, स्वार्थ हीच नीति यांचें विशेष प्राबल्य माजलें होतें. पायापुरते पाहिलें. बस. देश ? इंग्रज बघतो आहेच. अशी वृत्ति होती. हिंदू मुस्लीम तंटे, जाती जातींचें वैर, कर्मठपणाखाली माजलेला धार्मिक दंभ, समाज व देश या बद्दल बेफिकीर वृत्ति या गोष्टी जिकडे तिकडे बोकाळल्या होत्या.

## योग्यवेळीं अवतरण

अशावेळीं श्रीसाईबाबा एका खेड्यांत अवतीर्ण झाले. श्रीसाईबाबांची जन्म तारीख अज्ञात आहे. १८५७ सालचें स्वातंत्र्य युद्ध अयशस्वी होऊन भारतावर इंग्रजांची संपूर्ण सत्ता प्रस्थापित झाल्यावर थोड्याच वर्षांत शिर्डी सारख्या एका बाजूस असलेल्या खेड्यांत एके सकाळीं साईबाबा म्हणून ज्यांना म्हणतात त्यांची तेजस्वी बालमूर्ति शिर्डीकरांना दिसली. योगायोग म्हणा कीं ईश्वरी योजना म्हणा. आगें मागें याच सुमारास राजकारणात क्रांति घडवून आणणाऱ्या लो. टिळकांसारख्या विभूतीचा जन्म झाला. अध्यात्म व राजकारण यांत आपल्या ओजस्वी आणि तडफदार विचारांनीं क्रांति घडवून आणणाऱ्या या दोन विभूतींचा जन्म सन जवळपास असावा एवढेंच नव्हे तर त्यांच्या निर्वाणाचे सनही

जवळ जवळ असावे, याला काय योगायोग म्हणावें कीं त्यामागें नियतीची काहीं योजना असेल असें समजावें ? या दोन विभूतींची विद्यापीठेंही महाराष्ट्रांत एकमेकांपासून फारशीं दूर नव्हतीं. अध्यात्माचें विद्यापीठ श्रीकृष्णाच्या दक्षिणेकडील द्वारकेंत–शिर्डीत होते तर राजकारणाचें विद्यापीठ मुत्सद्यांच्या पंढरींत–पुणें येथें होतें. या दोन्हींविद्या पीठांचा म्हणजे अध्यातम व राजकारण यांचा सुंदर मिलाफ साबरमती आश्रमांत घडवून आणून नियतीनें महात्मा गांधींच्या रूपांत अधात्म, राजकारण व समाजकारण यांच्या एकात्मतेची बलशाली मूर्ति निर्माण केली. अध्यात्म, राजकारण व समाजसेवा ही स्वार्थासाठीं एकमेकांपासून अलग ठेवण्याचा मानवी मनाचा अट्टाहास असला तरी नियतीला तो मान्य नाहीं. राष्ट्राच्या भाग्योदयाचें भरजरी रेशमी वस्त्र अध्यात्म, राजकारण व समाजकारण यांच्या आडव्या उभ्या तलम धाग्यांनीं नियती-गिरिणींत तयार होत असते. नियतीची ही कला मानवी मनाला कळणें कठीण आहे. लो. टिळक राजकारणी असले तरी ते अंतरंगांत संत होते म्हणून राजकीय जीवन कंठूनही त्यांनी गीता रहस्यासारखा अद्वितीय ग्रंथ लिहून ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या कार्यांत भर घातली.

## लोकमान्यांचें कार्य

साईबाबा अंतर्बाह्य संत असले तरी व्यवहारांत सदैव दक्ष राहून आपल्या दैनंदिन जीवनांत आध्यात्मकता पाळावी कशी हें आधीं केलें व मग सांगितलें या न्यायानें त्यांनीं दाखवून दिलें. म. गांधीच्या अंतःकरणांत अध्यात्माचा झरा झुळ झुळ वाहात होता. त्याचें पाणी राजकारणांत व समाजकारणांत खेळवून या दोन्ही क्षेत्रांत पाणीदार व पराक्रमी मानवी भरघोंस पीक कसें निर्माण करावें व त्यायोगें राष्ट्राबरोबर अखिल मानवजातीचेंही कल्याण कसें साधावें, हें त्यांनीं दाखवून दिलें. लो. टिळक बाबांना ओळखत होते कीं नाहीं हें समजण्यास कांहीं मार्ग नाहीं. पण बाबा मात्र त्यांचें कर्तृत्व, त्यांचें साधुत्व व त्यांच्या गीता-रहस्याचें मोल जाणत होते. ही गोष्ट शिर्डीला घडलेल्या एका लहानशा घटनेवरून दिसून येते. विषयांतराचा दोष पत्करून ती गोष्ट सांगावी असें वाटतें. कोणाही भक्तास एखादी पोथी वा आध्यात्मिक ग्रंथ वाचावयाचा असल्यास तो आणून प्रथम बाबांच्या हातीं द्यावा व त्यांनीं आशीर्वाद देऊन परत म्हटल्यावर वाचावा अशी प्रथा शिर्डीला होती. एकदां एका भक्ताला कोणीतरी लो. टिळकांनें

गीतारहस्य पोस्टानें पाठविलें. हे गृहस्थ मशीदींत बाबांच्या जवळ असतां त्यांना ही बंगी मिळाली. काय आहे हें पहाण्यासाठीं त्यांनीं ती फोडली. पहातात तों गीतारहस्य ! ‘ काय आहे तें ? पाहूं रे ’ असें म्हणून बाबांनीं तें हातांत घेतलें. चाळून पाहिलें व बंद करून त्यावर एक रुपया ठेवला व ‘ वाचत जा, कल्याण होईल ’ असा आशीर्वाद देऊन तें त्या भक्तास परत दिलें. बाबांच्याकडे ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, व पंचदशी वगैरे कितीतरी ग्रंथ येत असत व आशीर्वाद देऊन बाबा ते परत करीत असत. पण रुपया ठेवून परत केला असा हा एकच एक ग्रंथ हें विशेष. असो. बाबा, टिळक व गांधीं यांच्या संबंधींचें एवढें लिहिण्याचा उद्देश हाच कीं सत्व रजतम यांच्या कमी जास्त अस्तित्वा खेरीज या सृष्टीला अस्तित्व नाहीं. तद्वत् जगांतील कोणतेंही महान् कार्य असो त्यांत आध्यात्मिक राजकीय व सामाजिक अशा एकमेकांना खुलवणाऱ्या सूक्ष्म धाग्यांची गुंतागुंत असल्याखेरीज तें कार्य पूर्ण होणार नाहीं, म्हणून सर्व संतांनीं अध्यात्म हा जीवनापासून कधींच वेगळा मानला नाहीं. अध्यात्मानें जीवनाला उजळा येतो व अशा जीवनानें अध्यात्म अधिकाधिक फुलत जातें. खुडलेली फुलें सुटी असताना दिसतात, त्यापेक्षां त्यांना सूत्रांत कुशलतेनें गुंफून केलेल्या हारांत वा वेणींत तीं अधिक सुंदर दिसतात. तसेंच जीवनांत अध्यात्म गुंफून त्याचा विणलेला गोफ अधिक सुंदर व उपयुक्त असतो. म्हणून अशा तऱ्हेचा गोफ विणण्याची कला सर्व संत जनतेला शिकवीत आले आहेत. साईबाबांनीं हेंच कार्य केलें. पण तें करतांना कोळी जसा स्वतःभोंवतीं एक प्रकारच्या गूढतेचें जाळे विणून घेऊन वावरतो तसे त्यांत ते वावरत असत. त्यांचें ‘ शिर्डीकरांना जें प्रथम दर्शन झालें तेंच मुळीं’ ‘अहो आश्चर्यम् अगा जें देखिलेंच नाहीं.’ अशा कोटींतील होतें. या बालसाईनीं ज्या कांहीं लीला शिर्डीकरांना दाखविल्या त्यांवरून शिर्डीकरांची खात्री पटली कीं ही वल्ली कांहीं निराळीच आहे. निराळेच पाणी येथें खेळतें हें जें निराळे पाणी त्याचा विचार या लेखांत करावयाचा आहे.

## ठावठिकाणा लागूं न देणारे एकमेव संत

साईबाबांच्या जीवनाबद्दल जी कांहीं माहिती उपलब्ध आहे तीवरून प्रथमदर्शनी कोणती गोष्ट लक्षांत येत असेल तर ती ही कीं त्यानीं आपला जन्म, आई वडील, जात, धर्म, पंथ हीं सर्व गुपीत ठेवलीं. कधीं कोणाला त्यांचा पत्ता लागूं दिला नाहीं व अजूनही लागत नाहीं. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व संतांत

असलें गुपीत ठेवणारे साईबाबा हे एकच एक संत दिसतात. तसें पाहिलें तर त्यांचें सर्व जीवन खुले होते. त्यांची मशीदमाई रात्रींव्यतिरिक्त सर्वांना खुली होती. भेद, गुप्त गोष्टी, खलबतें यांना त्यांच्याकडे थारा नव्हता. जें कांहीं बोलायचें, सांगायचें, करायचें, तें सर्वांदेखत. आपलें सर्व जीवन दिलदारपणें जनतेसमोर खुले ठेवणाऱ्या संतानें आपल्या जातिधर्माबद्दल मात्र गुप्तता ठेवली. हें एक साईबाबांचें वैशिष्ट्य आहे. पण खरोखरच वैशिष्ट्य आहे, कीं ती एक लहर आहे? कारण संत हे लहरी असतात. या गुपितामागे जनतेचें कांहीं एकाद्या विशिष्ट तत्त्वाकडे लक्ष खेचण्याचा त्यांचा उद्देश असला व तसें एकादें महत्त्वाचें तत्व त्यांच्या या करण्यामागे असलें तर मग ती लहर नसून तें एक वैशिष्ट्य ठरेल. जगाचा इतिहास सांगतो कीं जमिनीच्या तुकड्यासाठीं जशा लढाया झाल्या तसेंच धर्माच्या वर्चस्वासाठीं रक्ताचे पाटही वाहिले. जो ज्या धर्मांत, जातींत जन्मला त्याला तो धर्म व जात प्रिय असणें साहजिक आहे. जवळच्याबद्दल आपलेपणा व लांबच्याबद्दल परकेपणा वाटणें हा मानवी स्वभाव आहे. कोणी कितीही शिकलेला व सुधारलेला झाला तरी दुसऱ्या जाति धर्माशीं संबंध आल्यावर त्याच्या वागणुकींत थोडे फार उजवे डावे हें होणारच. एकाद्या मोठ्या मैदानांत चार भिंती बांधल्या तर मैदानाचे एकत्व भंगून भेद हे निर्माण होणारच. एकाच धर्मशाळेंत एकाच हॉलमध्ये राहणाऱ्या चार बिऱ्हाडांची आपसांतील वागणूक व तीच चार बिऱ्हाडे निरनिराळ्या चार घरांत राहूं लागल्यावर त्यांची आपापसांतील वागणूक यांमध्यें फरक हा असणारच. असाच फरक, असाच भेद धर्म, जाती व पंथ यामुळें मानवांत होतो. भेदांतूनच मत्सर, द्वेष, एकमेकांवर वर्चस्व गाजविण्याची वृत्ति निर्माण होतात. यामुळें मानवा मानवा-मधील एकात्मतेला तडा जाऊन मानवतेला खो बसतो. असें न होऊं देण्यास वरवर पहातां सहज सुचणारा उपाय म्हणजे जातिधर्माचें भेद नष्ट करणें हा होय. पण हें शक्य आहे काय? जातिधर्म, गरीब, श्रीमंत, श्रेष्ठ, कनिष्ठ वगैरे भेद जगांत राहणारच. ते पूर्णतः नष्ट करणें शक्य नाहीं. ही सर्व सृष्टी मुळांत भेदामुळें जन्मास आली आहे. भेद हा जगाच्या जीवनाचा पाया आहे. तो नाहींसा झाला तर मग काय शिल्लक राहिलें? अग्नि आगी लावतो म्हणून काय जगांतून अग्नीच नाहींसा करून टाकायचा कीं त्याचा योग्यप्रकारें उपयोग करण्याचें

शास्त्र शिकून कांहीं चांगलें निष्पन्न करण्याचा प्रयत्न करावयाचा ? तंटे बखेडे जे होतात ते कांहीं जातिधर्मामुळें होत नाहींत तर त्यांच्यामागें असलेल्या मानवी संकुचित वृत्तीमुळें होतात. संकुचित वृत्ती स्वार्थातून निर्माण होते. अहंकारामुळें स्वार्थ बळावतो व स्वार्थामुळें अहंकार पोसला जातो. अशा प्रकारें या गोष्टी एकमेकांस पोषक असल्यामुळें त्या काबूत आणण्याचा प्रथम प्रयत्न झाला पाहिजे. 'मी' एका बाजूस खडा झाला कीं लगेच दुसऱ्या बाजूस तूं तो तीं ते वगैरे खडे होतात. व जीवनाची लढत सुरू होते. मद, मत्सर, लोभ, द्वेष वगैरे सर्व रणांगणावर धांवत येतात. यास्तव माणसांतील मीपणा नष्ट झाल्याखेरीज जगांतील लहान मोठे संघर्ष थांबणार नाहींत. कोणताही धर्म वा पंथ भांडण तटे करायला शिकवीत नाहीं. व्यक्तीची मनोवृत्ति या गोष्टीस कारणीभूत असते. माणसाची संकुचित वृत्ति जाऊन तीऐवजी त्याला विशाल दृष्टी प्राप्त झाल्यास संघर्ष निकालांत निघतील, यास्तव सर्व धर्मांचा समन्वय करणारी अशी एकादी योजना पाहिजे कीं जी राबवतानाआपण आपल्या धर्माविरुद्ध वागत नसून ही योजना म्हणजे आपलाच धर्म आहे असे प्रत्येक व्यक्तीस वाटलें पाहिजे.

## विवेकानंदांचें कार्य

असा समन्वय करण्याचा प्रयत्न स्वामी विवेकानंदानीं केला. पण अल्पायुष्यामुळें काम अर्धवट राहून गेलें. "देशकालादिकांच्या आणि पंथोपपंथांच्या बंधना पलीकडे जाऊन एकाद्या असंस्कृत रानवटापासून प्रबुद्ध आत्म्यापर्यंत सर्वांच्या मनोभावना, आपापल्यापरीनें परम ध्येयाकडे वाटचाल करूं शकतील इतका सुंदर नि व्यापक समन्वय ज्यांत साधला आहे असा विश्वधर्म तुम्ही निर्माण करा." असें आवाहन स्वामीनीं सर्वधर्मपरिषदेंत केलें होतें. विश्वधर्म निर्मितीचें हें कार्य बाबानीं हातीं घेतलें. लोकांना ज्या योगें विशाल दृष्टी प्राप्त होईल, व सर्व धर्मांत बसेल अशा आचारतत्त्वांचा प्रचार त्यांनीं केला. ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधणारा जो मार्ग त्याला त्यांनीं, कोणतेंही नांव दिलें नाहीं, कारण धर्म, पंथ असें कांहीं नांव दिलें असतें तर पूर्वीं धर्माधर्मांत व पंथापंथांत जें झालें तेंच झालें असतें. दुसरें असें कीं, आपण अमुक धर्मजातिपंथाचे आहोंत हें समजल्यास आपल्या सांगण्याकडे सर्व धर्मपंथांचे लोक आपुलकीनें लक्ष देणार नाहींत. कारण आपला धर्म जात व त्यांचा धर्म जात यामुळें लोकांच्या वागणुकींत थोडेंफार उजवे डावे होणारच व त्यांतून भेद निर्माण होऊन कार्याचा नाश होईल. हें ओळखून साई-

बावांनीं आपला धर्म, जात, पंथ हे कधींच कोणाला कळूं दिलें नाहीं. यामुळें सर्व धर्मियाना बाबा हे आपलेच आहेत असें वाटतें. त्यांनीं कोणत्याही धर्माची व उपासनेची मक्तेदारी पत्करली नाहीं. ज्या सर्व धर्मांना मान्य व ज्या मानवतेला, समाजाला व व्यक्तीला पोषक व कल्याणदायक अशाच गोष्टी ते बोलत व भक्तांना करायला सांगत. विश्वधर्म यशस्वी करण्याचें एक साधन म्हणून त्यांनीं आपला धर्म गुपित ठेवला. केवळ लहर म्हणून नव्हे. हें एक त्यांचें फार मोठें वैशिष्ट्य आहे व त्यामुळें साईबाबा इतर संतांपेक्षां निराळे वाटतात.

## गुरुशिष्य परंपरेचा अभाव

बाबांच्या जीवनांत दुसरी दिसणारी गोष्ट म्हणजे गुरुशिष्य परंपरेचा अभाव ही होय. ते स्वतःला सद्गुरु म्हणून घेत नसत. आपण अल्लाचे सेवक आहोंत असें ते म्हणत. लोक त्यांना गुरू, सद्गुरू, महाराज असें म्हणत असले तरी बाबा या नांवानें ते अधिक ओळखले जात. आजही व्यवहारांत बोलतांना साईबाबापेक्षां बाबा हेंच नाव अधिक वापरलें जातें. मी गुरु व तुम्ही शिष्य अशी भावना त्यांनीं कधींच प्रगट केली नाहीं, कीं ऐकली नाहीं. उलट तुम्ही माझीं लेकरें असें ते म्हणत. त्यांचा भक्त त्यांच्या दृष्टीनें शिष्यही नव्हता वा भक्तही नव्हता. तो होता लेकरूं. "माझ्या लेकरांना मी उपाशीं राहूं देईन का ? मग मी कशाला पाहिजे ?" तुम्हीं खाल्लें तें माझ्या लेकरांनीं खाल्लें. तें मला पोहोंचलें." ही त्यांची वाक्यें आहेत. गुरुशिष्यापेक्षां पिता-पुत्र, आई-लेकरुं हा संबंध त्यांना अधिक पसंत होता हें त्यांच्या चरित्रावरून दिसतें. पितापुत्र, आईलेकरूं या संबंधामुळें जें प्रेम जी ममता, जे वात्सल्य व आपलेपणा सर्वसाधारण जनतेच्या सहज ध्यानीं येतो तसा तो गुरुशिष्य संबंधांत सहज व्यक्त होत नाहीं, कीं येत नाहीं. तसें पाहिलें तर गुरुशिष्य संबंध हा पितापुत्र संबंधच आहे, निदान असायला पाहिजे हें खरें असलें तरी बाबा जाणून होते कीं माझी लेकरें अशिक्षित आहेत, विद्वान्, ज्ञानी, पंडित नाहींत. म्हणून ईश्वराचें प्रेम, भक्ति, वात्सल्य, ज्या योगें सर्वसाधारण जनतेच्या सहज ध्यानीं येईल असे त्यांच्या अनुभवाचे पितापुत्र आई लेकरूं हे संबध त्यानीं दृढ केले. मशीदीला ते मशीदमाई म्हणत. ती आपली आई आहे असें ते सांगत. तिला द्वारकामाई असेंही म्हणत. आई ती आहे बहु मायाळ । लेकरालागीं अति कनवाळ । परी लेकरेंच निघतां टवाळ ।

कैसा सांभाळ करी ती ॥ असें ते आपल्या भक्तांना सांगत. मूठभर सुशिक्षितांसाठीं नव्हे तर खेडवळ अशिक्षित भोळ्या भावड्या जनतेसाठीं आपणास कार्य करावयाचें आहे व त्यांना मानवतेचा मार्ग दाखवावयाचा आहे हें बाबा जाणून होते. म्हणून लोकांच्या बोलींत ते बोलत असत. एढेंच नव्हे तर कित्येकवेळां ते शिव्या देत त्या सुद्धा विद्वानाप्रमाणें आडून पाडून शालजोडींतल्या नसत तर सरळ सरळ खेडवळ भाषेंत असत. ज्ञानेश्वरापासून तों रामदासापर्यंत जें सर्व संतांनीं सांगितलें तेंच त्यांनीं सांगितलें. नवीन असें कांहीं नाहीं. फक्त त्यासाठीं त्यांनीं बोली भाषेचा उपयोग केला.

## सर्व धर्म समन्वयी दृष्टि

ईश्वर, भक्त यांचा पितापुत्र संबंध ही कल्पना सकृत् दर्शनीं ख्रिश्चन धर्मांतून घेतल्यासारखी वाटली तरी तसें मात्र नाहीं. ख्रिश्चन धर्मांत असा संबंध दर्शविला आहे हें खरें, पण पिता पुत्र, आई लेकरू अशा प्रकारचा ईश्वर-भक्तांचा संबंध आपल्या वैदिक वाङ्मयांतही आढळून येईल. अल्ला शब्दही ते फार वेळा वापरीत असत. अल्लामियाची इच्छा, मशिदींतील फकीर, अल्ला अच्छा करेगा. हे शब्द नेहमी त्यांच्या तोंडी असत. अल्ला शब्दावरून मुस्लीम धर्माचा भास होतो पण अल्ला हा शब्द संस्कृत असून त्याचा आई, माता असा अर्थ होतो. अल्लोपनिषद म्हणून एक उपनिषद होतें. हल्ली उपलब्ध आहे कीं नाहीं हें माहीत नाहीं. गुरुशिष्य संबंधाऐवजी इतर धर्मामध्यें रूढ असलेले शब्द व कल्पना प्रामुख्यानें वापरण्यास 'सहज व सोपे' या खेरीच आणखी ही कारण असू शकेल. सर्व धर्म मुळांत एकच. भेद आपण करतो व निष्कारण भांडत बसतो.' अंतीं आपण सर्वच परमेश्वराची लेकरें आहोत. हे दर्शविण्यासाठीं व सर्व धर्म समन्वय साधून मानव जातीला मानवेल व आचरतां येईल असा एकादा विश्वधर्म—मानवधर्म किंवा आचारधर्म जो त्यांना जनतेला शिकवावयाचा होता, त्याला पोषक म्हणून कांहीं गोष्टी प्रामुख्यानें त्यांनीं जनतेसमोर पुनःपुनः आणल्या असाव्यात. हिंदु, पारशी यांना पूज्य असलेली अग्निपूजा धुनीरूपानें, हिंदू ख्रिश्चन यांना पवित्र असणारा दीप नंदादीपाच्या रूपानें, हिंदु मुस्लीम यांना आपल्या दैवताच्या दृष्टीनें पवित्र वाटणारे गुरुवार व शुक्रवार आणि हिंदु मुस्लीम पारशी यांच्या दैवतांना प्रिय असणारा ऊद या गोष्टी समन्वय साधण्याच्या दृष्टीनें त्यांनीं आपल्या आचारधर्मांत स्वीकारल्या असाव्यात असें वाटतें.

## गुरुशिष्य संबंध नको

आपण कोणाचे गुरु नव्हे कीं कोणी आपला शिष्य वा पट्टशिष्यही नव्हे, अशा प्रकारें वागण्यांत बाबांचा आणखी कांहीं उद्देश असावा. गुरुशिष्य संबंधामुळें गुरु व शिष्य दोघांवरही कांहीं बंधने पडतात. तीं दोघांनाही पाळावी लागतात. गुरु तितक्या योग्यतेचा असला व शिष्य ही तितका निष्ठावंत असला तर सर्व गोष्टी सुरळित होतात. नाहीं तर बंधनामुळें संघर्ष निर्माण होतात. त्यांतूनच पुढें भांडण तंटे होऊन एकाच्या चार गाद्या होतात. फुटीर व भेदवृत्ति ही आपणां भारतीयांच्या पाचवीला पुजली आहे हें आमचा इतिहास सांगतोच आहे. संघर्षामागोमाग भांडणतंटे व सवतासुभा ही आमची रीतच होऊन बसली आहे. यामुळें गादीवर बसणे याचा अध्यात्मांत जो विशेष अर्थ आहे त्या अर्थानें बाबा कधींच गादीवर बसले नाहींत. आपण कोणी मोठे सद्गुरु व इतर माझे शिष्य असा थाट त्यांना मान्य नव्हता. अध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी म्हणून आवश्यक समजली जाणारी जीं बंधने घातली जातात तीमुळें जर हेवे दावे, मत्सर निर्माण होऊन एकाची दोन शकले होत असतील तर अशीं बंधने आध्यात्मिक दृष्ट्या काय कामाचीं? यामुळें हृदयाहृदयांमध्यें असलेल्या हृदयस्थांची एकात्मता साध्य न होतां अहं, भेद वाढीस लागतो व अध्यात्माचा विचका उडून मोक्ष पूर्वेला तर चाल पश्चिमेला असा प्रकार होतो. बाबांना तर हृदया हृदयांची एकात्मता साधावयाची होती. गुरु शिष्य संबंधामुळें शिष्य गुरुच्या बंधनांत कसा पडतो व गुरु खऱ्या योग्यतेचा नसला तर एकंदर प्रकरण कसें हास्यास्पद होतें व शेवटीं अशा गुरूची कशी फजीती होते, ही गोष्ट जव्हारअल्ली नांवाच्या एका अहंकारी माणसाला आपला गुरु व आपण त्याचे शिष्य समजून जें एक नाटक साईबाबांनीं लोकांना दाखविलें त्यावरून दिसून येते. जोंपर्यंत गुरूची अहंवृत्ति व शिष्याचा लोभ नाहीसा झाला नाहीं तोंपर्यंत अशा संबंधांत या विसाव्या शतकांत फायद्यापेक्षां धोकेच अधीक असतात. गादीला मालमत्ता असली तर मग विचारूं नका. शिष्यांना ब्रह्मज्ञान होण्याऐवजीं ते ब्रह्मघोटाळे करून ठेवतात. हें सर्व ओळखून बाबांनीं शिष्यपरंपरा वा पट्टशिष्य अगर वारसा निर्माण होऊं दिला नाहीं. सर्व परिस्थिती लक्षांत घेऊन आपल्या कार्याला विघातक होऊं नये म्हणून हें सर्व बाबांनीं दूरदर्शीपणें केलें. तरीही बाबांच्यानंतर शिर्डीचें वैभव वाढल्यावर तपश्चर्येच्या बळावर चार सिद्धि मिळवून मी बाबांचा पट्ट शिष्य आहे, मी खरा आहे

असें म्हणत शिर्डीच्या वैभवावर आपला सर्वाधिकार व हक्क प्रस्थापित करण्यासाठीं कांहीं महाभाग पुढें आलेच. पण शिर्डीसंस्थाननें त्या सर्वांना बाजूला सारलें व बाबांचे तत्त्व राखलें, ही समाधानाची गोष्ट आहे. गुरुशिष्य संबंधाची प्रथा आपल्या पुरती तरी बाबांनी मोडून काढली. गुरु हा खरोखरच गुरु असला तर कासवी आपल्या पिलांपासून लांब असली तरी केवळ आपल्या दृष्टीनें (कूर्मदृष्टी) पिलांचें पोषण करूं शकते. त्याप्रमाणें गुरुही आपल्या भक्तांचें कल्याण केवळ कृपादृष्टीनें करूं शकतो व त्याला योग्य तें मार्गदर्शनही करूं शकतो. ही गोष्ट बाबांनीं स्वतःच्या वर्तनानें सिद्ध केलेली आहे. त्यांचें हें कृपादृष्टीचें कार्य ऐहिकदृष्टचा त्यांना जाऊन ५० वर्षें झाली तरी अजूनही चालू आहे. हें सर्वांच्या अनुभवाचें आहे. खाशा देशमुखाच्या म्हाताऱ्या आईनें बाबानीं आपणास अनुग्रह द्यावा म्हणून शिर्डीला प्राणांतिक उपोषण आरंभिलें व तीन चार दिवस अन्नपाण्यावाचून गेल्यानंतर जेव्हां ती मरणाच्या पंथास लागली तेव्हां बाबांनीं तिला जें सांगितलें तें इतकें मोलाचें आहे कीं प्रत्येक साईभक्तानें तें आपल्या हृदयावर कोरून ठेवण्यासारखें आहे. बाबा म्हणाले कीं माझ्या गुरूनें मला कधींच कानमंत्र दिला नाहीं. मग मी तरी तुला कानमंत्र कोठून देऊ ? माझ्या गुरूनें फक्त निष्ठा आणि सबूरी माझ्याकडे मागितली. मी ती दिली. यामुळे माझा गुरू निहायत खूष झाला व तेव्हांपासून गुरूची कृपादृष्टी माझ्यावर सदैव आहे. तूंही मला निष्ठा व सबूरी दे म्हणजे माझी अक्षय्य कृपादृष्टी तुझ्यावर राहील व तुझें सर्वप्रकारें भलें होईल. तूं माझें शिष्यत्व पत्कर असें बाबांनीं तिला सांगितलें नाहीं व असें कधींच कोणास सांगितलें नाहीं. देवावर निष्ठा ठेवा व सबूरी राखा म्हणजे अल्ला अच्छा करेगा एवढेंच साधेसुधे सांगणें त्यांचें होतें. एवढें केलेंत म्हणजे मग आईला आपल्या लेकरांचें पालन पोषण करणें व त्यांचें सर्वप्रकारें कल्याण करणें भाग आहे. अशाप्रकारें गुरु शिष्य संबंधापेक्षां पितापुत्र, आईलेकरू, असा संबंध बाबांना अधिक मान्य होता व त्यास अनुसरून त्यांनीं आपली वागणूक ठेवली, हें एक त्यांचें वैशिष्टच नव्हे तर काय ?

# शिरडीचे महान् संत

लेखक : द. मो. चित्रे.

मानवी जीवनांत संतांना अनन्यसाधारण महत्व आहे. जीवनांत सुख-दुःखाचे प्रसंग हरघडी निर्माण होतात. आणि विधिघटनाच अशी आहे कीं सुखा-पेक्षां दुःखाचेच प्रसंग जीवनांत अधिक उद्भवतात. श्रीतुकाराम महाराज पुढील अभंगांत म्हणतातः— " सुख पाहतां जवा पाडे । दुःख पर्वता एवढें ।। १ ।।ध्रु०।। घरी घरी आठवण । माना संताचें वचन ॥ १ ॥ नेलें रात्रीनें तें अर्धें । बालपण जरा व्याधें ॥ २ ॥ तुका म्हणे पुढा । घाणा जूं ती जसो मूढा ।। ३ ।। या भव सागरांत संत दीपस्तंभाप्रमाणे असतात. संसारांत संकटांच्या लाटा सारख्या उसळतात, मनांत भावनांचें वा विकारांचें तुफान उसळतें, अर्जुनाप्रमाणें युद्ध करावें कीं न करावें किंवा हॅम्लेटप्रमाणें जगावें कीं मरावें, असे प्रश्न निर्माण होतात. या वेळीं मानवी मन मार्गदर्शन उत्कंठतेनें शोधत असतें. अशा वेळीं संत अवतीर्ण होतात आणि आत्मविश्वासानें सांगतातः— " बाळा घाबरूं नकोस. हा पहा मी तुझ्या पाठीशी आहे. मी सांगतो त्या मार्गाने जा. तुझ्या संकटाचा परिहार होईल. तुझा मार्ग सुकर होईल. " इहलोकांत देहरूपाचें वावरत असतांनां श्रीसाईबाबांनीं आपल्या भक्तांना आसरा दिलाच, पण आज समाधी घेऊन पन्नास वर्षें पुरी झाल्यावरही श्रीबाबांचें मार्गदर्शन भक्तांना होत आहे. शिर्डीला प्रत्यहीं जो जनसंमर्द उसळतो तो याच गोष्टींची साक्ष देतो.

संतपद प्राप्त होणें सोपे नसतें. श्रीतुकाराम महाराज म्हणतात, " संतांचा महिमा तो बहु दुर्गम। शाब्दिकांचे काम नाहीं येथें ।।१।। बहु धड जरी जाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥ २ ॥ तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण । तरीच महिमान येईल कळों ॥ ३ ॥ संत पदीं विराजमान होणें अतिशय कठिण असतें. वटवट करणाराला येथें थारा नाहीं. म्हैस किंवा गाय कितीही धष्टपुष्ट झाली, कितीही उपयोगाची वाटली तरी ती कधी तरी कामधेनु होईल कां ?

अंगीं सद्गुण बाणावे लागतात, बोलण्याप्रमाणें कृती करावी लागते, सदैव समाज सेवेंत रत व्हावें लागतें, तेव्हांच संतपद मिळते. रंजल्या, गांजल्यांची सेवा करण्यांत श्रीसाईबाबांनीं आपलें सर्व जीवन व्यतीत केलें. आणि म्हणूनच श्रीसाईबाबांच्या कार्यांचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला.

याच सुगंधासंबधी श्रीतुकाराम महाराज म्हणतात, ' संतसगें याचा वास सर्वकाळ संचला सकळ मूर्तिमंत ॥१॥ ॥ ध्रु० ॥ घालुनिया काळ अवघा बाहेरी । त्यासीच अंतरी बास दिला ॥ २ ॥ आपुलेंसें तिहीं नाहीं उरों दिलें । चोजवितां भले ऐसीं स्थळें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदनचि ॥ ३ ॥ शिर्डीस श्रीसाईबाबांनीं पाऊल टाकलें तें कायमचें. ते शिर्डीच्या परिसराबाहेर कधींच गेलें नाहींत. पण त्यांच्या कीर्तीचा सौरभ जगभर पसरला आहे. त्यांनीं आपला देह लोककल्याणाठीं चंदनासारखा झिजविला. मानवी देहाची सार्थकता लोककार्य साधण्यासाठीं तिळतिळानें आठवण्यांत आहे हें त्यांनीं स्वतःच्या कृतीनें जगाला दाखवून दिलें.

संतकार्य मानवी जीवनाला किती उपकारक असतें हें श्रीतुकाराम महाराजांच्या पुढील अभंगावरून स्पष्ट होईल. संतांचिया पायीं माझा विश्वास । सर्वभावें दास जालों त्यांचा ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ तेचि माझे हित करिती सकळ । जेणे हा गोपाळ कृपा करी ॥ २ ॥ भागलिया मज वाहतील कडे । त्यांच्या यानें जोडे सर्वसुख ॥ ३ ॥ तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडीं बोलिलो तें ॥ ४ ॥ आबालवृद्धांशीं आत्मीयतेने समरस होणारा भगवान् श्रीगोपाळकृष्ण माझ्याकडे आकृष्ट झाला आहे. याचें कारण संताचें मार्गदर्शन. मानवाला जीवनांत जें सौख्य प्राप्त होतें, याचें कारण संतांची शिकवण. या शिकवणीमुळेंच माणसाला योग्य मार्गाची निवड करतां येते. ' संतांचा उतराई होण्यासाठीं मी सर्व ते प्रयत्न करीन, त्यांत कसूर बिलकूल करणार नाहीं, असें निश्चयपूर्वक श्रीतुकाराम महाराज सांगतात.

**संताची स्तुति ते दर्शनाच्या योगें । पडिल्या प्रसंगे ऐसी कीजे ॥ १ ॥ ध्रु० ॥ संकल्प ते सदा स्वामीचेचि चित्तीं । पाकों नये वृत्ति अखंडीत ॥ २ ॥ दास्यत्व तें असे एकविध नावे । उरों नये जीवें भिन्नत्वासी ॥ ३ ॥ निजबीजा तेथे तुका अधिकारी । पाहिजे ते पेरी तये वेळे ॥ ४ ॥**

कामांत यश मिळविण्यासाठीं चित्त एका ठिकाणीं स्थिर करून काम करा. एकदां चित्त स्थिर झालें कीं तुम्हीं वाटेल ते पेरा. त्याप्रमाणे फळ मिळेल. स्थिर चित्ताचें फळ उत्तम. श्रीसाईबाबाही हाच उपदेश करतात.

श्रीसाईसच्चरितांत श्रीसाईबाबा म्हणतातः— मी एक फकीर. मला घरदार बायको कोणीही नाहीं. सर्व प्रकारच्या चिंतेंतून मुक्त होऊन मी एकाच ठिकाणीं रहात आहे. तरीही मायेच्या तावडींतून मी सुटलेला नाहीं. ती मला वारंवार सतावीत असते. मी स्वतःला विसरूं शकतो; परंतु त्या बयेला मात्र विसरूं शकत नाहीं. ब्रह्मदेवाला मायेनें सोडलें नाहीं. मग माझ्या सारख्याचें काय ? जे भगवंताला सर्वपरीनें शरण जातात तेच तिच्या कृपाळूपणानें तिच्या तावडींतून सुटूं शकतात. " मायेसंबंधी श्रीतुकाराम महाराज सांगतात. माया मोहजाळीं:— होतो सांपडला । परि या विठ्ठला कृपा आली ॥ १ ॥ ध्रु ॥ काढूनि बाहेरी ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ॥ २ ॥ नाचे उडे माया करा कवतुक । नाशवंत सुखें साथ केली. ॥ ३ ॥ रडे फुंदे दुःखे कुटतील माथा एकासी रडतां जें ही मरे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज वाटतें नवल । मी माझे हे बोल ऐकोनियां ॥ ५ ॥ मायेच्या मोहजालांतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे भगवंताला शरण जाणे आणि आपले कर्तव्य करीत रहाणें.

श्रीमत् रामकृष्ण परमहंस यांना कालीमातेच्या ठिकाणीं येशू ख्रिस्ताचे दर्शन झाले. महमंद पैगंबराचें दर्शन झालें. मोझेसचें दर्शन झालें. श्रीसाईबाबांच्या बाबतींत तेंच घडले. श्रीसाईबाबा मशीदींत वास्तव्य करित; अग्यारींत जसा अखंड विस्तव प्रज्वलित असतो, तशी त्यांची धुनी सदैव पेटलेली असे; हिंदू देवतांचे जन्मदिन ते मोठ्या समारोहानें साजरे करीत. आणि म्हणूनच त्यांचे शिष्यगण सर्वधर्मांत, सर्वजमातीत पसरलेले आहेत. सर्वधर्मी समानत्व हेंच श्रीसाईबाबांच्या शिकवणीचें सार.

शके १८९० च्या विजया दशमीस श्रीसाईबाबांच्या समाधीला ५० वर्षे पुरी होतात. सालोसाल त्यांचा शिष्यगण वाढतच आहे. यंदां शिर्डी येथें व मुंबई येथें त्यांचा उत्सव भव्य प्रमाणावर साजरा होत आहे. त्यांच्या पादुका मुंबईस आणल्या जाणार आहेत, श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या शब्दांत आपण त्या पादुकांचें स्वागत करूं याः– " संताच्या पादुका घेईन मोचे खांदीं ।

हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ भजन विधी नेणें साधन उपाय। सकळ सिद्धी पाय हरिदासांचे ॥ २ ॥ धानगति मति आसन समाधि। हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥ ३ ॥ नेणता निर्लज्ज नेणें नादभेद। सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ॥ ४ ॥ सर्वजोडी मज गोत आणि वित्त। तुका म्हणे संत महंत पाय ॥ ५ ॥ बहुजन समाजाजवळ हरिनामासारखें सोपें साधन नाहीं. व्रत नको, तप नको, तीर्थाटण नको, फक्त आत्मीयतेनें हरिनामाचा गजर करा. मानवी जीवन सार्थक होईल. शुद्ध अंतःकरणानें मनन, शुद्ध अंतःकरणानें इष्ट देवतेचें पूजन, कर्तव्य प्रसंगीं अखंड सावधान यांतच मानवी जीवनाचें साफल्य आहे. ती हीच श्रीसाईबाबांची शिकवण आमच्यावर वरदहस्त असूं द्या ही आमची श्रीसाईचरणीं प्रार्थना.

May thou pervade our entire being for the good of us and for the good of society, Oh Saï !

# श्रध्दा आणि सबुरी

लेखकः- **केशव कृष्ण प्रधान**

**श्रीसाईबाबांच्या हजारो भक्तांत कोणी श्रीमंत असेल तर कोणी गरीब असेल; कुणी दीन दुबळा असेल तर कुणी सशक्त, धिप्पाडही असेल. त्यांत स्त्रिया व पुरुषही असतील. जो तो आपापल्या गावांत प्राप्त परिस्थितींत दिवस कंठीत असेल. या सर्वांस ह्या सुवर्ण महोत्सवाच्या मंगलप्रसंगी गिरवण्यासारखा जर बाबांचा कोणता दिव्य संदेश असेल तर तो म्हणजे श्रद्धा आणि सबुरी हाच होय.**

एक वृद्ध देशमूखबाई श्रीसाईबाबांकडे, मला मंत्र द्या असा हट्ट धरून बसली. तुम्ही मंत्र न दिल्यास मी अन्न पाणी ग्रहण करणार नाहीं. असा निर्वाणीचा निरोप घेऊन श्री. माधवराव देशपांडे श्रीसाईबाबांकडे तिची रदबदली करण्यास गेले. तेव्हा श्रीसाईबाबाना तिची दया येऊन त्यांनी तिला आपल्या समोर बोलवून घेतले व गोड शब्दांत तिला उपदेश केला.

श्रीसाईबाबा म्हणाले "आई हें बघ माझ्या गुरूनेंसुद्धा मंत्र देऊन माझे कान फुंकले नाहींत. तेव्हां मी तरी तुला मंत्र कसा देऊं ? तसें म्हटलें तर माझा गुरु मोठा अवलीया होता. परंतु त्यानें माझ्याकडे दोन पैशांचा हट्ट धरला. ते पैसे होते 'श्रद्धा' आणि 'सबूरी'. माझ्या गुरूला व्यवहारी पैशांशीं काय करावयाचें होते ? मी मात्र त्याला ते पैसे ताबडतोब देऊन टाकले. तसे तूं मला 'श्रद्धा' व 'सबूरी' हे दोन पैसे द्यावयास तयार आहेस का ? तयार असशील तर मुकाट्यानें प्रथम जेवून घे पाहूं.

कासवीच्या पिलांना कासवी नदीच्या दुसऱ्या तीरावरुन नुसत्या आपल्या डोळ्यांच्या उबेनें वाढवते, पोसते. तसेच, तूं कुठेही असलीस तरी सदैव मी मंत्रासारखा तुझ्या पाठीशीं उभा राहीन. आपोआप माझ्या स्मरणानें तुला आत्मज्ञान प्राप्त होईल. श्रद्धेने वाल्या कोळ्यानें 'मरा मरा' जप जपल्यानें त्याला रामदर्शन झालें. व तो थोर वाल्मीकीऋषी ह्या पदवीला चढून राम अवतारापूर्वीच रामचरित्र लिहूं शकला. इतकी थोरवी श्रद्धेची आहे. श्रीसाईबाबांचे सर्व

हिंदुस्थानभर पसरलेले हजारो भक्त आज श्रीसाईबाबांच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांचे श्रद्धेनें आणि भक्तिभावाने स्मरण करीत असतील. त्यांना शिरडीपासून हजारों मैलांवरसुद्धां केवळ श्रीसाईबाबांच्या स्मरणानें ब्रह्मानंदाची प्राप्ती होऊन व आज पन्नास वर्षे सबूरी धरल्याचे फळ या श्रद्धेनें निश्चित प्राप्त झालें असेल. 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्य हम्' अशी श्रीभगवान श्रीकृष्णांची वाणी आपणा सर्वांस श्रीसाईबाबांप्रमाणेंच जबर श्रद्धा ठेवण्यास शिकवीत नाहीं का ? त्याचें फळ 'श्रद्धावान् लभते ज्ञानं' ह्या उक्तीत सांगितल्याप्रमाणें मिळाल्याशिवाय कसें राहील ?

## श्रद्धा हा अमूल्य ठेवा

श्रद्धा हा असंख्य दीनदुबळ्या, अनाथ, अशिक्षित समाजाचा एक अमूल्य ठेवा आहे. श्रद्धेतूनच भक्तीची निर्मिती होते. 'दयाधन भक्ती आकळिला' श्रद्धा ठेऊन दयाधनाची भक्ती केल्यास तो दयाधन आपल्यावर दयेचा वर्षाव केल्याशिवाय रहात नाही. केवळ श्रद्धेच्या जोरावर मीराबाई व अंधसंत श्रीसूरदास ह्यांच्या पुढें मार्गे खाली, वर, भोवताली, जिकडे तिकडे, नयन मनोहर श्रीकृष्णप्रभु मुरली वाजवीत सर्वभान विसरून नाचू लागत. त्याच श्रद्धेमुळें त्यानें कबीराचे शेले विणले. सावतामाळ्याची भाजी खुडली. सखूची लुगडीं धुतलीं. जनाबाईचे दळण दळून दिलें. नरसी मेहेत्याची हुंडी पटवली. व श्रीएकनाथ महाराजांच्या घरीं श्रीखंड्या म्हणून एका क्षुल्लक नोकराचें काम केलें. हे सर्व चमत्कार श्रद्धेमुळें कसें घडतात हें कोडे, आधुनिक शास्त्रज्ञसुद्धा उलगडू शकत नाहींत. व त्यांना ते अजूनही कित्येक शतके उलगडणार नाही. म्हणूनच ते त्याला भास, आभास अशी कांहींतरी नांवे देऊन श्रद्धेची टर उडवतात.

## शिक्षणाचा दुरुपयोग

आपल्याकडील सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या बहुजन समाजाला देवभक्ती म्हणजे केवळ दुबळेपणाचें लक्षण, ढोंगबाजी, अडाणीपणा आहे असें वाटतें. ह्याचें कारण ते त्याच्यावर नीट विचार करीत नाहींत. शिक्षणाचा दुरुपयोग करितात. पाश्चिमात्य लोक पुढारलेले आहेत असें समजून आपणही त्यांच्यासारखे वागलो, बोललो, चाललो, कपडे घातले व रहाणी तशी ठेवली तर लोक आपल्यालाही पुढारलेले समजतील, या निवळ ढोंगी कल्पनेनें ते तसें करतात व श्रद्धेची टर उडवितात. त्या उलट पाश्चिमात्य शिक्षण घेऊन त्यामध्यें नावलौकिक मिळ-

विलेले कै. ह. भ. प. सोनोपंत दांडेकरांसारखे महान् तत्वज्ञानी पुरुष केवळ श्रद्धेची कास धरून हजारो वारकऱ्यांच्या समवेत दरवर्षी विठ्ठलनामाचा गजर करीत पंढरपूरला जात असत. ह्यावरून श्रद्धा ही एक टर उडविण्याची बाब नसून तिच्यामध्यें कांहींतरी तथ्यांश आहे, असें आपले पुस्तकीज्ञानी आतां तरी कबूल करतील अशी आशा आहे. श्रीसाईबाबांच्या भक्तांना श्रद्धेची थोरवी निराळी सांगावयास नको. श्रीसाईबाबांच्या हयातींत व श्रीसाईबाबांच्या समाधीनंतर गेली पन्नास वर्षे केवळ रामनामाने दगड तरले त्याप्रमाणे श्रीसाईबाबांच्या स्मरणानें संसारांतील शेकडों विवंचना चुटकीसरशा दूर होण्याचा अनुभव भक्तांना आहेच. त्यांची खात्री झाली आहे कीं, श्रीसाईबाबा ही एक प्रचंड शक्ति असून ती श्रद्धा व सबूरी असल्यास निश्चितपणें साह्यार्थ धावून आल्याशिवाय रहात नाही. मग तो प्रसंग कितीही कठीण असो ! तुम्ही मृत्यूच्या जबड्यांत सापडलेले असा किंवा तुमचा लाडका नातेवाईक मृत्युशय्येवर पडलेला असो, तुमची नोकरी सुटण्याची वेळ आली असो, किंवा तुमच्या मनाप्रमाणें जमलेलें लग्न मोडायच्या बेतांत असो, मुलगा परीक्षेंत नापास होणार अशी भिती वाटत असो, किंवा स्थळासाठीं दाखविलेली तुमची लाडकी लेक नापसंत पडेल असें वाटत असो. फक्त श्रीसाईबाबांचे श्रद्धा आणि सबूरी हे दोन पैसे देऊन स्मरण करा व मग बघा चमत्कार ! हा क्षण ऐश्वर्य अष्टसिद्धी युक्त साकार परमेश्वर श्रीसाईबाबा तुमच्या मदतीला धावून येतो कीं नाही ? वाटेल तर त्याची माझ्याशी पैज लावा. निश्चिततपणे तुम्ही हराल. मी हरणार नाही. श्रद्धा ह्या विषयावर मी श्रीसाईलीलेंत ह्यापूर्वींच तीन लेख लिहिले आहेत. त्यामध्नें श्रद्धेच्या शक्तीबद्दल मी साद्यंत विवेचन केलें आहे. आता सबूरी बद्दल आपण विचार करु.

## सबुरीचा सखोल अर्थ

श्री. दाभोळकर ह्यांनी लिहीलेल्या श्रीसाईसच्चरीत्र ह्या ग्रंथामध्यें बऱ्याच अध्यायांत ह्या सबूरीचा उल्लेख आहे. वरवर पहाता सबूरी हा शब्द फार सोपा दिसतो. परंतु तो जेव्हा श्रद्धा व सबूरी ह्या जड गोळींत वापरला जातो, तेव्हां त्याचा अर्थ फारच सखोल असतो. श्रीसाईसच्चरीत्रांत वर्णन केल्याप्रमाणें श्रीसाईबाबा भक्तांच्या म्हणजे त्यांच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांच्या मार्गांत सक्तृद्दर्शनी इतके असंख्य काटेकुटे पेरतात कीं त्या मार्गांतून जाताना पदोपदी त्याला अतिशय त्रास होतो. परंतु अगदी ह्याच वेळीं श्रद्धेमध्यें किंचीतही कमतरता न

पाडता सबूरीच्या साह्यानें वाटचाल करावी. कारण ही त्या श्रद्धावानाची एक प्रकारे सत्वपरीक्षाच असते. व ती श्रीसाईबाबा फळ देण्यापूर्वी जरूर घेतातच. कांहीं ग्रंथांतून असा उल्लेख आहे की श्रीहरी आपल्या भक्तांपासून आपली लाडकी स्त्री लक्ष्मी हिला पूर्ण हिरावून नेतो. व कांहीं वर्षे त्यास दारिद्र्यांत खितपत पडावे लागते. परंतु सबूरी धरून जर तो भक्त श्रीहरीवरील आपली श्रद्धा यत्किंचितही कमी करणार नाही तर शेवटी श्रीहरी त्यावर प्रसन्न होऊन इच्छित फळ जरूर देतो. श्रीसाईबाबांचें अगदी तसेंच आहे. राजा हरिश्चंद्राच्या सत्वाची परीक्षा विश्वामित्र ऋषींनी घेतली. सती अनसूयेची परीक्षा ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिमूर्तींनी घेतली, वगैरे अनेक दाखले आपणाला पुराणांत सांपडतील. ते दाखले येथें देण्याचा उद्देश असा कीं आपण पण श्रद्धायुक्त सबूरीनें कठीण प्रसंगीं वागलें पाहिजे; मगच 'त्याजिं भक्तांसाठीं लाज, जगीं दास होउनि आलों' ह्या भगवंताच्या उक्तीचा आपल्याला प्रत्यय येईल. तेव्हा श्रद्धेएवढेच सबूरीचें महत्त्व आहे. नेहमीच्या व्यवहारांत सुद्धा ज्याला आपण इंग्रजीत Patience म्हणतो तें सोडून चालत नाहीं.

## ह्या भवसागर तरण्याचें साधन

ह्या साई सुवर्ण महोत्सवाच्या मंगलदिनीं श्रद्धा आणि सबूरी ह्या दोन वल्ह्यांच्या साह्यानें सतत श्रीसाईनामाचा घोष करून आपण भवसागर पार करून जाऊं या. ही सुवर्णसंधी आयतीच आपणांस साई शिकवणींची उजळणी करण्यास मिळाली आहे. त्याचा आपण पुरेपूर उपयोग करून घेऊंया. श्रीसाई-बाबांच्या हजारो मैल विखुरलेल्या भक्तांत कुणी श्रीमंत असेल तर कोणी गरीब असेल, कुणी दीन दुबळा अनाथ असेल तर कुणी सशक्त, धिप्पाड, शक्तिशाली असेल, त्यांत स्त्रिया असतील पुरुष असतील, म्हातारे असतील, विधूर असतील किंवा पती निधन पावल्यानें वैधव्य आलेल्या स्त्रियाही असतील. जो तो आप-आपल्या ठिकाणीं आणि आपआपल्या गांवात प्राप्त परिस्थितींत दिवस कंठीत असेल. त्या सर्वांस ह्या श्रीसाईबाबा सुवर्णमहोत्सवाच्या मंगलसमईं पवित्र श्रीसाईनामासहित श्रद्धा आणि सबूरी हाच श्रीसाईबाबांचा दोन शब्दी दिव्य संदेश दिलासा देईल—नाहीं तो खात्रीनें देईलच, ह्या श्रद्धेनें हा लेख लिहिला आहे.

# बाबांचें भक्तांना आश्वासन

लेखक : **गं. रा. भट**

श्रीसद्गुरु साईबाबांची ५० वी पुण्यतिथी यावर्षी विजयादशमीला येत आहे. त्यानिमित्त जे विचार सुचले ते पुढें मांडले आहेत.

**जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले**
**तोचि साधु ओळखावा, देव तेथेंची जाणावा.**

श्री सद्गुरु साईबाबांचें सर्व जीवन वरील अभंगांत सामावलें आहे. बाबांनीं आजन्म आपल्या भक्तांसाठीं देह झिजवला व आपल्या भक्तांची सदैव काळजी वाहिली. 'वरी सांगतों ऐक शामा। प्रेमें घेईल जो मन्नामा। तयाच्या मी सकल कामा। पुरवी प्रेमा वाढवी' (श्रीसाईचरित्र अध्याय ३।११) 'जो मजलागी अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्भजन। माझें चिंतन माझें स्मरण। तयाचें उद्धरण ब्रीद माझें' (अध्याय ३।१५) 'मी माझिया भक्तांचा अंकिला। आहे पासींच उभा ठाकला। प्रेमाचा मी सदा भुकेला। हांकेला हांक देतसें. व्यवहारी सामान्य जीवनांतच त्यांनीं परमार्थाचा मार्ग दाखविला.

बाबांचा जीवन काळ असा होता कीं, त्यावेळीं जाहिरातबाजी नव्हती, प्रसिद्धीचा झगझगाट नव्हता (अर्थात् बाबांना त्याची मुळींच जरूर नव्हती) त्यावेळेचा महाराष्ट्र सामाजिक व धार्मिक बाबतींत फार कर्मठ होता. या पार्श्वभूमीवरून विचार केला म्हणजे मति कुंठित होते; कारण कीं बाबांच्या भक्तमंडळींत ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत व निरक्षरापासून विद्वानापर्यंत समाजांतील सर्व थरांचे लोक होते—भिन्न धर्मांचे लोक होते.

त्याकाळीं शिरडीला प्रवासाची व जेवण्याखाण्याची आजच्यासारखी सुख-साधनें नव्हती. शिरडी म्हणजे एक लहानसें खेडेगांव. अशा स्थितींत हजारो लोक बाबांच्या भोंवतीं गोळा झाले—जमा झाले. जमा झाले याचा अर्थ असा नव्हे कीं ते नुसते बघे होते किंवा तमासगीर होते. बाबांना पूर्णपणें शरण गेलेले सद्भक्त होते. निंदक असो वा नास्तिक असो. बाबा खरोखर साधू आहेत कीं ढोंगी आहेत तें पहाण्यासाठीं गेलेला चिकित्सक असो. बाबांचें दर्शन होतांच, मनांतला मूळ हेतू विसरून. विनम्रपणें बाबांच्या पायां पडत व बाबांचे भक्त होऊन परत जात. बाबांजवळ अशी कोणती किमया होती ? याला उत्तर एकच. एक तर बाबा खरोखर अवतारी पुरुष होते व त्यांचा दरबार सर्वांना खुला होता. त्या दरबारांत सर्वांना एकच माप होतें. हा लहान भक्त, हा मोठा भक्त, हा राव

आणि हा रंक असा बिलकुल भेदभाव नव्हता. त्याचें सर्व जीवन स्पष्ट, उघडें व गंगेप्रमाणें निर्मळ होतें. तिथें कुठलीही गुप्तता नव्हती कीं लपवाछपव नव्हती.

जो जो भक्तिभावानें त्यांना शरण गेला त्याच्या कल्याणासाठीं बाबा अहोरात्र जपत. भक्तांचें संकट निवारण हें तर त्यांचें ब्रीद होतें. आणि त्यासाठीं ते स्वतः शारीरिक व मानसिक कष्ट सहन करीत. केवढें भव्य नि उदात्त जीवन होतें त्यांचें ! सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, त्यानीं आपल्या भक्तांना कुठल्याही खडतर गोष्टी किंवा अत्यंत उग्र उपासना करण्यास सांगितलें नाहीं. भक्ति, श्रद्धा नी सबुरी, या सोप्यांतल्या सोप्या गोष्टी त्यानीं आपल्या भक्तांना शिकविल्या व माणुसकीचा व्यवहारी मार्ग दाखविला.

आजच्या परिस्थितींत विचार केला तर बाबांचा कोणी शिष्य नाहीं कीं दलाल नाहीं. शिरडीला गेलेंच पाहिजे असा कोणी कोणाला जुलूम करीत नाहीं, कीं आग्रह करीत नाहीं. असें असूनसुद्धां आज लाखो लोक शिरडीला जातात, बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन समाधान पावतात. इतकेंच नव्हे तर संस्थानला न मागतां लाखो रुपये देतात. हा केवढा चमत्कार आहे ! या सर्वाला कारण एकच. बाबांनीं आपल्या हयातींत आपल्या भक्तांनां जें कायमचें आश्वासन देऊन ठेवलें आहे तें ते आजही पुरें करीत आहेत.

'झालों जरी गतप्राण । वाक्य माझें माना प्रमाण ।
माझीं हाडें तुर्वतीमधून । देतील आश्वासन तुम्हास ।
मी काय पण माझी तुर्वत । राहील तुम्हासवें बोलत ।
जो तिला अनन्य शरणागत । राहील डोलत तया सवें ॥
डोळ्यां आड होईन ही चिंता । करूं नका तुम्ही मजकरितां ।
माझी हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥
मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।
ठेवा, करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल' ॥
श्रीसाईचरित्र अध्याय २५।१०५.१०६.१०७।१०८

जो कोणी बाबांच्या उपदेशाप्रमाणें वागेल त्याच्यासाठीं ती समाधी जागती आहे–जिवंत आहे व बाबांचें अवतार कार्य अजूनही तसेंच पुढें चालवीत आहे.

धन्य ते श्रीसद्गुरुसाईबाबा, धन्य तो शिरडीगांव व धन्य ते बाबांचे भक्त. श्रीसद्गुरु बाबांच्या चरणीं अनन्यश्रद्धापूर्वक नमस्कार करून व सर्वांचें अभीष्ट चिंतून हीं विचारसुमनें श्रीचरणी अर्पण करतों. शुभं भवतु.

———

# कोयनेचा प्रक्षोभ

**लेखकः रा. ल. मोकल**

भारतीय तत्वज्ञानाचा मागोवा घेतला तर जगाची उत्पत्ति शून्यांतून साकार होते, शून्यांतून ब्रह्म निर्माण झालें, त्याला साथ मायेची मिळाली. मायेंतून भावनांचें विश्व तयार झालें.

विज्ञानाच्या महासागराचा तळ शोधला तर जिवाची उत्पत्ति अमिबा जवळ जाऊन थांबते. प्रथम अमिबा निर्माण झाला; त्याने विविध आकार धारण केले आणि त्याच्या निर्मितीबरोबर त्याची निसर्गाशी टक्कर सुरू झाली. लहरी निसर्गाने कधी त्याला साथ दिली, आपल्या अंगा खांद्यावर खेळविले तर कधीं पायाखालीं चिरडून टाकण्यासाठीं उन्मत्त हैदोसहि घातला.

अमिबापासून उत्क्रांत झालेल्या त्याच्या अपत्यांनी निसर्गापुढें मान वाकविली; खायला दिले, आनंद नाहीं, नाश केला दुःख नाहीं. अशा स्वरूपांत त्याच्याशी सहकार्य केले पण त्याच अमिबांतून उत्क्रांत झालेल्या मानवानें मात्र ही याचना मानली नाहीं. मिळालेले चार पाय केवळ चालण्यासाठीं न वापरतां त्याने त्यातले दोन जमिनीपासून वर उचलले आणि तो टक्कर देण्यासाठीं ताठ उभा राहिला आणि इतरांना वाकविणाऱ्या निसर्गाला त्याने आपला दास बनविण्याचा चंग बांधला. त्याची ती धडपड तो गुहेंत होता तेव्हांपासून सुरू आहे; आणि आज चंद्राच्या मार्गावरील त्याचें पाऊल, ती धडपड बंद पडलेली नाही हेंच दर्शवीत आहे. मानवाला लाभलेले बुद्धीचे वरदान निसर्गाला वेसण घालू पहात आहे. नैसर्गिक शक्ती गुलाम बनून त्याच्या घरांत राबत आहेत. आणि त्यामुळे कधीं कधी मानव खुशींत गाजरे खाऊं लागतो. "जिंत मयाचा" अभिमान बाळगूं लागतो, पण क्षणातच त्याचे ते इमले मातीला मिळतात. निसर्गाचा लहानसा फटकारा त्याच्या अनंतकालच्या श्रमांना मातीमोल करतो, समृद्ध जीवनें उध्वस्त होतात; होत्याचें नव्हतें होऊन जातें.

१३ डिसेंबर १९६७ च्या रात्रीं त्याने अशीच क्षणभरच आपली चुणुक दाखविली, काही सेकंदाचाच त्याचा हुंकार पण त्यानें सह्याद्रीच्या कणखर व भरभक्कम पाठीवर विसावलेल्या महाराष्ट्राच्या जीवनांत प्रचंड खळबळ उडविली.

नमणे ज्याला माहित नाहीं
पहाड बनले ज्याची छाती
सागर सुद्धां चरणी अर्पी
अर्घ्य आपुलें लहरी हाती

अशा या महाराष्ट्रालाहि क्षणभरच त्याने अगदी थोडेसें हलवलं पण त्या किंचित् हलविण्यानेंच सारा महाराष्ट्र हादरला, कोयनेच्या कुशींत मानवानें निर्माण केलेलें वैभव क्षणांत धुळीला मिळालें. महाराष्ट्राची भाग्यगंगा कोयना— महाराष्ट्राची होयांगहो बनणार कीं काय अशी भयानक शंका त्याच्या अंतराचा ठाव घेऊं लागली.

किती सुखानें हे जीव निद्रादेवीच्या स्वप्न महालांत रममाण झाले असतील ! किती विश्वासानें त्यानी भूमातेच्या अंकावर आपले मस्तक विसावलें असेल ! पण काळाच्या क्रूर चेष्टेने त्यावर भयानक आघात केला.

दिवसा हें कृष्णकृत्य करायला त्याला लाज वाटली म्हणून का त्यानें काळरात्र निवडली !

मातीच्या ढिगाऱ्याखालीं चिरडणारे देह, पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें कोसळणारी घरें, त्याच्या दृष्टीला पाहवणार नाहींत म्हणून का त्याला रात्र बरी वाटली ! मातेच्या कुशींत चुरुचुरु दुध पिणारे लहानगे छबडें चिरडून टाकतांना त्याच्या कठोर हृदयाला यातना झाल्या असत्या, म्हणून का त्याला काळरात्र पसंत पडली.

एका कवीनें म्हटलें आहे "रात्रीच्या गभात उद्यांचा असे उषःकाळ" आतां दुःख आहे. नंतर सुख येईल. आता रात्र आहे, लवकरच उजाडेल, नयनमनोहर उषा नवयुतीचा साज लेऊन हसतमुखानें तुमचं स्वागत करील; पण १३ डिसेंबरच्या रात्रींनंतर उजाडलेल्या पहांटेने महाराष्ट्राला काय दिलें !

कर्णकटु किंकाळ्या, आणि कोसळणाऱ्या घरांचें काळजाला भिडणारे भेसूर आवाज !

ती पहा, एक माता आपल्या रक्तबंबाळ झालेल्या नखांनी प्राणपणानें जमीन उकरत आहे. उकरतां उकरतां मदतीसाठी आक्रोश करीत आहे. अंगावरच्या कपड्यांची तिला शुद्ध नाही, आजूबाजूच्या जगाचाहि तिला विसर पडला आहे, कारण तिच्या चिमण्या अर्भकाचा रुदनध्वनि त्या ढिगाऱ्यांतून तिला ऐकूं येत आहे.

तो पहा, एक तरुण विटांचा ढिगारा दोन्ही हातांनीं भराभर उपसत आहे, कारण त्याच्या नवपरिणीत वधूच्या लुगड्याचा पदर त्या ढिगाऱ्यातून मदतीसाठी डोकावत आहे.

कोसळलेल्या घराच्या मातीच्या ढिगाऱ्याभोवती गोल गोल धावणारे ते दोन म्हातारे जीव पहा ! कारण त्यांचा म्हातारपणीचा आधार त्यांत गाडला गेला आहे.

अरे पण त्या तारेच्या खांबावर चढणारा तो कोण ! काय करीत आहे तो ! इकडे सैतानाचा नंगानाच सुरू असतांना, तो तारांची जोडाजोड कसली करीत बसला आहे. स्वतःचा संसार उध्वस्त झाला असतां, तो काय सांधीत आहे ! अरे हा तर वीज घरांतील कर्मचारी ! सैतानाचें कृष्णकृत्य जगाला कळावें म्हणून तो संदेशवाहक तारांची जुळणी करीत आहे. जुळल्या—सर्व तारा जुळल्या—अगदीं नीट जुळल्या—भारताच्या कानाकोपऱ्यांत ध्वनि उमटला—कोयनेला भूकंपाचा प्रचंड हादरा ! कोट्यावधि रुपयांची हानी !

वीज घराकडे — नव्हे नव्हे — काळाच्या मुखांत धांव घेणारे ते दोन तरुण इंजिनिअर पहा. जनरेटर्स बंद करण्यासाठी ते जात आहेत. शाबास ! वीरानो! लक्षावधींची नुकसानी टाळण्यासाठीं तुम्ही का जीवाची बाजी लावलीत !

( पृष्ठ १६ वरून )

अनेकांच्या सहकारानें गेल्या वर्षी एकदांचा जुळून आला. मुंबईहून वे. शा. सं. श्री. आबा पणशीकर हे बाबांच्या पादुका घेऊन आपल्या नेहमींच्या पोषाखांत विमानानें लंडन शहरीं दाखल झाले. श्रीमती आजीबाई, त्यांचे जामात प्रतापभाई मेहता व इतर बरीच भक्त मंडळी लंडन विमानतळावर स्वागतार्थ हजर होती. पादुका समारंभपूर्वक आजीबाईंच्या निवासस्थानीं आल्यानंतर ही आनंदाची वार्ता लंडनमधील साईभक्ताना टेलीफोनद्वारें पोहोंचविण्यांत आली. आजीबाईंनीं स्थापन केलेल्या या केंद्रामुळें लंडन शहरात व आसपासच्या भागांत रहाणाऱ्या साईभक्तांची फार मोठी सोय झालेली आहे. मध्यंतरी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. मुरलीधरबुवा निजामपूरकर यांची याच ठिकाणीं आजीबाईंच्या विनंतीवरून भक्तिभावपूर्ण अशीं कीर्तनें झालीं.

प्रस्तुत पादुका स्थापना कार्यांत श्रीमती आजीबाई यांच्याशिवाय श्री. दादासाहेब भागवत, श्री. प्रतापजी मेहेता, आबा पणशीकर वगैरे मंडळींनीं फार महत्वाचा भाग घेतला. हा स्थापना विधि ता. १६।९।६७ रोजीं अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला. लंडनमधील भारतीय स्त्रीपुरुषमंडळी त्यप्रसंगी फार मोठ्या प्रमाणांत हजर होती. श्री. आबा पणशीकर यांच्याकडून सर्व धार्मिक विधि यथासांग पार पडले.

श्रीमती आजीबाई बनारसे यांचें घर हें लंडनमधील विशेषतः महाराष्ट्रीयांचें, भारतांतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें व इतरेजनांचें एक हक्काचें आश्रयस्थान होऊन राहिलें आहे. त्यांच्या घरीं श्रीगणपती उत्सवाचा सोहळा सतत दहा दिवस समारोहपूर्वक चालू असतो. अस्सल महाराष्ट्रीय पद्धतीचा हा उत्सव पहाण्यासाठीं व दर्शनासाठी रोजच्या रोज लोक मोठ्या संख्येनें हजर रहातात.

आपण परदेशांत येऊन हातीं घेतलेल्या व्यवहारांत सुयश मिळविलें हीं केवळ बाबांची कृपा होय असें त्या मानतात. साईबाबांवरील त्यांची निष्ठा जाज्वल्य आहे.

श्रीमती आजीबाई बनारसे यांस या त्यांच्या कार्यांत आम्हीं सुयश चिंतितों साईबाबांचें आशीर्वाद त्यांच्या पाठीशीं सतत आहेत.

( पान १५ वरून )

बाबानीं समाधि घेण्यापूर्वी सुमारें एक महिना अगोदर (सप्टेंबर १९१८) बाबांचें दर्शन कसें घडलें व त्यावेळीं काय घडलें हें सांगताना श्री. नानासाहेब अवस्थी म्हणाले, "त्याच सालीं (१९१८) माझा विवाह झाला. आम्हीं त्यावेळीं पुणें येथें आमच्या घरीं रहात होतों. घरांत चुलता, चुलती वगैरे कुटुंबांतील माणसे होती. वडील होते इंदूर जवळ कन्नोड येथें न्यायाधीश. शिरडीस आम्हीं उभयतांनीं बाबांचें दर्शन घ्यावें अशी माझ्या चुलतीची इच्छा. चुलत्याची परवानगी घ्यायची तीही खुषीनें मिळाली. आम्हांला वडिलांच्या भेटीसाठीं जायचें तर हर्दापर्यंतचें तिकीट काढलें पाहिजे होतें. केवळ भेटीला जायचें नव्हतें; तर त्यावेळीं पुण्यांत तापाची सांथ फार जोरांत सुरू झाली होती. पुणें सोडणें भाग होतें. शिवाय वडिलांकडून बोलावणेंही आलें होतें.

त्याप्रमाणें पुणें तें हर्दा तिकिटें काढलीं. आम्हीं शिरडीस उतरून बाबांच्या दर्शनासाठीं द्वारकामाईंत जायला निघालों तर वाटेंत बाबांचे भक्त श्री. दीक्षित हे भेटले. ते म्हणाले, "बरा आलास ! बाबांच्या अंगांत ताप आहे."

नंतर नित्याप्रमाणें दर्शन घेऊन बाहेर आलों आणि उद्यां वडिलांकडे जाणार असल्याचें सांगितलें. तेव्हां दीक्षित म्हणाले "नको जाऊंस उद्यां; उद्यां बाबा चावडींत येतील. तो सोहळा पाहून जा."

माझ्यानें शब्द मोडवला नाहीं. आम्हीं राहिलों; परंतु बाबांची तब्येत बिघडल्यामुळें नित्याप्रमाणें ( एक दिवस आड ) ते चावडींत कांहीं आले नाहींत. मग काय ? आम्ही राहिलों खरे. आम्ही जवळपासच्या एका ओढ्यावर सकाळच्या प्रहरीं स्नानास गेलों. तेथें एक गवळी दूध घेऊन आला, व तो दूध घेण्याचा आग्रह करूं मागला. दूध घेतलें. त्यांत एक हेतू होता. बाबांना खीर आवडते. तर त्यांना खीर–पुरीचा नैवेद्य अर्पण करावा. चुलतीची फार इच्छा होती. त्याप्रमाणें नैवेद्य अर्पण केला व बाबांनीं प्रेमानें त्याचा स्वीकार केला.

आम्हीं शिरडीहून निघालों तो दिवस बुधवारचा होता. निघावें न निघावें असा विचार करीत असतां बाबांना सर्व दिवस सारखे ! या विचारानें निघालों व दुसऱ्या दिवशीं हरद्याला पोहोंचलों. तेथें सदूभय्या नाईक व छोटूभय्या परूळेकर हे बाबांचे दोन भक्त भेटले. तेथून मी सायकलवरून निघालों. इतर

मंडळी टांग्यांतून गेली. मी एक मैलभर गेलों असेन नसेन इतक्यांत ती सायकल पंक्चर झाली. त्यामुळें मला परत सदूभय्याजवळ यावें लागलें.

त्यांना बाबांकडची उदी हवी होती. मी द्यायला व ते ती मागायला गडबडींत विसरले. पुन्हां भेटतांच त्यांनीं उदीची आठवण काढली. 'त्यासाठीं तर मला परत यावें लागलें !' असें म्हणून त्यांना उदी दिली. त्या दिवशीं माझा मुक्काम तेथेंच झाला. पुष्कळ फुलें मिळालीं तीं मीं घेतलीं व बाबांच्या प्रतिमेची मनोभावें पूजा केली.

त्यानंतर थोड्याच दिवसांनीं बाबानीं महासमाधि घेतल्याचें वृत्त आम्हाला शिरडीहून वडिलांस आलेल्या प्रत्रानें कळलें

बाबांच्या कृपेचे अनुभव मी आयुष्यभर घेत आलों आहें. ते सांगावे तेवढे थोडेच होतील.

१९४८ सालची एक घटना सागतों. त्याच सालीं बाबांचे परमभक्त माझे वडील इहलोक सोडून गेले. ते हयात असेपर्यंत बाबांची पूजाअर्चा अगदीं नियमीतपणे करीत असत.

त्यासालीं माझे ज्येष्ठ चिरंजीव रघुनाथ हे कुर्ला येथें पोलीस खात्यांतील एक अधिकारी या नात्यानें होते. त्यांच्यावर एकएकीं एक आपत्ति ओढवली ! आम्हीं गांगरून गेलों ! काय करावें या विचारांत असतां बाबांची आठवण झाली. त्याचबरोबर वडिलांच्या मागें बाबांच्या पूजाअर्चेकडे आम्हीं कोणी लक्ष देऊं शकलों नाहीं हेंही लक्षांत आलें. आमच्या दृष्टीनें तो एक अपराध घडला होता. बाबांची पूजा घरांत पूर्ववत् सुरू झाली. मी अनन्यभावें बाबांची प्रार्थना केली आणि थोड्याच दिवसांत माझ्या चिरंजीवांवर ओढवलेली आपत्ति बाबांच्या कृपेनें दूर झाली. असे अनुभव किती सांगावेत ?

# हेचि साच भेटी

## भक्त नानासाहेब चांदोरकर यांचा अनुभव

लेखक : डॉ. के. भ. गवाणकर

हेच साच भक्ति रूपाचा आठव । विसावला जीव आवडी पे ॥
सुखाचें भातुकें करावें जतन । सेविल्या तहान भूक जाय ॥
दुरील जवळी आपणचि होते । कळविल्या चित्तें जीवनाचें ॥
तुका म्हणे नाम घेतां वेळोवेळां । होतील सकळा शीतल नाडी ॥

सुखाचें भातुकें ( सुखाचें भोजन ) असलें तर तें आवडीच्या आठवाचें होय. हा आवडीचा, प्रीतीचा आठव म्हणजे बाळाचे ' आई आई ' हे गोडीचें हांक मारणें-भजन व नामस्मरण होय. हेंच सुखाचें भातुकें आहे. असें बोधांत ठसून म्हणजे जतन करून सेविल्या म्हणजे वारंवार नामस्मरण केल्याने सुखाची, प्रीतीची उणीव वाटणारी सर्व तहानभूक जाईल. ' तुका म्हणे नाम घेतां वेळोवेळां। होतील शीतल सकळां नाडी ॥ ' तेव्हां थोडक्यांत सार काय ? रूपाची साच भेट प्रीतीच्या आठवांत. त्या आवडींतच जीव विसावतो आणि दूरचेंही जवळ होतें. तेव्हां वेळोवेळां त्या प्रेममाउली साईचे नाम घेतल्याने नाडी नाडीसुखातिरेकानें शीतल होऊन जातात. हें ह. भ. प. नानासाहेब चांदोरकर बाबांचे एकनिष्ठभक्त यांच्या अनुभवावरून सिद्ध होतें.

नगर जिल्ह्यांत वोधेगांव म्हणून एक खेडें आहे. तेथें बन्नुमाई नांवाची एक यवन जातीची महासाध्वी, महाविरक्त, ज्ञानी मोठ्या अधिकाराची कुमारिका रहात होती. ती बहुतेक गांवाबाहेर जंगलांत झाडाझुडपांत रहात असे. तिला कोणी शोधावयास अगर भेटावयास गेल्यास निवडुंगाच्या झुडपांतून वाऱ्यासारखी धांवत असे. त्यावेळी तिच्या अंगांत पुष्कळ कांटे बोचत असत. तरी तिला त्याची दाद नसे. गांवात घरीं तिची आई एकटीच असे. तिला भेटण्यासाठीं ती क्वचित केव्हांतरी येई. ती वेडी आहे असें गांवचे लोक समजत असत. अशा

या साध्वीचें दर्शन घ्यावें अशी नानासाहेबांना प्रबल लालसा झाली; पण हे दर्शन बहुतेक अशक्य आहे, असे त्यांना वाटलें, तरी त्यांची दर्शनेच्छा कमी होईना. बाबांच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि ते सांगतील तसें करावे असें त्यानीं ठरवलें.

त्याप्रमाणे एकदां सवडीनुसार बाबांची भेट झाल्यावर नानासाहेबानीं आपली दर्शनेच्छा व त्या मार्गात येणाऱ्या अडचणी बाबांना सांगितल्या. बाबा म्हणाले ' अरे नाना ! तुला आतां कोणाचे दर्शन कशास घ्यावयास पाहिजे ? येथें सर्व कांही नाहीं का ? या उत्तराने नानासाहेबांची समजूत होईना व ते आपला आग्रह धरून बसले. तेव्हा " दर्शन होईल जा' असें बाबानी सांगितलें. तेव्हा तेथून परत आल्यावर बोधे गावास जाण्याची तयारी करण्यास आपले सल्ला-गार श्रीयुत बाबा खरवंडीकर यांस सांगितले. त्यानीं पाट, रांगोळीचे सामान, लुगडे, स्नानाचें सामान कुंकम, मंगळसूत्र इत्यादी घेऊन बाबा खरवंडीकरासहित नाना-साहेब बोधेगावास आले. आणि तेथे तपास करता बन्नुमाई गावांत नसून बाहेर जंगलांत आहे. असें समजले. तेव्हा तिचा शोध घेत घेत नानासाहेब गावाबाहेर येऊन काटेरी अरण्यांतून धावू लागले. बराच वेळ झाला तरी दर्शन नाहीं. नानासाहेब थकले, थोडेसे निराश झाले. आणि त्यानीं बाबांचे स्मरण केलें, आणि मनांत म्हणाले, दर्शन व्हावयाचे नव्हतें तर ' दर्शन होईल जा ' असे मला कां सांगितलें ? दर्शन झाल्याशिवाय मी इथून हलणार नाहीं. असें म्हणून डोळे उघडतात तों बन्नुबाई नग्नावस्थेतं नानासाहेबांच्या समोर उभ्या. त्यांना फार आनंद झाला. अंतरात्म्यांत अंतर्यामीचें चिंतन असलें म्हणजे त्या चिंतनांतून चैतन्य प्रकटते. निसर्गाच्या अंतःकरणाबरोबर आपलें अंतःकरण हालूं लागलें म्हणजे सूर्यप्रकाशाप्रमाणें जगाचें स्पष्ट ज्ञान होतें. योग्यांचे डोळयात व भक्तांचें मनांत नामस्मरणाने चैतन्य प्रकट होतें. नानासाहेब भक्त होते. आंग्ल-विद्येने विभुषित असूनही बाबांच्या संगतींत व अनुज्ञेनें संत वाङ्मयाचें व बोधाचें एक शिष्य एक गुरू । हा साच रूढला व्यवहारू । मत्प्राप्ति प्रकारू। जाणावया ॥ अशा एकनिष्ठ शिष्यभावाने परिशीलन केलें. केवळ शब्दांच्या तर्कपद्धतीनें विचार अगर अभ्यास वेगळा न गुरुसांप्रदायाप्रमणें ईश्वरी प्रसाद अनुभवण्यासाठीं त्या बोधगंगेत मिळून जाणें वेगळे.

बाबांनीं नानासाहेबांस प्रथम प्रथम कांहीं ग्रंथ वाचावयास सांगितले होते. पण शेवटीं शेवटीं त्यांनीं त्यांचें वाचन अजिबात बंद करून मी सांगेन तितकेंच करीत जा, अशी आज्ञा केली. नानासाहेबही तसेंच करूं लागले. बाबानीं त्याना काय सांगितलें व ते काय करू लागले हे त्यांचें त्याना किंवा बाबांनाच माहीत. श्रीभगवान वेदव्यासानी चौथ्या भक्तीस ज्ञानी भक्ति असें म्हटलें आहे.

या चवथ्या भक्तीसच दृश्यपथातीत भक्तियोग असें म्हणतात. याच चवथ्या भक्तीचा उपदेश नानासाहेबांस बाबांनी 'श्रीभगवद्गीता ( कै. दासगणूकृत भक्तलीलामृत श्री. अ. ३२।३३ व संतकथामृत अ. ६७ ) या मिषानें केल्याचें दिसतें. म्हणूनच बाबांचे नानासाहेबांवर अनिर्वचनीय प्रेम व नानासाहेबांची त्यांच्याठायीं अवर्णनीय भक्ति होती.

त्यानी बन्नुमाईला वेडी मानिली नाहीं तर एक देवी मानून तिला वंदन करून त्यांचे अंगांत शिरलेले कांटे काढण्यास सुरवात केली. तोंच त्या वाऱ्याप्रमाणें गर्द निवडुंगांत पसार झाल्या. रूपाचें दर्शन अर्थात आकाराचें झालें. नानासाहेब खिन्न झाले पण निराश झाले नाहींत. त्यांनी बाबा खरवंडीकरास सांगितले कीं येथेंच राहुटी ठोका, कनाती लावा, पाणी तापवा. राहुटीच्या आंत पाट मांडून भोवती रांगोळ्या काढा, स्नानाची पूर्व तयारी ठेवा. खरवंडीकरानीं यथासांग तयारी करण्यास सुरवात केली तों त्यांत एक चोळी कमी असें दिसून आलें. इतक्यांत त्या गांवचा बाजार आटोपून एक शिंपी घोड्यावरून परत आपल्या गांवीं जात होता. त्याचेपाशीं चोळीही मिळून सर्व तयारी जय्यत झाली. तेव्हा नानासाहेबांनी पुन्हा डोळे मिटून बाबांचें स्मरण केले. आणि त्यांची करुणा भाकली. तेव्हां काय चमत्कार सांगावा ! डोळे उघडून पहातात तों बन्नुमाई राहुटींत मांडलेल्या पाटावर स्नानाकरिता उभ्या ! तेव्हां नानासाहेबांना अत्यानंद होऊन प्रथम तिच्या अंगांतील कांटे काढले, सौगंधिक तेल व उटणें लाविलें आणि त्यांना अभ्यंग स्नान घातलें. नंतर त्यांचें अंग स्वच्छ पुसून त्यांची वेणी घातली. कंठांत सोन्याचें मंगळसूत्र बांधलें, कुंकुम लावून लुगडें नेसविले आणि चोळीही अंगांत घातली; नंतर त्यांची पूजा करून हातावर नैवेद्य ठेवून त्यांना वंदन केलें व दक्षिणा दिली. इतकें होतें न होतें तोंच बन्नुमाईनीं सर्व पदार्थांचा त्याग करून जंगलांत वायुवेगानें प्रयाण केलें.

ही बातमी गावांत पसरली आणि बन्नुमाईची वृद्ध आई तेथें धांवत आली. आणि तिनें नानासाहेबांवर बालिश आरोप करून त्याना शिव्यांची लाखोली वाहिली. नानासाहेबांनी शांतमनानें तिची विनवणी केली आणि खरी वस्तुस्थिती सांगितली तरी तिचें समाधान होईना. शेवटीं तेथें पडलेलें सर्वसामान ( लेकीच्या पूजेचें ) घेऊन जाण्यास जेव्हां तिला सांगण्यांत आले तेव्हां तिचा कोप थंड झाला, आणि तें सर्व सामान घेऊन ती घरीं परतली. नंतर नानासाहेब देवळांत आपल्या मुक्कामीं परत आले. सायंकाळचा फराळ होऊन सर्व मंडळीसहीत तेथें निजले. नानासाहेब देवळांतील गाभाऱ्यांत निजले व पहांटेस परत जाणेचे वेळीं फिरून बन्नुमाईचें दर्शन कसें होईल या विचारांत ते अंथरूणावर पहुडले. त्या रात्रीं बन्नुमाई आपल्या मातोश्रीकडे निजावयास आल्या होत्या. पहांटे ४।५ वाजतां नानासाहेब जागे होऊन पहातात तों बन्नुमाई आपल्या उशापाशीं बसलेल्या त्यांना आढळल्या. हें पाहून त्यांना बाबांच्या लीलेचें परम कौतुक वाटून त्यांना परमाश्चर्य व परमानंद झाला. हें खरें साच दर्शन, साच भेटी. त्यांनी पुनः बन्नुमाईच्या पायांवर डोकें ठेवून वंदन केलें. इतकें होतांच बन्नुमाई लगेच तेथून पसार झाल्या. बन्नुमाईची आईही तेथें तिच्या शोधार्थ आली आणि झालेला प्रकार तिला समजला. बन्नुमाईची आई म्हणून नानासाहेबांनीं तिचीही द्रव्यदानानें योग्य संभावना केली, आणि तीही शांत व प्रसन्न अंतःकरणानें घरीं गेली. सर्व मंडळीसहित नानासाहेब नगरास परतले.

भक्तांच्या प्रेमाकरितां भगवंत श्रीसाई प्रकट होऊन त्यांस सुखवितो. वैकुंठांतील सुखापेक्षां भक्त वृंदावनांतील सुख भोगण्यास —भक्तांचा लळा पुरविण्यास भगवंताला सुख वाटतें. नानासाहेब हे एकनिष्ठ भक्त होते.

अहो वासरूं देखलियाची साठीं । धेनु खडबडोनि मोहें उठी ।
मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा न ये ॥ ज्ञाने. ११।४०

अनन्य असलेली श्रीसाईमाऊली बाळकांचे सर्व लळे पुरविण्यासाठींच पुढें आली. आपणही या जोडीच्या मागें जाऊन जन्माची जोड करून—जीविताचें कोड फेडूं.

वृंदावनके वृक्षमे मर्म न जाने कोय ।
डाल डाल और पानपानमें राधेश्शाम होय ॥

# दत्तभक्त महायोगिराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराज

यांचें मुंबईत नुकतेंच आगमन झालें त्याला अनुलक्षून

एका भक्ताचे आर्त उद्गार



## वानूं त्या गुरु वामना सुपथ हा आम्हां जयें दाविला

दीक्षा घेउनि धन्य जन्म अमुचा लोकीं तिहीं जाहला ।
दुःखें ऐहिक दूर होउनि मना आनंद हा लाभला ॥
दैन्याचा परिहार, लौकिक जनीं होई 'भला रे भला !' ।
वानूं त्या गुरु वामना सुपथ हा आम्हां जयें दाविला ॥ १ ॥
वेदाभ्यास नको, नको भटकणें क्षेत्रासि तीर्थासि वा ।
नित्याचें करिं कार्य शुद्ध मनसा आदेश ना हा नवा ॥
ध्यानीं मग्न यथावकाश बसणें, थारा न दुर्वृत्तिला ।

वानूं त्या गुरु वामना सुपथ हा आम्हां जयें दाविला ॥ २ ॥
झाले आजवरी कितीक जगतीं अध्यात्म-मार्ग-प्रभू ।
त्यांचे वाचुनि ग्रंथ नीट न कळे 'कोऽहं?' —मनीं संभ्रमू ॥
श्रीमत्सद्गुरुदर्शनेंचि अवघा संदेह हा लोपला ।
वानूं त्या गुरु वामना सुपथ हा आम्हां जयें दाविला ॥ ३ ॥
इच्छा तीव्र मनीं कितीक दिन ही जावें पुण्याला झणीं ।
चित्ताचा बहु क्षोभ तो निवबुंया पादाम्बुजा वंदुनी ॥
भक्तां कष्ट नकोत हेहि म्हणुनी येथें स्वयें पातला ।
वानूं त्या गुरु वामना सुपथ हा आम्हां जयें दाविला ॥ ४ ॥

(कवि :— अनामिक)

---

## वाचिक अहिंसेविषयीं ज्ञानेश्वर माउलीचें विवरण

स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर ॥
माधुर्या जाले अंकुर । दशन तैसे ॥ २६२ ॥
पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें ।
शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ २६३ ॥
तंव बोलणेंचि नाहीं । बोलों म्हणे जरी कांहीं ।
तरि बोल कोणाही । खुपेल कां ॥ २६४ ॥
बोलतां अधिकही निघे । तरि कोणाचिया वर्मी न लगे ।
आणि कोणासि न रिघे । शंका मनीं ॥ २६५ ॥
मांडिली गोठी हन मोडैल । वासिपैल कोणी उडैल ।
आइकोनि वोवांडिल । कोण्ही जरी ॥ २६६ ॥
तरि दुवाळी कोणा नोहावी । भवई कवणाची नुचलावी ।
ऐसा भाव जीवीं । म्हणोनियां ॥ २६७ ॥
मग प्रार्थिला विपायें । जरि लोभें बोलों जाये ।
तरि परिसतया होये । मायबापु ॥ २६८ ॥
कां नादब्रह्मचि मुसें आलें । कीं गंगापय असळलें ।
पतिव्रते आलें । वार्धक्य जैसें ॥ २६९ ॥
तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।

शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ २७० ॥
विरोध वादवळु । प्राणितापढाळु ।
उपहास छळु । वर्मस्पर्शु ॥ २७१ ॥
आटु वेग विंदाण । आशा शंका प्रतारण ।
हे संन्यसिले अवगुण । जया वाचा ॥ २७२ ॥

( ज्ञानेश्वरी अध्याय तेरावा )

## सुबोधिनी छाया

श्वासही त्याचा सकुमार । मुख प्रत्यक्ष प्रीतीचें माहेर ।
आणि दंत जणूं अंकुर । माधुर्याचे ॥
स्नेह पाझरे प्रथम चित्तीं । मागें अक्षरें चालतीं ।
मग मुखांतूनि बाहेर येती । शब्दोच्चार कृपेचे ॥
त्यासी भाषण आधीं प्रिय नाहीं । परि बोलणेंचि झालें कांहीं ।
तरि ते काय कोणाही । खुपेल ऐसें भय गमे ॥
बोलतां निघे अधिककांहीं । तरी वर्मी न लागो कोणाही ।
किंवा त्यापासोनि कोणा हृदयीं । शंका न यावी तिळमात्र ॥
किंवा कोणाचे हेतु फसती । कोणासी उपजेल भीती ।
कोणी तिरस्कार मानील चित्तीं । ऐकतां भाषण आपुलें ॥
ऐशी पीडा कोणा न व्हावी । कवणाची वक्र दृष्टि नसावी ।
ऐशी आशंका त्याचे जीवीं । म्हणूनि स्तब्धचि तो राहे ॥
तथापि त्यासि प्रार्थितां । तो सप्रेम बोले पार्था ।
जेविं बोलतां मातापिता । आनंद वाटे ऐकुनी ॥
जणूं प्रत्यक्ष वेद प्रगटले । कीं गंगाजळ उसळलें ।
कीं पतिव्रता स्त्रीतें आलें । वार्धक्य जैसें ॥
तेविं सत्य आणि मृदुतर । मोजके आणि मधुर ।
शब्द त्याचे गंभीर । अमृताच्या जणुं लहरी ॥
उपरोधिक वादग्रस्त । त्रासजनक निंदापूरित ।
उद्वेगकर वर्मयुक्त । नसे बोलणें तयाचें ॥
तेविं मुग्धता कापट्य शीघ्रपणा । आशा शंका प्रतारणा ।
ऐशा त्यजिलें अवगुणा । असे जयाच्या वाणीनें ॥

गोविंद रामचंद्र मोघे

# श्रीगोंदवलेकर महाराजांचा मुमुक्षूंस उपदेश

भगवद्भक्त श्री. गोंदवलेकर महाराज यांचा आमच्या वाचकांस परिचय झालेला आहेच. ते आपल्या भक्तांना वेळोवेळीं मार्गदर्शनपर पत्रें लिहीत असत. अगदी मोजक्या शब्दांत; परंतु सहज बोध होणारी. त्यांच्या पत्रांतील निवडक म्हणीवजा वाक्यांचा संग्रह श्री चैतन्यगीता या नावानें त्यांचे एक शिष्य प्रा. बेलसरे यानीं संग्रहीत केला आहे. त्यांच्या त्या सूत्रमय परंतु मननयोग्य वाक्यांची माधुरी काय सांगावी ? एका पत्रांत ते भक्तांना आवाहन करतात कीं, " अरे ! तुम्हीं सर्वजण आपलें जीवन आनंदमय बनविण्याची कला शिका. ही कला इतर सर्व कलांची सम्राज्ञी आहे. भगवंतावर अकृत्रिम नि निष्काम प्रेम केल्यानें ही कला सहज साधते असें महाराजांचें सांगणें असे. भगवंताच्या नावावर प्राणापलीकडे प्रेम हें त्यांच्या जीवनातील चैतन्याचा लाभ इतरांस व्हावा व इतरांनीं तो करून घेऊन सुखी-समाधानी व्हावें असे त्यांना वाटत असे. " त्यांचें तें प्रेम इतकें अनिवार होतें कीं, ते भगवंताच्या डोळ्यांनी पाहत, भगवंताच्या कानांनी ऐकत व भगवंताच्या तोंडानें बोलत, इतकेंच नव्हे तर जगातील प्रत्येक घटनेंत त्यांना भगवंताचा हात दिसत असे "

आपल्यापैकी प्रत्येकजण साधक आहे. साधकानें काय करावें ? साधकानें चित्त ओतून साधनाची आटाआटी करावी. आपलें चित्त साधनेंत रमूं द्यावें. त्यासाठी मौन नि एकांतवास पत्करावा. शुद्ध आचरण पवित्र अंतःकरण आणि त्याला नामस्मरणाची जोड. एवढे करतां आल्यावर आणखी कायपाहिजे ?

## महाराजांच्या सूक्ति

१ परमार्थाचें मुख्य साधन । शक्यतों न चुकूं द्यावें अनुसंधान ॥

२ मुखीं करावें नामस्मरण । हृदयीं भगवंताचें ध्यान ।
यावीण नाहीं दुजा उपाय जाण ॥

३ मागिलाची विस्मृति । पुढिलाची न करावी स्मृति ।
पण आज भजावा रघुपति ॥

४ सर्व कांहीं करीत जावें । परी व्यवहारी न गुंतावें ॥

५ ऐसें राहावें प्रपंचांत । जसा पाहुणा वागे जगांत ॥

६ बाह्यसृष्टी विषकार । तेथें मन न गुंतू द्यावें जाण ॥

७ देह लावावा प्रपंचीं । मन लावावें रामचरणीं ॥

८ लोभ्याचें चित्त पैशावरी । परी व्यवहार जैसा करी ।
तैसें आपण ठेवावे कामावरी । प्रपंचात असावी हुशारी ॥

९ चित्त एकाग्र न व्हायला कारण । विषय मानला आपला जाण ॥

# बाबांची आठवण

लेखकः श्रीराम. व्ही. सातर्डेकर

मी १९४५ सालीं माझे आजोबा श्री. रामचंद्र मिकाजी मयेकर [ मालवण जि. रत्नागिरी ] सध्या वास्तव्य [ फ्रेंच इन्डोचायना ] सायगांव या ठिकाणीं धंद्यासाठीं वास्तव्य. यांच्याबरोबर प्रथम शिर्डीला गेलो. त्या वेळेपासून आजमिती-पर्यंत वर्षांतून रामनवमी, गुरुपौर्णिमा, व दसरा या उत्सवांनां जात आहे. या २३ वर्षांच्या अवधींत माझ्यावर अनेक लहान मोठी संकटे आली. त्यांचे निवारण श्रीबाबांच्या आशीर्वादाने, कृपेनें झालें, परंतु ज्या मोठ्या संकटांतून बाबांनीं मला वांचविले, त्याची आठवण अशी, मुलांच्या वार्षिक परीक्षा आटोपल्या होत्या. आणि मे महिन्याची सुटी पडली होता. कुठेंतरी मुंबई बाहेर जावे असे ठरलें. सौ. आशा माझ्याच प्रमाणें बाबांची चाहती असल्यामुळें शिर्डीस जायचें ठरलें. परंतु मला सुटी मिळणें शक्य नव्हते. त्याप्रमाणे मी ६ दिवसांची किरकोळ रजा घेवून आम्हीं शिर्डीला गेलो. सौ. आशा व मुलें म्हणू लागली. कीं आम्हीं इथें जास्त दिवस राहूं. परंतु राहण्यास संस्थानची जागा मिळणें शक्य नव्हते. मंदिरा-जवळच श्री. दिगंबर पुजारी पूर्वीं राहात होते. त्या ठिकाणीं श्री. विठ्ठलराव मराठे [ संस्थानचे गवई ] त्यांनी आम्हांला महिना १० रुपये भाड्याची एक छोटीशी खोली श्री. दत्तोबा सारंगधर [ हल्लीं मालक श्रीराम स्टोअर्स ] याच्या शेजारी घेवून दिली. शेजारीच श्री. गुरुबंधु विठ्ठल मांजरेकर सध्यां [ व्यवस्थापक ] गुरुपादुका हे आपल्या आईसमवेत राहत होते. आमचीच सारीं प्रेमळ माणसें असल्यामुळें मी मुंबईला ६ दिवसांची माझी रजा संपतांच निघून आलो. दोन दिवसां-आड पत्रें यायची मुलांची सर्वांची खुशाली समजायची व सौ. आम्हीं सर्व मजेत आहोंत. अशाप्रकारें पत्रांतून उल्लेख असल्यामुळें वश्रीबाबांच्या सान्निध्यांत सर्व दिवस असल्यासुळे मला कोणतीही काळजी नव्हती. अशा प्रकारें १५ दिवस गेले. मी गिरगांव पोस्टऑफिसमध्ये सकाळीं ६ ते दुपारीं २ या ड्यूटीवर असल्यामुळे ३ वाजतां घरीं येवून पेपर्स वाचतां वाचतां झोपी जात असे. असाच नित्याप्रमाणें झोपी गेलो असतां स्वप्न पडलें कीं, मुलें रडून सारखी हाका मारीत आहेत. मी दचकून जागा झालो. दुसरे दिवशीं पोष्टाला सुट्टी होती. खिशांत १५ रुपये होते. त्यावेळीं [ १३ रुपये जावून येवून गाडी भाडे होतें ] विचार केला! आज रात्रीच्या गाडीनें निघून उद्यां सकाळीं शिर्डीला अकस्मात भेटून सर्वांना आश्चर्य चकित करावे, व पुन्हा दुसरे

दिवशीं निघून मुंबईला हजर व्हावें. त्याप्रमाणें शेजारी कुणासही न सांगता मी नागपूर मेलने निघून शिर्डीस सकाळी ५॥। वाजतां अकस्मात दारांत हजर झालो. मुलांना आनंद झाला. सौ. आशाकडे पाहतांच माझ्या आकस्मिक येण्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. पण तिला कांहीं तरी होत असल्याची जाणीव मात्र तिच्या चेहऱ्याकडे पाहतांच मला झाली. आणि तिनें विचारलें तुम्ही अचानक कसे आलांत! मी तिला दुपारची घटना सांगितली. आणि आलों गंमतीनें! श्री. दत्तु भाऊ दिगंबर पुजारी व श्री. मांजरेकरांची आई यांनी माझी चेष्टा करण्यास सुरवात केली. का भाऊ! महिनाभर येणार नव्हतां आणि पंधरा दिवसांतच हजर! मंदिरांत आम्हीं सर्वजण गेलो. आणि घरीं जातो, तोंच सौ. आशा म्हणू लागली कीं, माझ्या पोटांत सारखे दुखत आहे. आणि थकल्या-सारखे होतें. हळू हळू दुपारच्या आरतीपर्यंत तिच्या वेदना वाढूं लागल्या तेव्हां संस्थानचे डॉक्टर श्री. रुस्तमजी यांजकडे गेलो. त्यांनी औषध दिले आणि विश्रांति घेण्यास सांगितलें. परंतु वेदना थांबत नव्हत्या. दुपारी ४ च्या सुमारास ब्लीडिंग होऊं लागलें. श्री. विठ्ठल मांजरेकर यांची आई लक्ष्मीबाई मांजरेकर व दत्तु भाऊ यांची सासू व इतर कांहीं वृद्ध स्त्रिया यांनीं पुष्कळ काळजी घेतली. व नाइलाजानें पुन्हां रुस्तमजी डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी सांगितलें कीं इथे कॉट नाही नर्स नाहीं. तेव्हा तुम्हीं हिला ताबडतोब राहत्याला हॉस्पिटलमध्यें घेऊन जा. विलंब लावूं नका. त्याप्रमाणें गावांत मोटारही मिळेना. शेवटीं खटारा गाडीने श्री. बाबांचे दूरुनच सद्‌गदित अंतःकरणाने दर्शन घेऊन सौ. आशेला प्रेता-सारख्या अवस्थेंत उचलून खटाऱ्या गाडींतून राहत्याकडे निघालो. सोबत माझ्या आईप्रमाणें लक्ष्मीबाई मांजरेकर होत्या. खटारा गाडी व रस्त्यांतील खांचखळगे त्यामुळें सौ. आशाचें ओरडणे चालूच होतें. लक्ष्मीबाई तिला धीर देत होत्या. माझ्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वाहत होत्या. मी सारखा बाबांचा धांवा करीत होतो. बाबा! तुमच्या सान्निध्यांत येवून मी हें काय उपभोगीत आहे. मला तिच्या वेदना पाहवत नाहींत. सारखी पाणी पाणी करायची पण .........पाणी पिण्या इतकेही त्राण तिच्यांत नव्हते. शेवटीं बाबांनी आपली प्रेमळ माया पसरली आणि तिला ग्लानी आली. आम्हीं सायंकाळीं ६ वाजतां डॉक्टर रसाळ यांच्या हॉस्पिटलमध्यें पोहोचलो. त्या ठिकाणी योग्य ते उपचार केले. व सौ. आशेला ठेवून घेतले. सौ. आशेला ग्लानी आली. त्याचवेळीं खटारा गाडीतच तिचें अबॉरशन झालें

होते. ही पण बाबांचीच कृपा ! लक्ष्मीबाई मांजरेकर यांना सोबत ठेवून मी राहत्यास माझ्या ऑफीसमध्यें व सौ. आशेच्या बहिणीना तारा केल्या. डॉक्टरांनी सांगितलेली इंजक्शन आणूनस् दिली. यावेळीं माझ्या खिशांत अवघे ८ आणे शिल्लक होते. घरी रात्रीं १० वाजतां आलो. आळींतली सर्व प्रेमळ मंडळींनी मुलांना जेवूं खाऊं घालून झोपविलें होते, दुसरें दिवशीं सकाळी राहत्याला गेलो-श्री. रसाळ डॉक्टरनां भेटलों. त्यांनी सांगितले कीं पेशंटना इथें ८ ते १० दिवस राहावें लागेल. प्रवास करूं नका. मी त्यांना सांगितलें कीं आम्हीं शिर्डींत राहूं. त्याप्रमाणें त्यांनी परवानगी दिली, व ते डॉक्टरही प्रत्येक गुरुवारी शिर्डीस येतात. त्यावेळीं भेटण्यांस सांगितलें ( श्री. दत्तूभाऊ या प्रेमळ मंडळींनी जाणून स्वतः होवून मला पैशाची मदत केली. )

शिर्डीस येतांच संस्थानच्या प्रेमळ माणसांनी मोरी असलेल्या खोलीची व्यवस्था केली. सध्या तिथें चौकशी ऑफिस आहे. तिथें ४२ नंबरची खोली होती. त्याठिकाणी एक आठवडा राहिलो. आणि गुरुवारी डॉक्टर रसाळ स्वतः होवून भेटले आणि त्यांनी मुंबईस जाण्यांस सांगितलें. त्याप्रमाणें आम्हीं मुंबईस आलो. मला त्या दुपारी जर बाबांनीं बोलावून नेलें नसते तर ...पण....बाबांच्या कृपेनें आशीर्वादाने सकंट दूर झालें. आणि आम्हीं सुखानें जीवन कंठींत आहोत.

प्रदीप, प्रसाद, सारखे दोन सुपुत्र आणि प्रतिभा, अलका, आणि शुभांगी हीं बाबांच्या कृपेची, आशीर्वादाची फळें आहेत. मुंबईस येतांच [ नवशक्तीमध्यें ] शिर्डीच्या दवाखान्यांत कॉटस् नर्स नसल्यामुळें माझ्यावर ओढवलेल्या संकटाचें पत्र प्रसिद्ध केले. त्यानुसार संस्थाननें कॉटस्ची व्यवस्था केली. आतांतर बाबांच्या कृपेने मोठे सुसज्ज हॉस्पिटलच शिर्डीक्षेत्री झालें आहे. अजूनही त्या प्रसंगाची आठवण झाली कीं छातींत धस्स होतें.

## बाबानीं संकटमुक्त केलें

श्री. वैजनाथ दाजिबा धर्माधिकारी मु. केळवारोड, पो. केळवा, ता. पालघर, जि. ठाणे यांनी लिहून पाठविलेला अनुभवः—

गेल्या वर्षीं माझ्या पत्नीला दिवस गेले होते. प्रसूतीचा महिना डिसेंबर १९६७ येत होता. मी नौकरी करीत आहे. मला त्याच वेळी रजा मिळणे घठीण होते. घरांत तसे दुसरे कोणीच नाही.

मी माझ्या चुलत बंधूना पत्र लिहून माझी अडचण कळवून, माझ्या सौ. चे नांव दादर येथील हॉस्पिटल मध्ये दाखल करून खोलीवर प्रसुतीपूर्वी थोडे दिवस रहाण्याबद्दल विचारले. त्यांच्याकडून संमती मिळाली.

श्रावण महिन्यांत माझ्या सौ. ने " श्री साई महात्म्याची " सुखरूप सुटका होण्यासाठी २१ पारायणें केली.

नांव दाखल केल्यावर आम्ही बाहेर गावचे रहाणारे असल्यामुळे १ महिन्याने मी माझ्या पत्नीस तपासावयास पाठवीत असे.

ऑक्टोबर महांत तपासून परत आल्यावर ७।८ दिवसांनी सौ. ची प्रकृती बिघडली. पालघर येथील डॉक्टरांचे उपाय केले.

दि. ३० ऑक्टोबर १९६७ रोजी मी पालघर येथे सामान आणण्याकरितां जाऊन आलो. त्याच रात्रीं माझ्या सौ. ची तब्येत बिघडली. खेड्यांत दवाखान्याची, डॉक्टरांची, सोय नाही, नर्स वगैरे नाही. रात्रौ १० वाजल्यापासून पोटांत घळा येऊं लागल्या. रात्रा १२ वाजेपर्यंत आम्ही जागरण केले. कळा प्रसूतीच्या आहेत किंवा कसे म्हणून सुइणीस बोलावयास गेलो. तिने येण्यास नकार दिला. महिना प्रसूतीचा असल्यामुळे घरांत कोणीच करायला मनुष्य बोलाविले नव्हते. पुढे १-३० वाजतां कळा येऊ लागल्या, आजूबाजूच्या शेजाऱ्यांना बोलावून घेतले. कोणी दादर येथें हॉस्पिटलमध्ये जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें मी तयारी केली. परंतु अटअप चुकली.

गाडीत माझ्यावर भयंकर प्रसंग गुदरला असतां. कारण आम्ही सुईण बरोबर घेतली नव्हती. म्हणजे गाडी चुकली ही बाबांची कृपा झाली.

नंतर धावपळ करून सुईणीला बोलवावयास गेलो. अगोदर जी सुईण येण्यास तयार नव्हती ती आली. पहाटे ३-४५ वाजतां श्री साईबाबांच्या कृपेने सौ. ची सुटका सुखरूप झाली.

सकळ धर्माचें कारण । साई नामस्मरण श्री साई कीर्तन ॥ १ ॥
दया क्षमा समाधान । घ्यावें साईचें दर्शन ॥ २ ॥
साई संग धरा वेगीं । वृत्ति जडो साई पदीं ॥ ३ ॥
नरतनु न येयाची बा कदा । भावें भजा साईपदा ॥ ४ ॥
भुलू नका या संसारीं । साई उच्चारीं उच्चारीं ॥ ५ ॥
सर्व जायाचे जायाचे । साई नाम हेंचि साचे ॥ ६ ॥
साई रक्षील शेवटी । आसनी कर दोन्ही चरणीं । ॥७ ॥
वैजनाथ जाणोनि शेवटीं । साईचरणा घाली मिठी ॥ ८ ॥

वै. दा. धर्माधिकारी.

# घे शेवटचा तुला दंडवत

लेखक : डी. बी. पोतनीस

दिनांक २४ मे ते दि. २८ मे १९६८ पर्यंत मी व माझे मित्र श्रीयुत कीर्तीकर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी येथें मुक्कामास होतो. श्रीसद्गुरु साईबाबांचा निरोप घेतांना मला जें लिहितां आलें तें पद्य पुढें देत आहे.

घे शेवटचा तुला दंडवत जातों माघारी
फिरूनि केव्हां आज्ञा होतां येईन माघारी
तुझ्या मी येईन दरबारीं — ध्रु० —
भरजरी वस्त्रें अंगावरती
मुगुट कनकाचा
सिंहासनावरी नयन मनोहर
राणा त्रैलोक्याचा
घे शेवटचा तुला दंडवत —१—
राहूं दे तव कोमल मूर्ती
या मम हृदयान्तरीं
वाट पाहीन तव भेटीची
या मम संसारीं
घे शेवटचा तुला दंडवत —२—
प्रथम दर्शनीं तुलाच बघतां
लोचन पाझरले
आनंदाने शब्द उमटण्या
ओठ ही थरथरले
घे शेवटचा तुला दंडवत —३—
तव नयनांची भाषा भासवी
गोड गुपित कांहीं
मुखकमलावर हास्य सांगते
प्रेमानें कांहीं
घे शेवटचा तुला दंडबत —४—
निरोप घेतां तुझा राघवा
हृदय भरूनी येतें
आतां तरी राहूं दे मूर्ती
या मम हृहयांतें
घे शेवटचा तुला दंडवत —५—

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality–by Pradhan | | | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality (Telgu) | | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणु | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | Guide to Shirdi (English) | | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½″ × 13½″ medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½″ × 13½″ medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मु: **पांडुरंग दाजीबा मोरे** निर्णयसागर प्रेस, २६।२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २.
संपादक व प्रकाशक : **द. दि. पाटणकर,** ' साई निकेतन ', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ वी, दादर, मुंबई १४.